Per annum ...
Single copy..........

किरकोळ अंकास.......................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु०१
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .........०१

Advertisement
Below 10 lines...2...
per line over10... 4a.
Repetition per line 8as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII | AKOLA MONDAY 3 JUNE 1889 | NO. 21

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख ३ माहे जून सन १८८९ इ० | अंक २१

CALCUTTA ART STUDIO

185 BOWBAZAR STREET.

PICTURES PICTURES PICTURES

PUBLISHED FROM THE FAMOUS CALCUTTA ART STUDIO.

About 200 sorts of beautifully colored Hindu mytho pictures are for sale at half price till 30 th Vadra 1296 the next Dusserah Festival.

Particular advantages are held for purchasers of Rs. 5 worth pictures who will receive in addition gratis three pictures of Hindu gods and goddesses and two portraits of the Viceroy and Lady Lansdowne.

Every facility would be afforded to mofussil purchasers in sending to them the pictures free of packing and postage charges. Price lists sent free on application. This is the cheapest chance ever afforded to the Hindu public in securing admirable Hindu sacred pictures at a mere nominal charges.

As it is expected that there will be a general rush for these pictures, purchasers are requested to apply soon in order to avoid disappointment by an early disposal of the stock.

All orders by V. P. Post should advance the cost of the V. P.

Pictures worth less than a rupee cannot be sent in V. P.

CALCUTTA ART STUDIO
185 Bowbazar Street.
CALCUTTA.

N. BISWAS.
Manger-

## गरमीचे रोगावर औषध.

शरिरांत गरमी होऊन धातु बिघडतें व तो स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होतो. झोंपेंत व मुत्र समई पतन होते परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात हा रोग ज्यांस आहे त्याणी अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

## अन्न पचन होण्याचें औषध

अन्न पचन नाहीं त्यांस मळमुत्र साफ होत नाहीं. पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन मळमळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेम पांढरे रंगाची पडंत, शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते. हा रोग ज्यांस आहे त्याणी पाचकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डाक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन
वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

मुक्काम वाशिम ता. २९।५।८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

कृतानेक सा. नमस्कार वि० तो विशेष गेल्या आठवड्यांत मिस्तर नीवलीस साहेब बाहादुर यांची स्वारी स्वगृहीं निघून गेली. साहेब जाण्यापुर्वी तीनच्यार दिवस त्यांच्या बंगल्यावर जणुयात्राच भरली होती. कोणी साहेब बाहादुरा पासून सामान घेण्या करितां, कोणी साहेब बहादुर प्रयाण करितात तेव्हां आपलें पुढें कसें होईल हें दाखवून आपलें दुःख प्रदर्शीत करण्या करितां, कोणी साहेबांचे मन वळवून आपले कार्य साधण्या करितां, कोणी नोकरीच्या आशेंत गुंतून मजला अमकी जागा द्या मजला तमकी जागा द्या. मी असें चांगलें काम करीन मी तसें चांगलें काम करीन अशी शेखी मिरविण्या करितां, एकून तीन चार दिवस मोठा प्रेक्षणीय देखावा बंगल्यावर दिसत होता. साहेबां पासून मजला ही कांहीं वर मिळेल म्हणुन मी ही गेलो होतों परंतु गरीबाचे साधना शिवाय दाद कोठून लागणार!! गरीबाचा कनवाळु ईश्वर जातां जातां साहेबांनी बहुतांचें प्रेम संपादन केलें. ही मोठीच गोष्ट समजावयाची.

अशी गांवांत धुमका उठली आहे कीं खरें खोटें ईश्वर जाणें - येथें कोणी गृहस्थ आनररी माजीस्ट्रेट नेमिले जाणार आहेत. अर्थात यांच्या हातीं माजिस्ट्रेटचा अधिकार येणार म्हणजे लोकांचे बरें वाईट करण्याचें त्यांचे हातीं येणाऱ्या मदद-महत् कामास मनुष्याच्या अंगीं किती योग्यता, विद्वत्ता, पापभीरुपणा, न्यायान्याय योजण्याचें सामर्थ्य, मनाची शांतता, निःपक्षपातीपणा वगैरे अनेक चांगले गुण पाहिजेत. अर्थात असा मनुष्य केवळ सुकीर्ती व सुगुण यांचा केवळ करंडाच असला पाहिजे. तर त्या पासून न्याय देवतेची चांगली सेवा घडेल. आतां येथें जे कोणी येणार व अशा प्रकारचा हुद्दा प्राप्त करून घेणार त्यांची कीर्ती सध्यां लोकांत गाजत आहे तोच घेऊन चालल्यास त्यांचे अंगीं चांगलें गुण किती आहेत व ते या जाग्यास आपल्या विद्वत्तेच्या योगानें योग्य आहेत किंवा कसें यांचा विचार यांना जागा देणारे पूर्वी करून नंतर जागा देतीलच. परंतु आमचे वाशीमचे तर्फे ते आमचे वाशीम शहरचे ऑनररी माजिस्ट्रेट होण्यास योग्य आहत किंवा नाहीं याचा विचार योग्य वेळीं करण्यांत येईल. या गांवांतच हा जागा करण्या कोणा कोणी योग्य आहे किंवा नाहीं याचा ही तेव्हांच विचार करूं कळावें लोभ किजे हे विनंती.

आपला
"क्ष"

मु० वाशीम ता० २९-५-८९ इ०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कृ० सा० न० वि० वि० गेल्या वर्षी वऱ्हाडांत राष्ट्रीय सभेचे बाबतींत बरीच चळवळ झाली. गांवोगांवीं खेडोखेडीं ठिकठिकाणीं सभा भरविल्या. राष्ट्रीय सभेचे हेतू गूज व अर्ज जनाला कळविले. व त्या सभेविषयीं लोकांच्या मनांत बरीच कल्पना आणून दिली नंतर लोकांनीं आपापल्या वतीनें प्रतिनिधी निवडले. असें होतां होतां गेले सालीं राष्ट्रीय सभे करितां बरीच लोकनियुक्त मंडळी गेली व अलाहाबादेस सभेमध्यें वऱ्हाडचें नांव गाजविलें. ह्या गोष्टीस सहा महिने झाले. अजून त्याचे पुढारी मंडळीचे या सभेच्या वेळीं झालेले श्रम परिहार झालें नाहींत असें वाटतें. त्या सभेच्या वेळीं मंडळीस झालेल्या श्रमानें जर इतक्यांतच जरा येऊन राहिली तर मंडळी पुढें कसें कारणार!! पत्रकर्तेराव तहान लागली म्हणजे विहीर खणण्याचा जो क्रम तो दूरदर्शी मनुष्याला शोभत नाहीं. जी आमच्या वऱ्हाडची सभेच्या कामीं झटणारी मंडळी आहे ती विद्वान दूरदर्शी धनवान परमार्था साठीं आपल्या हिता विषयीं पराङ्मुख होणार व बाणेदार अशी आहे. व ही जी मंडळी आहे ती आमच्या वऱ्हाडचे भुषवण आहे. ह्या मंडळीला परमेश्वर चिरायु करो व तिच्या हातें आमच्या वऱ्हाडचें हित होवो. अशा प्रकारची मंडळी ईश्वरानें आम्हास दिली असून सध्यां मंडळी मध्यें शिथिलता कशी आली कां आली कोणजाणें! येत्या वर्षी राष्ट्रीय सभा भरण्याचा पाळी मुंबईस आहे. वऱ्हाडाला मुंबई जवळ आहे व वऱ्हाडची माहिती मुंबई कडे जितकी आहे तितकी उत्तर हिंदुस्थाना कडे नाहीं. आज वऱ्हाडांत जे नांवाजलेले विद्वान लोक आहेत ते सारे मुंबई युनिव्हरसिटी मध्यें परीक्षांत उतरलेले आहेत. ह्या मोठ्या विद्वान लोकांवरच काय तो वऱ्हाडच्या नांवाचा झेंडा अवलंबून आहे. गतवर्षी वऱ्हाडांतील पुढारी लोकांनीं जी वऱ्हाडच्या तर्फे राष्ट्रीय सभेमध्यें मजा करून सोडली त्यावरून त्या पुढारी लोकांच्या कीर्तिची सर्वांनीं वाहवा तर केलीच परंतु त्यांत वऱ्हाड प्रांताची ही झाली व गेल्या सालीं जितकी झाली त्या पेक्षां या सालीं ज्यास्त होणें हेच पुढारी मंडळीला व त्या प्रांताचें ते आज मीठ खातात त्या प्रांताला मोठें भूषण आहे. येत्या वर्षाची राष्ट्रीय सभा येत्या दिसेंबरच्या महिन्यांत मुंबई मुक्कामीं भरणार असें तिकडील वर्तमानपत्रावरून समजतें. असें असतां अद्यापर्यंत ह्या बाबतीत अगदीं सामसूम असणें म्हणजे अशी स्थिती फार दुःखकारक आहे. वऱ्हाड प्रांतांत आकोलें व उमरावती हे मुख्य जिल्हे असून ह्या जिल्ह्यांत जितका विद्येचा प्रकाश झालेले लोक आढळतील तितके ह्याच प्रांतांतील इतर जिल्ह्यांत आढळणार नाहींत. ह्या दोन जिल्ह्यांतील विद्वान लोकांच्या समागमानें इतर लोकांच्या मनावर ही प्रकाश पडून त्यांनाही आपलें हिताहित कळूं लागलें आहे. तेव्हां जी कोणती गोष्ट उत्पन्न होणें ती त्या जिल्ह्यांत पहिल्यांदा झाली म्हणजे नंतर इतर जिल्ह्यांतील लोक त्या गोष्टीचें अनुकरण करून त्यांना मदत देतात असें आहे म्हणूनच अजून इतर जिल्ह्यांत या बद्दल कोठें राष्ट्रीय सभे बद्दल कळकळ पूर्वक चळवळ तर राहूद्या, त्या बद्दल नुसतें कोणी कांही बोलतही नाहीं. असा शिथिलतेचा प्रकार मंडळा मध्यें उत्पन्न होण्यास काय कारणें झालीं असतील! अगर हा स्वभाविकच प्रकार असा आहे कोण जाणे. कसेंही असो, विद्वान पुढारी लोक हो! आतां ही संधी घालविण्याची वेळ नव्हे उठा; बांधा कमरा नी लागा गेल्या सालाप्रमाणें सभेच्या तरतुदीला. आरंभ शूर हें विशेषण आपल्या नावाला लावून घेऊं नका. कोणचीही गोष्ट एक वेळ करून मग मागें घेतल्यास त्यांत जितकें हासें होतें तितकें मुळापासूनच ती केली नाहीं तर त्यांत होत नाहीं. मुंबईची सभा सर्व राष्ट्राकरितां आहे. फक्त मुंबईकरितां नव्हे. त्या सभेला यश येऊन सभेच्या नियमित मागण्या सरकारांनीं कृपाळू होऊन कबूल केल्यास त्याचा अंश आपल्या वऱ्हाडच्या वाट्यास ही येईल. एव्हांपासून सभा भरविण्यास प्रारंभ करा. खेड्यापाड्यांनीं उदेशक पाठवा. सभा भरवा. लोकांना सभेपासून

यांचें हित समजावून घ्या. इंग्रजी न्यायी व दयाळू राज्यांत जितकी तुह्मी आपली सुधारणा कराल व राजनिष्ठपणानें वागून सरकारापाशीं विनंती करून आपलीं कामें करून घ्याल तितकी तुम्हांस मिळतील. जितकें जितकें तुम्ही अशा सार्वजनिक कामाच्या संबंधें झटावें तितकें तितकें सरकाराला वाटेल कीं तुम्ही आतां योग्य आहांत तुम्हांस राज्य प्रकरणीं गोष्टींचें ज्ञान झालें आहे. तेव्हां त्या बाबतींत तुम्हावर विश्वास ठेवून तुमच्या मागण्या कबूल करण्यास सरकार मागेंपुढें पाहणार नाहीं. जे तुम्ही पुढारी आहांत त्याजवरच सर्व भार आहे. आपण ज्याप्रमाणें या धड्यास शिकवाल त्याप्रमाणें इतर बाळबच्यास शिकतील. राष्ट्रीय सभेचे कामीं अडचणी कोणत्या ह्या लोकांना कळवा. राष्ट्रीय सभा हा पोरांचा खेळ नव्हे. या कामास अतोनात खर्च पाहिजे. हें काम एकाच व्यक्तीचे नव्हे. सर्वांनीं शक्त्यनुसार या कामास मदत केली पाहिजे व पुढारी लोकांनीं या कामीं विचारपूर्वक वर्गणीची मागणी केल्यास कोणी नाहीं ह्मणेल असें वाटत नाहीं. वऱ्हाडतर्फे राष्ट्रीय सभेला पैशाची मदत द्या. व वऱ्हाडतर्फे राष्ट्रीय सभेचा फंड म्हणून कांहीं वर्गणी जमा करून ठेवण्यास लागा. राष्ट्रीय सभेला दर वर्षीं कोणी ना कोणी नवीन शत्रु उत्पन्न होतातच. गेल्या वर्षी मुसलमान लोकांचे खूळ सर सय्यद यांनीं माजविलें होतें तरीही पुष्कळ मुसलमान लोक या कामीं झटले. व या वर्षी ही ते या कामीं झटण्यास मागें पुढें पहातील असें होणार नाहीं. हिरा जो असतो तो कोठें ही गेला तरी आपलें तेज प्रकट करितोच. तद्वत सत्याला जय मिळावयाचाच असा अनादिकाळा पासून सिद्धांत ठरलेलाच आहे. ह्मणून सभेच्या विरुद्ध कोणी कितीही ओरड केली तरी सभेच्या कामीं कळकळ बाळगणारे मि. केन, मि. ह्यूम मि. वारडन वगैरे बड्या बड्या मंडळींचें पाठबळ जो पर्यंत आहे तो पर्यंत कांहीं अडचणी येणार नाहींत. सालमकुरी मुंबईस कोणी कोल्वानी पारशी गृहस्थ आपले जात भाईंना या कामीं पडूं नये ह्मणून उपदेश करून त्यांचीं मनें वळवित आहेत. तरी त्याला या कामीं यश येईल असें वाटत नाहीं. कारण पारशी मंडळी विद्येनें अगोदरच पुढें आहे. त्यांचे विचार मोठ्या मनाचे आहेत. तेव्हां अशा अकुंचित विचाराचे मनुष्याच्या ह्मणण्याला अनुसरतील असें वाटत नाहीं. व चांगल्या कामाला अशा हमेश अडचणी यावयाच्याच कारण असें होऊन बाधा अंती व अडचणी अंती त्या कामाचें खरें स्वरूप बाहेर पडून मग तें काम अगदीं पक्कें होतें त्याच प्रमाणें जसें जसें राष्ट्रीय सभेला शत्रु अधीक भेटतात तितकें तिचें तेज अधीक पडत चाललें आहे. तर आतां लवकर त्वरा करून वऱ्हाडांत राष्ट्रीय सभेच्या कामास लागा. त्वरा करा. कळावें हे विनंती.

आपला
"स"

वऱ्हाडसमाचार.

मिती जेष्ठ शुद्ध ५ शके १८११

## वऱ्हाड ट्रेडिंग कंपनी

( सर्व भागिदारांस अखेरची विज्ञप्ति )

आह्मी मोठ्या आस्थेनें व उमेदीनें वरील कंपनीच्या सर्व भागिदारास विनंती करितों कीं, प्रस्तुत कंपनीच्या दुकानांत चाललेला व्यवहार प्रत्येकानें पूर्णपणें लक्षांत आणावा, व अखेरची दुकानाची इभ्रत व लौकिक राखण्याची संधि दवडूं नये. आज मितीला चालढकल झाली तर वरील दुकान समूळ विलयास गेलें असें आह्मी समजतों. साधारण रित्या पाहिलें असतां 'वऱ्हाड ट्रेडिंग कंपनी' सारखी कंपनी नवीन निघणें व एखादी जुनी बंद होणें या दोन्ही गोष्टी पासून देशाचें विशेष नफा नुकसान आहे अशांतला कांहीं एक पर्याय नाहीं. सचोटीनें व नेमस्त नफ्यानें ठरीव किंमतीना माल मिळण्या पलीकडे कंपनीच्या गिऱ्हाईकांचें कोणतेंही अन्य कल्याण होत नसे ह्मणजे आबाल वृद्धांस सुलभ रीतीनें आपल्या पैशाचा योग्य मोबदला मिळत असे व बाजारांत प्रसंगोपात होणाऱ्या फसवणुकी पासून सुटका होत असे. आज अकोल्यांत ठोक ठोकें दुकानें आहेत तेव्हां कंपनीचे दुकानाची विशेष मातबरी नको. लोकांस सकृद्दर्शनी थोडीबहुत गैरसोय वाटेल परंतु कांहीं वेळा नंतर कंपनीच्या दुकानाची आठवण करण्यासही कारण उरणार नाहीं.

येथील 'वऱ्हाड ट्रेडिंग कंपनी' चे हें दुकान बंद झालें तर आह्मांस फार वाईट वाटेल त्याचीं कारणें अगदीं निराळीं आहेत. अकोल्यांतील चार संभावित गृहस्थांनीं आपल्या इष्ट मित्रांच्या सल्ला मसलतीनें ही कंपनी सन १८८१ सालीं प्रथम स्थापिली तेव्हा वऱ्हाडांत सचोटीनें व्यापार करण्याची एक नवीन शाळा सुरू झाली हें पाहून आह्मास मोठा आनंद वाटला. हा नवीन व्यापाराचा मार्ग लोकांस पसंत पडला आणि त्या प्रमाणें आपण सध्यां वऱ्हाडांत जिल्ह्या जिल्ह्यांतून ट्रेडिंग कंपन्या चाललेल्या पहात आहों. अशा उत्कर्षाच्या वेळीं वरील मूळ कंपनीचा अस्त होणें ह्मणजे संस्थापकांच्या एवढ्या मोठ्या कृत्याचें बीज तें काय! आरंभशूर असण्यांत आह्मांस विशेष नवल वाटत नाहीं. कंपनी सारख्या संस्था सदासर्वकाळ अव्याहत चालल्या तर त्या लोकाश्रयास पात्र होतात, नाहीं तर अशा एकत्र केलेल्या भांडवलाच्या व्यापारांत लोकांचा विश्वास रहात नाहीं आणि त्यामुळें हल्लीं चालू असलेल्या कंपनीच्या व्यापारास मोठा धक्का पोंचण्याचा संभव आहे.

आकोल्यांतील ट्रेडिंग कंपनीचें आस्त्या चहोंकडे पसरली आहे अशा वेळीं तिचा नामर्दपणा व मुलचेंडरी अव्यवस्था दाखविण्याचा प्रसंग आला आहे ह्मणून आह्मी फार दिलगीर आहों. सन १८८१ साला पासून आज तारखे पर्यंत सगसरी ८ वर्षांत या कंपनीचें निवळ नफ्यान मुद्दल भरून येत आहे तेव्हां या पेक्षां विशेष फलप्राप्तीची आशा आह्मी ठेविली नाहीं व ती ठेवणें रास्तही होणार नाहीं. व्यापार वेळेनुसार आंगलट आला असतां डगमगून चंबु गबाळें गुंडाळण्याचा बेत करणें हें खरोखर मोठें लांछन आहे. व्यापाऱ्यांनीं पोक्त विचार व दूरदर्शीपणा सोडिला असतां तर आजकाल कित्येक पेठा ओस पडल्या असत्या. कंपनीचे व्यवस्थापकांनीं जेरीस येऊन भागीदारांपुढें हात टेकले तेव्हां भागीदार लोक आरंभलेल्या कामांत नालायक आहेत असें ह्मणण्यास लोकांना प्रत्यवाय दिसत नाहीं. व्यवस्थापकांनीं सभा भरविण्या बद्दल निमंत्रण चिठ्या पाठविल्या असतां भागीदारांच्या न जाण्यामुळें सभा भरूं नयेत हा केवळ व्यवस्थापकां समोर वेडगळ त्रागा करण्या सारखें होणार आहे. असो. बलोवेळ कंपनीची चांगली वाईट व्यवस्था आम्ही लिहीत आलों आहों व तिच्या अभिवृद्धीची जपणूक हातीं घेतली आहे तेव्हां प्रस्तुतची हेळसांड व गैरव्यवस्था इत्थंभूत देऊन कंपनीस अखेरची सलामी देण्याचा प्रसंग न येवो एतदर्थ सर्व भागीदारांनीं काया वाचा मनें करून कंपनी सुस्थितीला आणून पोंचवावी म्हणजे या लांबलेल्या लेखा बद्दल आम्हीं स्वतांस कृतकृत्य व धन्य मानूं.

## प्रो० ब्यारेट साहेब डायरेक्टर होणार!

(आमच्या एका मित्राकडून लिहून आलेले विचार)

आमचे वैदर्भ देशीय विद्याधिकारानियुक्त लोकप्रिय रावबहादूर श्रीराम भिकाजी जटार बी. ए. हे या आमच्या विदर्भ देशाची हवा मानवत नसल्यामुळें सव्वा संवत्सरपर्यंत रजा घेऊन गेल्याचे कोणास कळलें नाहीं! त्यांच्या मागें त्यांनीं आपली अधिकार सूत्रें मिस्तर एटकिन येथील हायस्कुलचे हेडमास्तर यांच्या हातीं देऊन एक महिना झाला. इतक्यांत प्रोफेसर ब्यारेट साहेब या जागीं येणार अशी गावांत दाट वदंता उठली आहे व ती खात्रीची आहे असें लोक ह्मणतात. जर या बातमींत कांहीं सत्य असेल तर ही गोष्ट ब्रिटिश न्यायाला अनुसरून आहे असें ह्मणण्यास आमची लेखणी मागें घेते. कारण इतके दिवस आमची अशी समजूत होती ( व तशी असणें हें रास्त आहे ) कीं हा अधिकार सरकारानें आम्हा हिंदुलोकां करतां राखून ठेवला होता; व या आमच्या समजुतीला पुष्टीकरणें इतकीं मिळालीं कीं ती समजूत बहुधा कायमची झाली होती पण आमच्या सरकारानें आपल्या अद्वितीय न्यायाच्या मासल्यानें आमची चुकी आमच्या पदरांत घातली. मि० ब्यारेट साहेबांस या जागीं नेमण्यांत सरकारचा कोणता दूरवरचा उद्देश आहे हें साधारण अक्कलेच्या मनुष्यास कळण्या सारखें नाहीं. जर या जागीं युरोपियन गृहस्थ नेमावयाचा होता तर येथें ह्मणजे तसा गृहस्थ कोणी नव्हता असें मुळींच नाहीं. उलटें वऱ्हाड शाळा खात्यांत तहत वीस बावीस वर्षें नेमस्तपणानें मोठ्या हुद्याचें काम करणारा व अर्थात इकडच्या लोकांच्या रितीभातीना अभिज्ञ तसाच अनुभवीक सरळमार्गी एक गृहस्थ तयार होताच. आमचे विद्यागुरू मि० एटकिन हे नुकतेंच आमच्या मनोदयानुरूप आक्टिंग डायरेक्टर झाले होते तोंच या गृहस्थाच्या हक्काची पायमल्ली झाली हें पाहून आह्मांस दुःख वाटतें. विद्या खात्यांत इतकी वर्षें सारखें एकाच जागेवर रहाणें किती कठिण आहे हें त्यानांच विचारलें पाहिजे. तसेंच जर आमच्या समजुती प्रमाणें नेटिवांना ही जागा द्यावयाची होती तर आमच्या प्रांतांत विद्याखात्यांतच एक गृहस्थ होते. त्यांची योग्यतां किती आहे व तें या मानास व अधिकारास किती पात्र आहेत हें सर्व विश्रुत आहेच. यांच्या अव्याहत श्रमाला खरोखर कांहीं सीमा नाहीं. विद्वत्तेला तर मोल नाहीं. सारांश यांच्या सारखे नेटिव गृहस्थ त्या पदवीच्या अगदीं जवळ असतां व तसे एक युरोपियन अनुभवीक उदारात्मे व मेहनती गृहस्थ तयार असतां आमच्या डायरेक्टरशिप बाहेरच्या युरोपियनच्या गळ्यांत माळ का घातली हें आह्मांस अगम्य होय. तरी आतां येणारे गृहस्थ ह्मणजे अगदींच वाईट आहेत अशांतला अर्थ नव्हे. ते विद्वान आहेत. पाठशाळांत इतके दिवस ते प्रोफेसर होते त्यांची इंग्रजी भाषापारंगतता त्यांचें 'इडियमचे पुस्तक' सांगत आहे. पण त्यांच्या नेमणुकी पासून आह्मा वैदर्भदेशीयांना उपयोग फार थोडा होईल. कारण ते तर इकडे अनभ्यस्त. आमच्या प्रांतांत सगळें शाळा खातें नेटिवमय आहे. आणि त्यांचा संबंध सर्वदां नेटिवांशीं पडणार तेव्हां त्यांना थोडेसें अवघड जाईल. असो तर एकंदरींत या नेमणुकींत (जर खरी असेल तर) सरकारानें हक्क व विद्वत्ता या कडे अगदीं लक्ष्य दिलें नाहीं असें आह्मास ह्मणावें लागतें. राव बाहदुरांनीं पेनशन घेतल्यावर कायमच्या नेमणुका करतांना तरी सरकार या सर्व गोष्टींचा विचार करील अशी आशा धरून आह्मी येथेंच थांबतों.

या महिन्या पासून खालीं लिहिल्या प्रमाणें मुंबई कडे जाणाऱ्या येणाऱ्या गाड्यांत फरक होईल. दुपारीं मुंबई कडे जाणारी गाडी २ वाजून १९ मिनिटांनीं व रात्रीची गाडी २ वाजून ५ मिनिटांनीं जात जाईल. दुपारीं मुंबईहून १-१० ला निघणारी मेल

गाडी रात्रीं दहा वाजतां निघत जाईल व भुसावळेस दुसरे दिवशीं सकाळीं साडेसहा वाजतां पोहोंचत असे ती सव्वा नऊ वाजतां पोहोचत जाईल. भुसावळेहून मुंबईला जाणारी मेळ सात वाजतां संध्याकाळीं निघून मुंबईस दुसरे दिवशीं सकाळीं सात वाजतां पोहोचेल. या फेरफारांत विशेष लक्षांत ठेवण्या सारखी गोष्ट ही आहे कीं, येथून रात्रीची मुंबई कडे जाणारी गाडी भुसावळेस गाडी न बदलतां थेट मुंबईस जाईल; व दुसऱ्या गाडीनें जाणारास भुसावळेस गाड्या बदलाव्या लागतील.

The Berar Samachar

MONDAY JUNE, 3, 1889.

## HOW TO UTILIZE THE SURPLUS OF 20 LAKHS?

Financially considered this province is a great success. It enjoys a unique position. It is under the British Government as completely as the Bombay or other presidencies. It is managed on the same principles as guide British policy in the regulation-provinces; and although the machinery is so very expensive there has been for the past three years a surplus of twenty lakhs annually. All this money, it was announced made over to the Nizam. Now the question arises why should this money— this surplus of 20 lakhs annually-go to the Nizam. At first sight this would appear to be a foolish question; for the answer to it is that it should go to the Nizam because the Nizam is the *Malick* of this country and whatever is left after being spent on the provinces must be handed over to him. But we suggest the question in quite another spirit. What we mean is that the so-called surplus ought never to be a surplus at all. The so-called surplus arises only on account of the Government not spending the money on so many things that are yet wanted in the province. It will be readily admitted that if the Government is handing over moneys to the Nizam without regard to the needs of the province, that is a great mistake. The province is now held under the treaty of 1860 A. D. with the Nizam under which the British Government has to render no account to the Nizam as to receipts and expenditure, but if there is a surplus at all the Government hands it up to the Nizam. This was on account of the treaty of 1853 being cancelled. Now there are various reasons why Government should not hand over the surplus and one of the most cogent is that there are many requisites in the province which are not cared for by Government. The province is we know a trust; but the trustee may not certainly show his overscrupulousness by stinting any expenses necessary to the keeping up and the improving of the estate. We shall presently show what are the necessities of the province; but there is also another reason why the money may not be given over to the Nizam. If the money goes to the Nizam's treasury it is simply misspent so far as our province is concerned. The money locally raised ought so far as possible be locally spent.

We are of course going all along on the supposition that the so-called surplus is not taken up for any purposes legitimately connected with the treaty of 1860. If it were to appear that there were some imperious necessity or some political reasons for appropriating the surplus we would of course have nothing to say; but we take matters as they are and we argue on the understanding that the surplus would be a surplus for years to come, and would be handed over to the Nizam from year to year.

There are among other things two important things that may be said to be yet neglected in the province. Public Works, Education — primary and technical- are things on which money may be spent. The roads that connect the district centres are not generally metalled and the Akola to Bassim road is one of the finest specimens of what a bad road should be. The money spent at present on the roads is so much money wasted. Traffic in cotton and other things having increased— at any rate in the number of carts that go and come there is a very great necessity of good metalled roads. Then the roads ought to have shade over them and for this it is necessary to plant trees by the roadside. Especially in a province like Berar the need for shaded roads cannot be gainsaid. More roads are also wanted throughout the province. Bridges are also necessary in some places. A bridge between Damargaon station on the Nagpur line and Yeotmal is a great necessity. In the monsoons particularly the want is felt very keenly. A bridge between Elichpur and Amraoti has been only lately undertaken. So much for the necessity of an increased expenditure on the Public Works Department.

That one of the greatest blessings conferred upon this country is education is a fact that has been so often gratefully acknowledged. Since the Government established an educational department in the province, education has made pretty progress. But even now the masses are so stupid and ignorant that there is great need of primary education is the one thing on which no Government can ever spend too much Government is under a bounden duty, with a redundant surplus, to increase the budget grant of expenditure on primary education. The money so spent will be to the interests of the present ruler and to that of its future ruler if it ever comes to be handed to the Nizam at all. In fact the Nizam's government ought to be thankful for an increased expenditure on this head.

Now as regards Technical education, we must say Government has not at all acted with a spirit of liberality. Under the tentative arrangements with the Reverened Mr. Fuller of Akola certain ordinary crafts are being imparted to the students; but the Government can not be said to have done its duty by the people of the province in making that make-shift apologetic arrangement. The cotton industries and the industry in oil seeds ought to be taught practically established in schools for that purpose. There is plenty of raw material in the province which for want of proper knowledge how to manipulate it into wearable stuff, has to be sent out to England. Now if people got an insight into spinning and weaving industries in government schools, that would be a great advantage gained With surplus in hand, why stint such necessary things.

The above will show that the surplus could be utilized for such and other useful purposes. Indeed it can only then be legitimately called a surplus when these and other necessities of the province have been satisfied.

'Female Education' is a catch-word of modern reformers and they often try to quote something from standard authorities in other matters to fasten their views to the typical remarks that a philosophical foreigner will make without much attention to the glorious past of our Hindu Nation and to her deteriorated status in social circumstances. The following opinions which we cull from Sir W. Scott's address from the chair when he presided at a prize distribution the other day will exemplify the mode of handing such subjects that a neutral yet prudent well-wisher will adopt:-

'The necessity of education for boys has long been admitted. The expediency of school training for girls is still a debateable point with a large portion of the Native Community, and it is of the utmost importance that the education given to girls should be as good as possible. It is the sure method of ensuring the extension of the Female School-system. Public opinion has considerably changed already on the subject, and it will gradually yield altogether as the good results become known. It is difficult to understand the objection to female education when we remember how naturally and readily children take their impressions from the influences that surround in their houses-how their educators are their parents in their home-life and above all their mothers - it is impossible not to realize the cardinal importance of education to the girls of this generation who will be the mother of the next. I might go much further and say that woman is the educator of man from infancy to old age, and ought to be able to under stand every thing her husband is likely to know.

'Education includes physical as will as intellectual and moral training. The first requisite to success in life is physical health and strength and a robust physique is better than any amount of learning. Ruskin says:— " The first of our duties to her is to secure for her such physical training and exercise as may confirm her health and perfect her beauty the highest refinement of that beauty being unattainable without activity and strength.

'I fear the customs of Hindu social life tend very much to shorten the period of school attendance. The Education Commission says in their report - the whole of an Indian girl's instruction is comprised within the brief years of her attendance at a primary school.' and they add that they mostly leave at the age of ten. The main object of school instruction is to teach the pupil to instruct herself But how can that be done before the age of ten? Quick and clever as Hindu girls are, the age is too tender for any permanent effect to have been produced.'

We are told to prepare ourselves to welcome Professor A. Barret as our officiating Director of Public Instructions; but we shall take some time to do so because we mean to bring a protest against the sheer injustice done in this matter.

## वऱ्हाड.

उमरावतीचे डे० ए० इ० रा० रा० गाळकृष्ण लक्ष्मण बापट हे प्रकृती बिघडल्यामुळें बुलढाण्यास रजेवर गेले आहेत ति-

कडे यांस चांगला आराम पडून प्रकृति उत्तरोत्तर सुधरत आहे. त्यांच्या रजेत रा० रा० श्रीधरपंत पिंपळखरे डेपुटी इन्स्पेक्टराचें काम पहात आहेत.

कर्नल आर बुलक डेपुटी कमिशनर वर्ग १ हे तारीख ९ एप्रील पासून फर्लोवर गेल्या मुळें कर्नल एफ डब्ल्यु ग्यांट डेपुटी कमिशनर वर्ग २ यांस दुसरे वर्गाचे डेपुटी कमिशनर, आणि मि. ए. ईलियट पहिले वर्ग असि० कमिशनर व स्पेशियल असि. कमिशनर उमरावती यांस तिसरे वर्गाचे डेपुटी कमिशनर नेमण्यांत आलें आहे.

मि. ए ईलियट साहेबांनीं आपलें स्पेशल असिस्टंट कमिशनरचे काम सोडल्या मुळें तारीख १८ येप्रोल पासून क्याप्टन जे. मी मारिस असि. कमिशनर वर्ग १ यांची उमरावतीस स्पेशल असि. कमिशनरचे अधिकारावर बदली झाली आहे. आणि वस्तुर एदलजी बहिमनजी कायमचे तिसरे वर्ग असि. कमिशनर यांस पहिले वर्गाचे असि. कमिशनर नेमिलें आहे.

चालुं सालीं उमरावतीस भरणाऱ्या गुरांच्या प्रदर्शना संबंधानें योग्य व्यवस्था लावण्यासाठीं मे. ईलियट साहेब डेपुटी कमिशनर हे येत्या शनिवारीं उमरावतीस ठिकठिकाणच्या प्रमुख गृहस्थांस निमंत्रण दिल्या पाठवून सभा भरविणार आहेत. साहेबांची अशा लोक कल्याणाच्या कामांत दक्षता व उत्सुकता पाहून आम्हांस मोठा आनंद वाटतो.

चुकीची दुरुस्ती— गेल्या अंकांतील तिसऱ्या पानावरील अखेरच्या कालमांत 'चंद्रकांत' छापखान्याच्या मालकाची सही 'तयबअली महंमदअली' पडली आहे तेथें 'महंमदअली तयबअली' असें समजावें.

### मागाहून आलेली नोटीस.

रा. रा. हरीकृष्ण पांडुरंग राव देशपांडे अज्ञान पालन करणार मनकर्णिका बाई प्रगणे बाळापूर यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुम्ही मनकर्णिकाबाई जवजे शामरावचे दत्तकपुत्र अशा नात्यानें ऐनुमाचा पैसा मागता तर तुमचा आमचा दिवाणी कोर्टांत वाद सुरूं आहे या वादाचा निकाल झाल्या वांचून तुम्हास पैसा देण्याची आमची हरकत आहे. मनकर्णिकाबाईस पैसा द्यावा तर बाईस दिलेला पैसा तुम्ही दाव्यांत मागण्यांत शरीक केला आणि मनकर्णिकाबाई तुम्हास दत्तक घेतल्याचें म्हणतात सबब बाईलाही पैसा देता येत नाहीं जर तुमची उभयतांची मर्जी पैसा घेण्याची असल्यास अखेरीस तुमचे विरुद्ध निकाल झाल्यास पैसा आम्हास वापस देण्या बद्दल पोरटलाक किंवा पानाबंद यांची जमिनी द्यावी म्हणजे पैसा देऊं. तुम्ही असें न करितां फिर्याद केली तर आम्ही खर्चाचे जबाबदार होणार नाहीं. तारीख ३१ माहे मे सन १८८९ इ०

(सही.)

नारायण रामचंद्र अज्ञान पालन करणार मातुश्री भिमाबाई जवजे रामराव देशपांडे प्रगणे बाळापूर द. व्यंकटराव मल्हार कुल मुखत्यार.

## वर्तमानसार.

ठाणें जिल्ह्यांत ज्या मासल्याचा नुकताच एक खटला झाला होता व त्याचा निकालही झाला त्याच मासल्याचा खटला नुकताच मद्रास इलाख्यांतही घडून आला. बल्लारी येथें १८८७ सालीं म्याट्रिक्युलेशन पी. इ. ची परीक्षा झाली त्या परीक्षेस कोणी अबसालम डेव्हिड नांवाचा मुलगा व्ही. ए. डेवीड या नांवानें परिक्षेला बसला होता. हें या मुलाचें वर्तन बाहेर पडून त्यांस खोटें नांव सांगून परिक्षेला बसल्या बद्दल व खोटा कागद केल्याबद्दल असि. से. जज्जानें शिक्षा दिली व ती हाय कोर्टांत कायम झाली असल्या प्रकारचे गुन्हे अलिकडे बरेच होऊं लागले व याचें कारण शोधूं गेल्यास मनुष्यास चाकरी वाचून दुसरा मार्ग उरला नाहीं व परिक्षेशिवाय चाकरी तर लागत नाहीं व परिक्षा उतरणें हें ही अलिकडे जुगारासारखें झालें आहे तेव्हां कांहीं तरी करून पोटाला मिळविण्या करितां असले गुन्हे होत असावे असें अनुमान आहे.

मुंबईच्या गिरण्यांच्या कायद्यांत कांहीं फरक करण्याचा विचार विलायतेस चालूं आहे. ज्यांत १०० माणसें आहेत अशा कारखान्यांस हा आक्ट लागूं आहे. पण नवा २० माणसांच्या कारखान्यांस लागूं होणार. वयाची इयत्ता ९ वर्षे होणार. कामाची मुदत ११ तास होणार. असें कांहीं फरक होणार असें दिसतें. हें झाल्यास मांचेस्टरचे गिरणीवाले हेच आमचे खरे राजे असून स्टेट सेक्रेटरी वगैरे त्यांचे गुमास्ते आहेत असें होईल. कारण त्यांच्या ह्मणण्या प्रमाणें स्टेट सेक्रेटरी या कायद्यांत फरक करणार.

ठा० अ०

हैद्राबाद येथें एक बोल्झार्क नांवाचे साहेब आहेत यांनीं अलीकडे उद्योग धंद्याचे पुनरुज्जीवन कसें करावें याबद्दल मोठ्या आस्थेनें चर्चा सुरू केली आहे. साहेबांचे लेखांत मुख्य तीन मुद्दे आहेत. पहिला मुद्दा सरकारानें उद्योग धंद्याची सांप्रत स्थिति काय आहे याचा चवकशी करावी असा आहे. दुसरा मुद्दा धंद्याचे उज्जीवन होण्यास लोकांनीं काय केलें पाहिजे हा आहे व तिसरा या कामीं पैसे लागतील ते सरकारानें फ्यामिन इनसुअरन्स फंडांतून द्यावे. हिंदुस्थान सरकारनें या विषया बद्दल थोड्या दिवसापूर्वीं एक ठराव प्रसिद्ध केला आहे त्यांत बोल्झार्क साहेब ह्मणतात त्या प्रमाणें चौकशी करावी अशी सूचना आहेच. आपल्या लोकांनीं "धंद्याचें उज्जीवन करण्यासाठीं ह्मणून एक मंडळी स्थापावी अशी त्यांची दुसरी सूचना आहे." ही अंमलांत आणल्यास फारशी अडचण नाहीं. परंतु मंडळी स्थापन केल्यावर तिचें काम कशा धोरणावर चालावें व ते कोणी चालवावें. हें ठरणें फार कठीण आहे, तिसरी सूचना आहे ती व्यर्थ आहे अशी आमची समजूत आहे. या सूचनेचे ऐवजी आमची प्रति सूचना अशी आहे कीं, दरसाल सार्वजनिक सोयीचीं कामें करण्यासाठीं ज्या प्रमाणें सरकार कांहीं भांडवल कर्जाऊ काढतें त्या प्रमाणेंच देशांत द्रव्योत्पादक धंदे सुरू करण्या साठीं सरकारनें भांडवलासाठीं कर्ज काढावें.

शि० वि०

आरमार वाढविण्याबद्दल जें बिल पार्लमेंट सभेपुढें आलें होतें. तें ता. २० रोजीं बहुमतानें पसार झालें. यावरून यंदा इंग्लंडही आरमार वाढविण्याच्या तयारीस लागणार. युरोपांतील सर्व राजांनीं आपआपल्या फौजा वाढविल्यामुळें इंग्लंडला असें करणें भाग आहे.

ब्रह्मदेशांतील लोक इतक्यांत नाखुष झाले असून ते इतक्यांतच या राज्यास कंटाळले आहेत असें ह्मणतात. हें खोटें का खरें असा मि० ब्राडला यांणी पार्लमेंटांत प्रश्न केल्यावरून तशा प्रकारची नाखुषी असल्याचें सरकारास मुळींच माहीत नाहीं व हें खरें कीं खोटें अशाबद्दल निदान चवकशी ही करायास सबळ कारण नाहीं असें हिंदुस्थानच्या अंडर सेक्रेटरीनें बोलून दाखविलें. चवकशी करण्याचें मुळींच कारण नाहीं असें आह्मी ही ह्मणतो. चवकशी करून काय फलप्राप्ती होते तें नेटिवांस माहितच आहे.

कुचबिहारच्या महाराजांच्या मनांत कनिया वाली या ठिकाणापासून आपल्या राजधानीपर्यंत वीस मैल लांबीची एक रेल्वे करण्याचें आहे व त्यांणी सरकारास आपला तो इरादा कळविल्या वरून सरकारांत त्याविषयीं विचार चालू आहे.

काशीच्या आहीर व दर्जी लोकांनीं आपल्या जातींत कट करून मद्यप्राशन सोडून दिलें हें कळविण्यास फार आनंद वाटतो. ब्राह्मणेतर जातीनें असा कट करून ब्राह्मणांनीं उघड दारू प्यावा हें लाजिरवाणें नव्हे काय?

आपले जमिनीचें तंटे आपसांत तोडण्याकरतां बंगाल्यांतील जमीनदार लोक आपसांत एक पंचाइत कोर्ट स्थापन करीत आहेत.

ठा० अ०

आह्मांस लिहिण्यास आनंद वाटतो कीं 'दीनबंधु' चे प्रकाशक रा. रा. नारायणराव मेघाजी लोखंडे यांचा विवाह रा. सखारामजी शिंदे यांची कन्या सिताबाई इजबरोबर गेले रविवारी रात्रौ मि० जोतीराव गोविंदराव फुले यांचे हातून सत्यशोधक सभेच्या मताप्रमाणें करण्यांत आला. मंगलाष्टकें ह्मणण्या करितां मि० फुले यांणी कांहीं मंडळी मुद्दाम तयार करविली होती. हा अपूर्व लग्न विधी पहाण्याकरितां लोकांची फारच गर्दी झाली होती. जातिभेद मोडण्यासाठीं व्यर्थ प्रयत्न 'दीनबंधु' नें पुष्कळ केले परंतु त्यांच्या वाणीप्रमाणें ब्राह्मणांची खोड मोडिल तेव्हां खरें! रा. जोतीबा फुले हे गृहस्थ ह्मणजे नेटिव मुक्तिफौजचा भगवा झेंडा मिरविणारे कट्टे मराठे आहेत.

दी० बं०

लंकेंत वेश्यांचा धंदा दिवसेंदिवस फैलावत चाललेला पाहून सरकारास लोकांच्या नीतीबद्दल काळजी पडली आहे व थोड्या दिवसापूर्वीं तेथें असा कायदा करण्यांत आला आहे कीं जी कोणी स्त्री वेश्येचें दुकान राजरोस घातलेली आढळेल तिला पहिल्या खेपेंत ३ महिने कैद व २०० रु० दंडपर्यंत शिक्षा होईल, पुन्हा हा अपराध करतांना ती सांपडली तर पहिल्याच्या दुप्पट शिक्षा होईल.

क०

ब्रह्मी लोकांची वर्षप्रतिपदा—नवीन वर्षारंभीचा उत्सव ब्रह्मी लोक तीन दिवस करितात. त्यामध्यें मुख्य प्रकार जलारंगाचा फार. तिन्ही दिवसभर बायका व पुरुष हे एक मेकांवर पिचकाऱ्या किंवा जलधारा करून आनंद करीत असतात. हें करणें परस्पराचा स्नेह व गोडी यांचें दर्शक चिन्ह आहे, असें ते लोक समजतात. हिंदू लोकांतील विजया दशमीचे सोनें वाटणें, व मकर संक्रमणाचे दिवशीं तिळगुळ घ्या आणि गोड बोला अशी विनंति करून शर्करा युक्त तिळ वाटणें या चालीसारखीच ती ब्रह्मदेशांतली चाल होय

म० मि०

*K. B. Rele and co.s' most efficacious.*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांडुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतीच्यें पोटांत दुखणें, वायु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, महीशीं होऊन तोंडावर टवटवी येतें मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२ परम्यावर खात्रीचे वस्ताद औषध.

हें बिनचीक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा किती ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हें वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

चट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा घाय इ० मिटविणारे मलम कायतें हेंच किं० ८ आणे.

७ खोकल्यावर अचूक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसे, दमा नाती, क्षयाचा,, डांग्या वगैरे खोकला सारख्या खोकल्यांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरे होतात. किं. १२ आणे.

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप, जीर्णज्वर, थांवर तर हे रामबाण आहे जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापांवर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, थांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हें कधींच मागें हटलें नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांश:—

"के. बी रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिलीं. तीं फार गुणकारी असून निर्दोष आहेत.

( सही ) डाक्टर बि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी."

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसें, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेलें मलम, साबु, पॉमेटम, टिंकचर्स, सलाईन्स, इनोज, फ्रूट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारी औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध यांस लागणारे उत्तम गारेचे चश्मे, मुंबईंत असल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्हाल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

पत्ता. के. बी रेळे कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
काळबादेवी- पटेल स्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

सर्व स्त्रीशिक्षणेच्छू लोकांनीं अवश्य घेण्याजोगें मासिक पुस्तक.

## गृहिणी.

( कुलवधूच्या ज्ञानवर्धनार्थ व मनोरंजनार्थ मासिक पुस्तक. )

ह्या मासिक पुस्तकाचे आजपर्यंत पंचवीस अंक निघाले व एप्रिल महिन्यापासून तिसऱ्या वर्षास आरंभ झाला. यांत स्त्रियांचीं चरित्रें, नीति, आरोग्य, पाकशास्त्र, शिवणकाम व स्त्रियांस इतर अवश्य वाचण्यालायक विषयांचा समावेश केला जातो. याची सालिना वर्गणी मुंबईत १॥ व बाहेरगांवचे वर्गणीदारांस टपाल ह. निराळे २ आणे पडतील.

विशेष सूचना गरीब शिक्षक लोकांस हें मासिक पुस्तक ट. ह. सह एकरुपयास दिलें जाईल.

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं पैसे व नांवें खालील पत्यावर पाठवावींत.

वर्गणीदार मिळवून देणारांस योग्य कमिशन दिलें जाईल.

पांच प्रती एकदम घेणारांस एक अंक फुकट दिला जाईल.

म्यानेजर गृहिणी,
सुबोधप्रकाश छापखाना मुंबई.

☞ हें पत्र अकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

डाकखर्च ॥ ७ ॥ ०८
किरकोळ अंकास.............................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ........०१

Per annum ...
Per annum in arrears 7 "1Rs. 8 as.
Six monthly............3 ½ 8 as
Single copy..................................4as

Advertisements
Below 10 lines...2Rs
per line over10... 4a.
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY 10 JUNE 1889 NO. 22

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख १० माहे जून सन १८८९ इ० अंक २२

CALCUTTA ART STUDIO

185 *BOWBAZAR STREET.*

**PICTURES PICTURES PICTURES**

PUBLISHED FROM THE FAMOUS

CALCUTTA ART STUDIO.

About 200 sorts of beautifully colored Hindu mytho pictures are for sale at half price till 30 th Vadra 1296 the next Dusserah Festival.

Particular advantages are held for purchasers of Rs. 5 worth pictures who will receive in addition gratis three pictures of Hindu gods and goddesses and two portraits of the Viceroy and Lady Lansdowne.

Every facility would be afforded to mofussil purchasers in sending to them the pictures free of packing and postage charges. Price lists sent free on application. This is the cheapest chance ever afforded to the Hindu public in securing admirable Hindu sacred pictures at a more nominal charges.

As it is expected that there will be a general rush for these pictures, purchasers are requested to apply soon in order to avoid disappointment by an early disposal of the stock.

All orders by V. P. Post should advance the cost of the V. P.

Pictures worth less than a rupee cannot be sent in V. P.

CALCUTTA ART STUDIO 185 Bowbazar Street. CALCUTTA. | N. BISWAS. Manager

## गरमीचे रोगावर औषध.

शरीरांत गरमी होऊन धातु बिघडतें व तो स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होतें. झोंपेंत व मूत्र समई पतन होतें परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह वगैरेकरून अनेक पीडा होतात हा रोग ज्यांस आहे त्याणी अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

## अन्न पचन होण्याचें औषध

अन्न पचन नाहीं त्यांस मळमूत्र साफ होत नाहीं. पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन मळमळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेव पांढरे रंगाची पडेत, शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते. हा रोग ज्यांस आहे त्याणी पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये डाक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

*K. B. Rele and co.s' most effic acious. PREPARATIONS.*

### १ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांडुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वप्नावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतीच्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या सेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येते मज्जातंतूस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

### २ परम्यावर खात्रीचें वस्ताद औषध.

हें बिनधोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा किती ही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

### ३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हें ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

### ४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध.

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

### ५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हें वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

### ६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

घट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा वाय इ० मिटविणारे मलम कायतें हेंच किं० ८ आणे.

### ७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतो, पडसे, दमा जातो, क्षयाचा,, डांग्या घशांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे.

### ८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप, जीर्णज्वर, ह्यांवर तर हे रामबाण आहे जंगल किंवा म्यालेरियल नांवाच्या तापावर हें वस्ताद आहे. ह्यानें भूक लागते अन्न पचते. किंमत १२ आणे.

### ९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हें कधींच मागें हटलें नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांशः—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेली सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिली. तीं फार गुणकारीं असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर बि. वि. गोखले,
"एम. ए. एम. डी."

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषध शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेलें मलम, साबू, पॉलिश, टिंकचर्स, सल्ट्स, इनोज, फ्रुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारी औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुबईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबराचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्याल्युपेएबल पार्सलानें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

पत्ता. के. बी. रेळे कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल ट्यांकरोड मुंबई
हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

सुशिक्षित तरुणांनीं काय करावें:—

सा० न० वि० वि०.

ह्या विषय किती अगत्याचा आहे हें येथें सांगण्याची फारशी जरूर आहे असें नाहीं. सध्यांच्या काळीं राजसेवा करून उदर निर्वाह करण्या कडे ज्याची त्याची प्रवृति. एकदां विद्या देवीचा वर प्रसाद घेऊन निघाले कीं उदर पुर्तीची कांहीं तरी तजवीज करून स्वस्थ केलेल्या श्रमाचा फलोपभोग नेतो घेऊं लागतो. उत्पत्ति, स्थिती, लय, या तीन आवस्था जर साऱ्या जगास लागू आहेत तर बिचारा युनिव्हरसिटीचा ग्र्याज्युएटच कां त्यांतून सुटावा? तोहा सुटत नाहीं. त्याला ही या तीन स्थिती भोगाव्या लागतात पण हा जगाचा साधारण नियम आमच्या राजविद्याविभूषितांचा मार्गनिरोध करतोच कोठें! तर आमच्या तरुणजनांनीं जसें होईल तसें होऊंद्या' या साध्या मंत्राचा जप करीत बसावें हा मंत्र तर प्रत्येक जण घेतोच त्यांत विशेश ते काय आहे. पण ज्यांच्या आशा द्रुमास कोठें नुकतांच किसलयोद्गम येत चालला आहे त्यांनीं या मंत्राची संथा घेण्यांत काय अर्थ आहे. कांहीं तरी पयत्न केला पाहिजे! उदरपुर्ती तर श्वान ही करते, मग आम्ही श्ववृत्तिधारण करून ओंचभर खळगा भरून काढण्यांतच इतिकर्तव्यता समजावी यांत तें काय पौरुषत्व. यांत तें काय जन्माचें सार्थक्य. देश जननीची सेवा केली नाहीं तर त्या विद्येचा व त्या ऐटीचा तो उपयोग काय. नुसती पदवी मिळविण्यांत सर्व सावले असें समजणें धाडसाचें तर खरेंच पण थोडेसें गर्वाचें ही लक्षण आहे.

हा काळ भरत खंडांत मोठा मजेचा आहे. जुने नवे, वृद्ध, तरुण यांच्या मत भेदाचा मासला या वेळीं पाहण्या सारखा आहे. युरोप खंडांत गेल्या व त्याच्या मागील शतकांत अशीच गमत दृष्टीस पडत असे धर्मप्रकरण, राज्य प्रकरण व समाज प्रकरण या प्रत्येकांत मतभेद दिसावयाचाच. नवी रीत जुना रीत या दोन्हीचा जबर झगडा सुरु झाला. धर्म प्रकरणांतला बखेडा नुकतांच काठें मिटत चालला पण समाज प्रकरणाला नुकताच आरंभ झाला. शिक्षण, नीति, आरोग्य, सभ्यता, या सारख्या व्यवहारिक विषयावर वादप्रतिवाद सुरू होऊन फार काळ लोटला नाहीं. या वेळीं जो सुशिक्षित ह्मणून असेल त्यांनीं आपली वक्तृत्व व लेखन शक्ति खर्च केली पाहिजे व लोकांच्या मनांत ज्या वेड्या समजुती भरल्या आहेत त्या काढून टकल्या पाहिजे. लोक शिक्षणांतून सरकार आपला हात काढून घेत आहे या गोष्टीकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे ज्या विद्यापान पासून आपल्याला नीति अनीति धर्म अधर्म, सत्य असत्य हीं कळूं लागली तें विद्यापान सगळ्या जन स-

माजा कडून करविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विद्या देविचे व्यास पीठ पश्चिम दिशेकडे स्थाईक होणार असा घाट दिसत आहे तर ते अश्रांत श्रम करून पुन्हां एक वार या भरत भुमीकेंत स्थापन करून टाकलें पाहिजे.

"पण अमुक केलें पाहिजे तमुक केलें पाहिजे हें सांगणें सोपें आहे" असा प्रश्न आमच्या पुढें येऊन पडेल. पण आह्मी खात्रीनें सांगतों कीं या गोष्टी थोड्याशा श्रमांती खास सुसाध्य आहेत. आपल्याला प्रत्येक गोष्टींत अपयश येतें कां? तर आपला जन समाजच आपणास प्रतिकूळ असतो. आपण एखादी सुधारणेची गोष्ट काढिली कीं आपल्यावर किती नेत्र आरक्त होतात. जावत्काळ पर्यंत आमच्या जनसमाजाला आपली सुधारणा व्हावी असें वाटत नाहीं तावत्काळ पर्यंत सुशिक्षित जनांचे सर्व यत्न मोघ आहेत. आमची भाषा जननी कीं जिच्या वांचून आमचें कधीं चालावयाचें नाहीं तिचा अपमान एकदां झालेला आहे. विद्या मंदिरांत तिला अर्ध चंद्र मिळाला. जी पूर्वी संस्कृत, आंग्ल इत्यादि भाषा बरोबर स्वैर विहार करीत असे ती आतां फक्त साधारण जनांच्या मुखांत वास करूं लागली. ती नादान ह्मणून ठरली. तींत सुशिक्षितांना आपले मुल्यवान विचार ग्रंथित करतां येत नाहींत ह्मणून सगळ्या जगतांत तिची नाचक्की झाली. अरेरे सकल—मदकल—भाषा—युवतीची—शशीकला जी संस्कृत भाषा ती कोठें व तिची जाडे भरडे वसन परिधान करणारी मराठी भाषा कोठें. काय हा अपमान! त्या दुकूल वस्त्र परिधान केलेल्या व सकल मंडनांनीं सुशोभित असणाऱ्या संस्कृत भाषेची ही फाटके तुटके चिर वस्त्र परिधान केलेली मराठी भाषा दुहिता आहे असें तिला कोणी तरी ओळखील कां! तुकाराम नामदेव या मंडळीच्या वेळच्या या भाषा मुग्धेच्या आशेची राखरांगोळी झाली. तींत पद्य चांगले होण्याची आशा नष्ट झाली कारण ते आधींच उत्तम झालेलें आहे पण गद्य ग्रंथाची गोष्ट तशी नाहीं. गद्य ग्रंथाच्या उणीवी मुळें जें तिचें सुंदर आंग बाहेर दिसत आहे ते झांकून टाकिलें पाहिजे. नाहीं तर उन्हाचा कडक ताप सहन न होऊन ती कोमेजून जाईल. सारांश गद्य ग्रंथाकडे आमचे तरुण सुशिक्षितांनीं विशेष लक्ष दिलें पाहिजे. आमच्यांत रेनॉल्ड, स्कॉट लिटन, आडिसन, गोल्ड स्मिथ ही मंडळी अवतरली पाहिजे तर कांहीं भाषाभ्युदय होण्याची आशा आहे. असो. आतां एका गोष्टी विषयीं लिहून हा कंटाळवाणा लेख पुरा करूं. ही गोष्ट राजकीय होय. राष्ट्रीय सभे संबंधानें आमचे अभिनव तरुणांनीं उदास असतां कामा नये. काया वाचा मनें करून या सभेस त्यांनीं आपणास अर्पून घेतले पाहिजे. आपलें सर्वस्व गेलें तरी बेहेतर पण राष्ट्रीय परिषद्रोप्याला पाणी घालूं असा प्रत्येक सुशिक्षित तरुणांनीं निश्चय केला पाहिजे. ठिकठिकाणीं या संबंधानें सभा, कमेट्या, व्याख्यानें यांची गर्दी उडवून दिली पाहिजे.

जान ब्राईटचें चरित्र सर्वांनीं लक्षांत ठेवण्या जोगें आहे. धान्याचा कायदा रद्द करविण्यास त्यांनां किती खटपट करावी लागली ही गोष्ट विशेष प्रेक्षणीय आहे.

इंग्लंडासारख्या सुधारलेल्या देशांत जर एवढी खटपट करावी लागली तर जेथें सुशिक्षित फार थोडे अशा आमच्या भरत भुमीकेंत किती खटपट केली पाहिजे याचा विचार वाचक व तरुण सुशिक्षित यावर सोपवितों. या लेखा पासून जर कांहीं उपयोग झाला तर मी माझी लेखणी धन्य समजेन, नाहींतर ती कृष्णमुखी आहेच.

आपला
'हळवा.'

वऱ्हाडसमाचार.

मिती जेष्ट शुद्ध १२ शके १८११

## वऱ्हाडची जादा जमाबंदी.

(शिलकेंत राहिलेल्या वीस लक्षांची व्यवस्था कोणती व्हावी?)

आम्ही गेल्या अंकीं इंग्रजींत वरील विषयासंबंधानें विवेचन केलें आहे, तरी मराठींत ही या विषयावर लेख लिहून आमच्या देशमुख, पाटील, शेतकरी इत्यादि मंडळीस हा महत्वाचा प्रश्न चांगला स्पष्टपणें कळवा ह्मणून आज त्याची दुबारणी करूं इच्छीत आहों.

आमचा वऱ्हाडप्रांत धनधान्य संपन्न असल्या विषयीं आख्या सर्व हिंदुस्थानभर आहे. ती खोटी आहे असें सर्वथैव ह्मणतां येत नाहीं, पण उलटें ती खरी आहे असें प्रतिपादण्यास वऱ्हाडाची वाढत असलेली जमाबंदी एका प्रकारें कारण आहे. मुंबई इलाख्यांशीं तुलना केली असतां वऱ्हाडप्रांताच्या तोडीचा सधन व सुपीक प्रांत सांपडणें कठीण आहे. खालसा झालेल्या मुलखा प्रमाणेंच बहुतेक अंशीं या प्रांतांतला राज्य कारभार सारख्याच पद्धती वर चालतो. येथील राज्यकारभार चालविण्यास अवाढव्य खर्चाचीं निरनिराळीं खातीं सुरूं केलीं आहेत तरी गेल्या तीन वर्षां पासून दरसाल सरकारच्या खजिन्यांत खर्चवेंच भागून वीस लक्ष रुपये शिलकेंत पडत आहेत. ही शिल्लक मूळ सरकारच्या ह्मणजे निजाम सरकारच्या खजिन्यांत जमा होते. असें आह्मीं कागदी पत्रीं वाचितों. आतां ही शिल्लक निजाम सरकारांस परत द्यावी किंवा तिचा अन्य रीतीनें प्रांतांतल्या प्रांतांत चांगला उपयोग करावा हा प्रश्न सहजी उत्पन्न होतो. सकृद्दर्शनीं हा प्रश्न निरर्थक भासेल कारण या प्रांताचे मूळ मालक निजाम सरकार आहेत तेव्हां या प्रांताची नीट व्यवस्था ठेविल्या नंतर जी शिल्लक उरेल तिजवर स्वामित्व निजाम सरकारचेंच आहे. अर्थात जिकडचा खजिना तिकडे जात असतांना त्या पैशांवर अन्य हक्क पोंचविणें चुकीचें होईल. परंतु हा प्रश्न लोकां पुढें मांडण्याचा आमचा हेतु आहे. शिल्लक म्हणून आपण म्हणतों ती वास्तवीक शिल्लक नव्हे कां कीं याच प्रांतांतील लोकांच्या कल्याणा कडे नीट लक्ष न पोंचविल्या मुळें ही मोठी रकम सरकारच्या खजिन्यांत बचेंत रहात आहे. लोकांची गैरसोय व अव्यवस्था करून सरकार निजाम सरकारच्या खजिन्यांत ही रक्कम पोंचवीत आहेत तेव्हां ते आपल्या कर्तव्यांत चुकतात असें म्हणावें लागतें. वऱ्हाड प्रांता संबंधानें सन १८६० सालीं निजाम सरकारशीं नवा तहनामा ठरला कीं या प्रांताच्या जमाबंदीचा व खर्चाचा हिशोब इंग्रज सरकारनें दाखवूं नये परंतु बचेंत राहिल्यास तो पैसा निजाम सरकारच्या तिजोरींत पावता करावा सरकारच्या ह्या करण्यास आम्हीं आड येतों त्यास मुख्य कारण हें कीं रयतेच्या गरजा भागवूं नयेत आणि कशी तरी व्यवस्था करून पैसा शिलकेंत पाडावा. हा मार्ग कोणाही सुज्ञ राज्य कर्त्यांस पसंत पडेल असें वाटत नाहीं. वऱ्हाड प्रांतास मुलुख अमानी हैदराबाद असें ह्मणतात. ही संज्ञा सार्थ असेल तर इंग्रज सरकारचा ह्या प्रांताशीं संबंध निसबत दारा पेक्षां विशेष जिम्मेदारीचा नाहीं असें आह्मीं समजतों. अर्थात सरकारच्या कर्तव्याची खरी बजावणी होण्यास या प्रांताची सुधारणा करणें हें मूळ काम होय. पुढें मागें हा प्रांत इंग्रज सरकारांनीं निजाम सरकारास परत दिला आणि देते वेळीं ह्या प्रांतांची स्थिती चांगली असली ह्मणजे निजाम सरकारास ही हा मुलूख तोडून दिल्या बद्दल वाईट वाटण्यास कारण उरणार नाहीं.

वऱ्हाडांत सुधारणा होण्या सारख्या अनेक आहेत व त्या फार आगत्याच्या आहेत तेव्हां ही वरील शिलकेची व्यवस्था प्रांतांतल्या प्रांतांत होण्याचें ठरल्यास आह्मी प्रसंगानुसार त्या संबंधानें सविस्तर लिहूं.

# The Berar Samachar

MONDAY JUNE, 10, 1889.

## GOVERNMENT AND RYOTS.

The draft Land Revenue Code for Berar has been circulated with a view to get opinions and invite criticism regarding the various provisions of the code. This Code has been undertaken with the object of amending and declaring the existing land revenue law in Berar. The land revenue policy of the Berar Government would be hereafter distinctly embodied in the provisions of this code. What was scattered and fragmentary till now is to be crystallized into a type by means of methodical legislation. This is therefore a very proper opportunity to examine some of the most important provisions of the Code which have a far-reaching effect; and we mean to consider this day the status of the ryots in the land revenue policy of government and the relation in which they stand towards Berar government.

Section 54 of the draft revenue code runs as follows:—

'No registered occupant of a survey number or portion thereof shall be deprived of his right of occupancy in the number or portion so long as he continues to pay the assessment due thereon. His right of occupancy, subject to the payment of rent, shall be deemed to be transferable and heritable property; and shall be continued to him after the expiry of the current settlement lease without question if he consents to the new rate which may be assessed on his land at a revision of assessment. This leaves no doubt whatsoever that the ryot's status is only that of an occupant lessee whose tenure is permanent and heritable. The words used are 'occupancy rights' of a ryot and 'settlement lease.' These are not mere stray words but have been very deliberately used. The ryot therefore is in no sense an owner of the field; the *malick* of all lands is government, and the ryot is merely a lessee with the liability of paying the government rental. On non-payment of rent he is liable to eviction and the stringent provisions of the Code as to consequences of nonpayment of rent are of course quite consistent with this theory of all lands being owned by the State. Now did the ryots occupy an equally bad position under Native rule? Certainly not. The ryot was looked upon as full owner of the field. He was the malick of the field and had to give so much of the produce to Government. There was never such an hard-and-fast rule about the ownership of soils being vested in Government. Practically speaking at first sight the ryot's position seems in no wise affected; for so long as the ryot enjoy the right of *occupying* and enjoying the fields, they get all that they care to have. As all lands can only be enjoyed by the usufruct of the same, it may be argued that it does not matter who may be the *nominal* owner of the lands. The ryot has this essential right of occupying the land and enjoying the produce thereof; his right is heritable and transferable; what more then does the ryot really want? As to payment of land revenue, he has now to pay an equivalent in coin of what he paid to native governments in kind. How then is his position affected by the State having declared its ownership on all soils? The answer to this does not occur on a superficial consideration of the subject. If there is really no difference as to who is the declared owner of the lands in the ryot's possession why is the Government so solicitous of its rights as to go out of its way and declare that all land *belongs* to Government. Why not declare that the occupant Ryot rather than government is the owner of the land? It is one thing to have the consciousness of land being owned by one as Malick and and another to know that you are only a lessee be it with the best posible conditions attached to your holding. With the present daclaration of Government ownership of land the Ryot enjoys his lands only by sufferance of Government; he is not the *Malick*. And if this right or a similar right was not claimed by native Governments how is it that the right accrued to the British government which stands only in the shoes of the original government, at least in Berar. The government is a great respecter of rights and this is tried to be shown in the way in which the Ryots have been allowed the rights

of occupation and enjoyment. But if government means really to respect the existing rights why this half measure and why this qualified admission of their rights? Under the policy now declared the land is to be continued to the Ryot '*without question*, if he consents to the revised rates. The first expression is as full of grace as the second is harsh; in fact the second nullifies the first. Permanency of settlement is not only not secured but it is declared that rates would be varied after every 30 years, and the ownership of government is made to be keenly felt in the condition of the land being retainable by the Ryot *only* if he consents to pay the increased rent. This is one small incident of the ownership of government. With this condition, the Ryot is purely lessee for 30 years only on a fixed rent. If he agrees to pay higher rate at the end of these years, well and good; the state that is the Malick would continue the land to him. This is just like ordinary contracts of leases. From this idea of state ownership flow many little incidental advantages to Government and one of them in fact a necessary corollary from the idea, is the right of Government to all mines and mineral products in the soil. This is of course what is embodied in the present Code and we shall consider that section in our next.

## EDITORIAL NOTE.

It is amusing to find an official apologist 'AJax' comming to the help of the ill-treated Bench in Berar in the correspondence columns of the 'Vaidarbha' The Pramoda Sindhu did undoubtedly a grievous injustice, in speaking so discourteously of the Berar Bench. 'AJax' declares that there is 'not a particle of truth' in the Pramoda Sindhu's statement that the Bench is weaker than the Bar, although he makes a very qualified and guarded admission immediately afterward that '*some* of the pleaders are better than *some* of the Judges.' We have expressed our opinions very often with regard to the Judicial officers in Berar and we have the misfortune to stand with Pramoda Sindhu who stands charged with libelling the Judiciary of the province. 'AJax' seems to be endowed or at any rate he discovers in his correspondence in the 'Vaidarbha' a consciousness of being skilled in the art of oratory a want of which heavenly virtue 'AJax' declares 'is enough to condemn the whole body as pleaders.' 'AJax' also proves most conclusively that the 'advocates should be more learned in the law than Judges.' Having proved this last proposition 'AJax' naturally sees nothing against that rule in Berar. We might safely leave 'AJax' to stick to his belief about the Bench being the stronger, and the public to think for themselves and form their opinion from their every day experience of Judicial decisions. With the exception of Mr. Obbard and Mr. Khaperde can 'AJax' give a few names that are superior to or even come up to some of our best pleaders?

## CORRESPONDENCE

To

The Editor of Berarsamachar.

I was informed the other day by a friend of mine that the orders lately issued fixing the rents of all Government Buildings were so disregarded of late that it is time the higher authorities should take some notice. For instance one tenant is allowed to occupy half a unit and pay Rs. 4 per month while another, who is already in the occupancy of half a unit, told to take up a full one on 8 per mensem or vacate why give the latter permission to occupy half a unit at the first instance, and then ask him to vacate it if he did not occupy the other half! This is a riddle worth solving.

I believe rents are charged at 10 per cent on the salary of each Government Official, and not an each unit as is said to be the case by a few long thinking people but what makes it better again is that they are trying to put their own construction to an order that is so very simple and clear.

It is presumed that the mandate in question is being violated in other respects also, and if enquiries are made on the subject, the truth would soon be brought to light and matters made plainer than it is at present.

Akola 4 th June 1889

Nimb.

Ellichpur, Berar
6th June 1889

To

The Editor "Berar Samachar"

Please, publish the following lines in the next issue of your journal.

*The Judicial Scheme*—The subject of Judicial Scheme has been the most important topics that has greatly attracted the public attention in Berars. The scheme is being discussed in every quarter in all circles of people who are concerned in it. Everybody appears to have been engaged in thinking as to what prospects he has in the ensuing scheme. It is *certain* that scheme is to come into force on the 1st day of July 1889. As the scheme is not out, no body knows what changes are to take place in the administration of justice in each district. But the rumour has it that each district in Berar will be provided with an appellate Court which will hear first appeal against decrees in suits the value of which does not exceed 500. But we are very sorry to learn that this single Ellichpur District certainly the most important district is an exception to the above Law. It will have no appellate Court like other districts! The people of this district must even after the scheme comes into force go to Amraoti-a distance-of 32 miles to beg for justice in a simple case of one rupee! Alas! look to the trouble and expense a suitor shall have to undergo in travelling from Ellichpur to Amraoti to prefer an appeal against a decree of Rs10! The people of this district has been crying for redress in this direction for the last many years. They had some hope of the evil being removed in the ensuing scheme. But no! They are not fortunate! They must remain in the same miserable state. Government finds no means to redress the grievance. It appears very strange that this district alone should not be supplied with an appellate. Court No more expense will have to be incurred if can appellate Court be opened here. The Deputy Commissioner of this District has no much work; he may be invested with powers of an appellate Court and the grievance would be redressed.

A rumour is afloat here that Mr. Shri krishna Narhar E. A. C. has been appointed District Judge under the new-scheme and is posted at Yeotmal. He is to hear appeal against decree the value of which does not exceed 500.

Yours truly
"X"

---

पोंच: विठ्ठलदरा एक ड, वाशिमकर क्ष व उमरावतीकर X, Y, Z. या सहीचीं इंग्रजी पत्रें हीं पावलीं. स्थलसंकोचा बद्दल तिन्ही पत्रव्यवहार पुढील अंकीं घेऊं.

---

## वऱ्हाड.

मुलुख अमानी हैदराबादच्या खजिन्यांत गुदस्त सालीं एप्रिलच्या तिसावे तारखेस करन्सी नोटा, सोनें, रुपें, तांबें मिळून एकंदर ६३५२२९४ रुपयांची करो शिल्लख होती ती चालूं सालीं त्याच तारखेस ५१,९०,९२५ रुपयांची आहे ह्मणजे यंदा साडे अकरा लक्षावर तूट पडली आहे.

उमरावती मुनिसिपालिटीच्या सभासदांचीं नांवें पहिल्या जूनच्या रेसिडेन्सी आरडर मध्यें छापून आलीं आहेत त्यांत लोकांच्या वतीनें निवडलेल्या सभासदांची याद मतसंख्येच्या अनुक्रमानें मागें दिली आहे. बाकी सरकार तर्फे निवडलेले गृहस्थ येणें प्रमाणें:—

(१) डेप्युटी कमिशनर उमरावती, (२) रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण नापट, (३) मि. एच्. वुइल, (४) रा. रा. सदाशिव नारायण, (५) रावसाहेब रामविलास घोकरमल, आणि (६) मि. कर्पूर देशीगचरी. मुनसिपालिटीच्या कामास सुरूवात तेवीस मे पासून झाली असें समजलें.

आह्मीं मागें लिहिल्या प्रमाणें लोकांच्या तर्फे व सरकार तर्फे निवडलेले खामगांव मुनसिपालिटीच्या सभासदास कायम ठेविले आहेत. नवीन फेरफार कांहीं नाहीं. ही मुनसिपालिटी कायद्या प्रमाणें तारीख २१ मे पासून अस्तित्वात आली आहे.

अकोला मुनसिपालिटींत डेपुटी कमिशनर सभासद असावेत किंवा नसावेत या संबंधानें मोठा मतभेद पडला होता. आणि उभय पक्षांस आप आपली बाजू सबळ आहे असें दाखविण्या विषयीं वीरश्री चढली होती ह्या चळवळी मुळें रेसिडेन्ट साहेब वरील वादग्रस्त प्रश्नाचा निकाल काय करितात हें कळण्या साठीं गेल्या रेसिडेन्सी आडरची मार्गप्रतीक्षा आह्मी करीत होतों. त्या प्रमाणें चार दिवसां पूर्वीं अखेरचा निकाल समजला कीं डेपुटी कमिशनर यांस सरकार तर्फे सभासद नेमिले आहेत. डेपुटी कमिशनर संबंधानें मूळ सूचना आमचे धोरणी रावसाहेब देवराव विनायक दिगंबर यांची होती आणि त्यांच्या मता प्रमाणें ती अंमलांत आली हें कळविण्यास आह्मांस संतोष वाटतो. प्रेसिडेंट आणि व्हाईस प्रेसिडेंट निवडणें मुनसिपालिटीच्या सभासदां कडे आहे आणि त्यांस या निवडणुकी संबंधानें आह्मीं आपले अभिप्राय मागें प्रगट केले आहेत तेव्हां पुनरावृत्ति करीत बसणें प्रशस्त होणार नाहीं.

कर्नल सी. टी. लेन बेंगाल एस्. सी. व पोलीस रेजिस्ट्रेशन इत्यादि खात्याचे इन्स्पेक्टर यांस त्यांच्या लष्करी खात्यांतून सन १८६८ सालच्या नियमांतील नवव्या कलमा प्रमाणें एक वर्ष नव्वद दिवसांची फर्लो विलायतेस जाण्या साठीं मिळाली आहे.

महाराणी सरकारची संपत्ति मिळाल्यास वऱ्हाडांतील लेफटेनन्ट गृहस्थ मि. राबर्ट डेव्हिड काटले डेव्हिस साहेब यांची क्याप्टनचे जागेवर गेल्या महिन्याचे अकरावे तारखे पासून बढती होणार आहे हें कळविण्यास आह्मास आनंद वाटतो.

सन १८७० सालच्या सप्टेंबरच्या तिसावे तारखेच्या हिंदुस्थान सरकारच्या १५६वे नोटिफिकेशन प्रमाणें अखिशान रेसिडेंट साहेबांनीं रा. रा. सुरजनारायण पंडित असि. कमिशनर यांच्या कोडतास पांच हजार रुपये पर्यंत दावे चालविण्याचे ह्मणजे पांचवे वर्गे कोडताचे अधिकार दिले आहेत.

सुमारें आठ दिवसां मागें खामगांव रेलवे स्टेशनांतून रेलवे कंपनीचे सुमारें १२०० रु० चोरीस गेले. वहिमावरून एका पोटिरास पकडून चौकशी केली असतां त्यानें ५०० रु० एका पुलाखालीं पुरलेले दाखवून दिले. बाकीच्या रकमेचा तपास चालूं आहे.

येथील टाऊन चावडी लगतची कांहीं जागा सार्वजनिक रस्त्याच्या सोयीं साठीं विकत घेणें भाग पडल्या वरून रेसिडेंट साहेबांनीं मंजुरात दिली आहे कीं हिरालाल यांच्या घराच्या हद्दींतील पूर्व पश्चिम ४५ फूट लांब आणि दक्षिणोत्तर तीन फूट रुंद जागा उपयोगांत आणावी.

रा. रा. कुमार श्री हरनानजी आफि. असि॰ कमिशनर यांस एक महिन्याची रजा मिळाली ती बिनपगारी असून गेल्या पंचविसावे तारखे पासून अंमलांत येणार आहे.

मि. महमद यासीनखान असि॰ कमिशनर वर्ग ३ यांस पंधरा दिवसांची हक्काची रजा मिळाली ती त्यांनीं घेतली असून त्या तारखे पासून सुरू धरावी असें ठरलें आहे.

लोकांच्या हिता साठीं मि. एल्. ए. लाइट असिस्टंट इंजिनिअर वर्ग पहिला यांस सध्यां वऱ्हाडच्या पश्चिम भागांतून दक्षिण शिकंदराबाद कडे बदलण्यांत आलें आहे.

---

## जाहिरात.

सर्व लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं मामूल प्रमाणें कमेटीचे हद्दींतील गवत चारण्याचे हक्काचा १८८९।९० साला बद्दल लिलाव तारीख १ माहे जुलई सन १८८९ इसवी रोजीं सकाळीं ७ वाजतां टाऊन हालांत होणार आहे ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदर्हु तारखेस हजर रहाण्याची खबरदारी घ्यावी. कळावें. तारीख माहे जून सन १८८९

Gopal Gunes[h]
Vice Preside[nt]
Akola Municipal Committe[e]

---

## वर्तमानसार.

लार्ड री साहेब, नामदार मि. वेलंग ह्यां हाय कोर्टांत जज्ज नेमण्या विषयींचे खटपटींत आहेत असें पायोनिअर कर्त्यांच्या स[मजण्यांत] आलें आहे.

लार्ड री साहेबांस विलायत सरकार लवकरच परत बोलावणार अशी दुर्वार्ता पायोनिअर पत्राचे बातमीदारानें इंग्लंडाहून पाठविली आहे. इडापीडा टळो अमंगळ पळो.

महारांची धन्य!—नागपूर येथील मंगळवार पेठेंत एका महारास चोरून गोमांस विकत घेतांना त्याच्याच एका जात भाईनें पकडून खटला जाती पुढें आणला जातीनें त्याला वाळीत टाकलें. तो माफी मागूं लागला पण क्षौरांत प्रायश्चित घेतलें तेव्हां त्यास त्यांनीं जातींत घेतलें. ह्या पकडणाऱ्या महारास गोरक्षक सभेनें बक्षीस देऊन गौरविलें. रास्तच!

ते० मि०

हिंदुस्थानच्या हिताची आवड— मि. जे. हेनीकर हीटन याणी विलायतेहून हिंदुस्थानांत जाणाऱ्या पत्रव्यवहाराचें हांशील फाजील आहे तें कमी करावें अशी तडण लाविली तेव्हां तें कमी करितां येत नाहीं असें विलायतेच्या-पोष्ठमास्तर जनरलांनीं सांगितलें. याच वादांत हिंदुस्थानच्या नुकसानीची एक बाब बाहेर आली आहे. ती अशी कीं हिंदुस्थानची विलायतेस व विलायतची हिंदुस्थानांत डांक नेण्या आणण्याचा पी. आणि ओ. कंपनीस जो दहा वर्षांचा मक्ता दिला आहे, त्यांत दरसाल १०७००० पौंडाचा फायदा झाला आहे असे असून हिंदुस्थानापासून दरसाल ६०००० पौंड विलायत सरकार घेते त्यांत कांहींच कमी केलें नाहीं असें बाहेर आलें आहे. पोलिटिकल एजन्शा व पोष्टाचें खातें अशा कित्येक कामांत लाटालाटी करून गब्बर ग्रेटब्रिटननें खर्चाचा सगळा बोजा गरीब हिंदुस्थानावर लादणें या पेक्षां नीच तें काय?

कातडीं कमाविण्यास विजेचा उपयोग—अगदीं कैंसाळ कातड्यावर विजेचा चार दिवस प्रयोग केला असतां कातडें उत्तम प्रतीचें कमाऊन तयार होतें असें ह्मणतात. जगांतील एकूणएक कामें वीज करणार असा सुमार दिसतो.

तागाची पोतीं—सन १८८१ सालीं कलकत्याहून अमेरिकेंत ३ लक्ष रुपयांचीं पोतीं गेलीं होतीं आणि सन १८८८ मध्यें ८ तीनचतुर्थांश लक्ष रुपयांचीं गेलीं होतीं. कापसाचे गट्ठे तागाच्या पोत्यांत न बांधतां कापसाच्या कापडांत बांधावें असा अमेरिकन शेतकऱ्यांनीं नुकताच ठराव केला त्यामुळें तागाचीं पोतीं करणाऱ्या कलकत्याच्या कंपन्यांचें मोठें नुकसान होणार.

सर्पमंत्र—संकेश्वर येथें गुंडु हुनऱ्या या नांवाचा प्रख्यात सर्पमंत्री आहे. कोठें ही व कोणत्याही मनुष्यास सर्प चावला तर त्या मनुष्यानें "गुंडू हुनऱ्या संकेश्वरकर याची शपथ" ह्मणून एक, पण प्रथम हातीं लागेल तो, धोंडा उचलून घेऊन गळ्यांत बांधावा ह्मणजे सर्प विषापासून त्या दंश झालेल्या मनुष्यानें बारा वर्षांत कधींही संकेश्वर मुक्कामीं येऊन त्यांस भेटावें, ह्मणजे तो हटकून सर्पाचें वीष उतरतो, असें प्रत्यक्ष अनुभव घेतलेल्या एका मनुष्यानें ज्ञा. सागरास लिहिलें आहे.

शु. सू.

धुळ्या नजीक एका तलावांत नुक्तेच मोत्याचे शिंपले सांपडू लागले आहेत. हल्लीं तलावावर पहारा असून सांपडलेले शिंपले सरकारांत पाठविले आहेत.

उंबराच्या मुळीचें पाणी महारोगावर वस्ताद औषध आहे असें एक जण कळवितो.

उन पाण्यांत आल्याचा लिंबाचा रस घालून रोज कांहीं दिवस घेतलें असतां कपाळ दुखी व पित्त यांस गुण येतो.

मद्रास इलाख्यांत ख्रिस्ती झालेल्यांस शुद्ध करून धर्मांत घेण्याची रीत सुरू झाल्या मुळें बऱ्याच मंडळीस शुद्ध करून घेण्याचें घाटत आहे. ही व्यवस्था इकडे ही झाली तर पाद्री बोवाचें बंडच मोडलें!

न्या० सिं०

मिशिगन एथील पार्लमेंटानें एक कायदा पास केला आहे त्याप्रमाणें जो कोणी चिरूट तयार करील व विकील त्यास कायद्याप्रमाणें शिक्षा केली जाईल.

समुद्रांत आगबोटीची टक्कर न व्हावी म्हणून एक विजेची लोखंडी प्लेट आगबोटीच्या एका बाजूला लविलेली असते तिच्या योगानें कोणतेंही तारू किंवा आगबोट दोन मैलांवर असल्यापासून एक घंटा वर जावपास लागते व ती ज्याबाजुकडून येते ती दिशाही त्या प्लेटीवर दाखविण्यांत येतें असें एकानें शोधून काढलें आहे.

इराणच्या आखातांतून माल बाहेर पाठविण्याचा तेथील सरकारानें मनाई केली असें कळतें.

निझाम साहेबांच्या दिवाणांनीं सर्व खात्यावरील मुख्याधिकाऱ्यांस खर्च कमी करण्याबद्दल सक्त ताकीद दिली आहे असें म्हणतात.

रा. रा. महादेव बाळकृष्ण जतकर निफाडचे मामलेदार. यांनीं दुसऱ्या एका कच्छी इसमास सरकारी जंगलांतील लांकूड चोरून नेण्यांत मदत केल्याबद्दल दोन वर्षें सक्त मजुरीची ठेप व १००० रु. दंड अशी शिक्षा झाल्याचें कळतें.

हळू हळू रशियन लोकांचें बरेंच सैन्य अफगाण सरहद्दीवर ते आणून ठेवताहेत. पुढें त्यांचा काय बेत आहे हें समजत नाहीं.

सु० प०

लिहिण्यास वाईट वाटतें कीं मुंबई हायकोर्टाचे जज्ज मि० नानाभाई हरिदास यांची प्रकृति उदराच्या भावनेनें बेमार असून ते आपल्या घरीं सुरतेस आहेत. ईश्वरी कृपेनें त्यांची प्रकृति दुरुस्त होवो असें आह्मी इच्छितो.

यंदाच्या पुणें येथील प्रांतिक सभेचें काम गेल्या आठवडाभर चाललें असून त्या सभेस या खार्षी ठिकठिकाणचे लोक असल्या मुळें छान शोभा आली होती व त्यांत जे विषय निवाले तेही निवडक व लोकहिताचे होते असें सर्वांस वाटलें. त्या सर्व विषयांत अति उपयुक्त विषय म्हटलें म्हणजे लार्ड रे साहेबांची मुदत वाढविणें, शेतकीच्या आक्टाची सुधारणा, जंगलाचा जुलूप विद्या खात्याकडील सरकारचें दुर्लक्ष कायमचे धारे, करांवरील अपील इत्यादि अनेक विषय फारच चांगले निवाले यांत संदेह नाहीं.

सिंदेसरकारास शिकविण्याकरितां जान्स्टन नांवाच्या युरोपियन गृहस्थाची नेमणूक झाली. राजांचे शिक्षक बनण्यास नेटिवांत कोणीच नसेल? पण तसें केलें तर राजे लोक इंग्रजांच्या सोईचे व्हावयाचे नाहींत!

जपान देश फारच जारीनें सुधारत चालला आहे व त्याचेंच अनुकरण करावें ह्मणून आह्मास आमचे सुधारक सांगत आहेत. या जपानांत गेल्या ४ वर्षांत एकंदर १२,४०,००७ इतकीं लग्नें झालीं व ४.६८,५८७ घटस्फोट झाले! यावरून सुधारणेचें मान उघड दिसतें. फ्रान्स देशांत निमोमेस येथें एका बाईचा नवरा तरुगांत गेला हें पाहून अब्रूच्या भीतीनें बाईनें आपल्या पांच मुलांसुद्धा आत्महत्या करून घेतली!

पु० वै०

---

नोटिशीचें उत्तर.

गणपतलाल च्यपत्रीलाल कलाल रहाणार महान यांस या खालीं सही करणार यांजकडून ता. २७-४-८९ चे वैदर्भ पत्रांत छापलें तारीख २४-४-८९चे नोटिशीचे उत्तर देण्यांत येत आहे.

तुमचें वर्तन तारीख ११-३-८७चे करारनाम्या विरुद्ध जाहल्यानें आह्मी कोणतेही जबाबदारीस पात्र नाहीं.

दुकानचें काम तुह्मी सुमार सहा महिन्यापसून बंद केलें आहे त्या बद्दलचें नुकसान तुह्मापान घेण्यास पात्र नाहीं.

सरकत संबंधानें जे कायदेशीर नियम आहेत त्यांस अनुसरून आह्मी वागण्यास व नफा नुकसान देण्या घेण्यास तयार असतां तुह्मी खोटी नोटीस दिली व कदाचित पुढें फिर्यादही केल्यास त्याचें योग्य उत्तर दिलेंच जाईल मात्र त्या बद्दलचा खर्च तुह्मास सोसावा लागून त्या उलट आह्मांसही दावा मागतां येईल.

हिशोब लिहिण्या साठीं इंग्रजी गुमास्ता होता त्याज पासून रिती प्रमाण उभयतां समजून घेऊं जो माल शिलक आहे त्याची व्यवस्था तुह्मा एकट्यास करण्याचा अधिकार नाहीं. कळावें. तारीख ९ माहे जून सन १८८९ इसवी.

सही

तुकाराम उदाजी पाटील
रहाणार महान
दस्तूर खुद्द.

---

नोटीस.

रा० रा० पिराजी वल्लद बाबुजी कासार वस्ती बारसीटाकळी यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आह्मांस कबूल केलें होतें कीं तुमचे मुलीचें लग्न माझे मुलीचे लग्नांत माझे घरीं एकेच तीथीस करितो ह्मणजे तुमचा बचाव होईल दोन्ही लग्नाचा खर्च होईल त्याचा तिसरा हिस्सा द्यावा असें तुम्हीं वचन दिलें व आमचे जवळून रोख नगदी रुपये ११२ तुम्ही घेतले. घेते वेळीं म्हटलें कीं. लग्ना नंतर हिशोबा अंती निघतील ते रुपये परत देऊ वरून ता. २९।१।८९ इ. रोजीं हिशोब पाहिला तर आदमास रुपये ९९ तुमचे कडेस निघाले व तुम्हांस दोनच्यार वेळां मागितले देतो म्हणता पण देत नाहीं करितां आपणास ही नोटीस पावल्या दिवसांपासून आठ दिवसांचे आंत रु० देऊन पावती घ्यावा असें न केल्यास रीतीप्रमाणें तजवीज करून अखेर निकालापर्यंत ह्या नोटीशीसुद्धां खर्च आपले जवळून घेतला जाईल कळावें ता० ३-५-८९ इसवी.

( सही )

तुकाराम कडताजी कासार राहणार
उगवे दस्तुर खुद्द.

---

नोटीस.

सेख हयाद वल्लद सेखचांद आतार राहणार खोलापूर जिल्हा उमरावती यांस. नोटीस देणार अनुबी मर्द सेख हयाद राहणार आकोलें ताजनापेठ नोटीशीनें असें कळवितें कीं तुमच्याशी माझें लग्न होऊन आदमासें १०।१२ वर्षें झालीं. लग्न झाल्यावर पुढें चार वर्षांनीं तुमचे अंगावर महारोग झाला तो आतां इतका झाला आहे कीं, तुमच्याशी राहणें व घर संसार करणें ठीक नाहीं. व आज पावेतों मी तुम्हास हातच्या पत्रांनीं व रजिष्टरांनीं दहा वीस वेळां कळविलें. परंतु तुम्ही कांहीं एक निकाल केला नाहीं व आतां मी तुह्मास कोणच्याही गोष्टीनें राजी नाहीं तर ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत तुह्मी माझ्या खावटीचे रुपये १०० व मेहेरबाबीचा दावा वगैरे रुपये आणून द्यावें व फारकती द्यावी असें न केल्यास आम्ही हेंच फारकत समजून आह्मी दुसरा घरठाव करू. व पोटगी बद्दलचे व मेहेरच्या दाव्या बद्दलचे रुपये रिती प्रमाणें दावा करून ह्या नोटीशीचे खर्ची सुद्धां सर्व नुकसान भरून घेऊं ह्मणून दिली नोटीस सही ता० ९ माहे जून सन १८८९ इ०

( सही. )

सहीची बांगडी अनुबी मर्द
सेखहयाद इची असे.

---

सर्व स्त्रीशिक्षणेच्छु लोकांनीं अवश्य घेण्याजोगें मासिक पुस्तक.

गृहिणी.

( कुलवधूच्या ज्ञानवर्धनार्थ व मनोरंजनार्थ मासिक पुस्तक. )

ह्या मासिक पुस्तकाचे आजपर्यंत पंचवीस अंक निघाले व एप्रिल महिन्यापासून तिसऱ्या वर्षास आरंभ झाला. यांत स्त्रियांचीं चरित्रें, नीति, आरोग्य, पाकशास्त्र, शिवणकाम व स्त्रियांस इतर अवश्य वाचण्यालायक विषयांचा समावेश केला जातो. याची सालिना वर्गणी मुंबईत १॥ व बाहेरगांवचे वर्गणीदारांस टपाल ह. निराळे ३ आणे पडतील.

विशेष सूचना गरीब शिक्षक लोकांस हें मासिक पुस्तक ट. ह. सह एकरुपयास दिलें जाईल.

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं पैसे व नांवें खालील पत्त्यावर पाठवावींत.

वर्गणीदार मिळवून देणारांस योग्य कमिशन दिलें जाईल.

पांच प्रती एकदम घेणारांस एक अंक फुकट दिला जाईल.

म्यानेजर गृहिणी,
सुबोधप्रकाश छापखाना मुंबई.

---

विक्रीस तयार.

कळविण्यांत येतें कीं बंगाल नागपूर रेलवे स्टेशन गोंदिया येथें ऐन व बिजाच्या चांगल्या सरळ व जुन्या अशा मयाली सुमारें २००० आहेत. लांबी बारा फुटापासून वीस फूट पर्यंत व चौरस एक फूट. दराची माहिती पाहिजे असल्यास खालीं सही करणाऱ्याकडे मिळेल.

आपाजी विनायक कॉनन्ट्राक्टर गोंदिया.

---

☞ हें पत्र अकोला येथें के० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

पुरवणी—अकोला वऱ्हाडसमाचार तारीख १६ माहे सप्टेंबर सन १८८९ इ०

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

---

पिंपळगांवराजा तारीख ११।९।८९

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

विनंती विशेष, मी आज तारीख मजकूर रोजीं, फिरत फिरत येथील सरकारी मराठी शाळा, पाहाण्या करितां म्हणून सहज गेलों. शाळेंत जाऊन प्रत्येक वर्गांत गेलों तेव्हां माझे नजरेस असें आलें कीं बहुतेक ईयत्तेला स्वतंत्र मास्तर आहेत. परंतु एका इयत्तेला मास्तरच नाहीं. व ती एकाही शिक्षकाकडे नाहीं. यावरून मजला असें दिसून आलें कीं, सदर्हू इयत्तेच्या परीक्षेसमयीं कायनिकाल होईल तो खरा परंतु आणखी बारीक शोध करून पाहिलें असतां, असें कळून आलें कीं, निमे इयत्ता एका असिस्टंटकडे आहे, व निमे ईयत्ता कोणात्याच जबाबदारींत नाहीं, तरी वेळेवर जो कोणी शिक्षण देईल तोच खरा ह्या वेळे पुरता जबाबदार, या वरून असें सिद्ध होतें कीं सदरहू ईयत्तेचा निमे भाग शाळेच्या भरती करितां किंवा, शोभेकरितां केला आहे याशिवाय कांहींच उपयोग नाहीं. असें असेल तर त्या मुलांचें नुकसान जाणून बुजून होत आहे. तर त्या मुलांनीं असा कोणता अपराध केला कीं, त्यांनीं वर्षभर सरकारांत फुकट पैसा भरावा व वेळ फुकट दवडावा हें न कळे. त्यांना हीं एकप्रकारची शिक्षाच आहे असें समजलें पाहिजे. आणखी एक चमत्कारिक गोष्ट नजरेस दिसून आली कीं प्रत्येक इयत्तेतील मास्तराकडे पुरेसे शिष्य आहेत व हेडमास्तर साहेबाकडेस एक इयत्ता असून मुलेंही दहा अकरा आहेत. त्यांच्या मध्येंच ते आपला काळ घालवितात. यावरून मी असें अनुमान केलें कीं हेडमास्तर साहेब हे स्वतःचेच हिताकडेस लक्ष्य देत आहेत. एकंदर इयत्तेची व्यवस्था पहातां अव्यवस्थेशीर आहे. असे असण्याचें कारण गुदस्तसालीं वार्षिक परीक्षा झाली त्या नंतर जी वर्गीवर्गी केली तीच मास्तर साहेब यांनीं पुढचें धोरण पाहून लक्ष्य पुरविलें नाहीं. व मास्तर साहेबांस हीच विनंती आहे कीं, चालूं सालीं ही अशीं व्यवस्था होणार नाहीं अशी उमेद आहे.

दुसरे आज बुधवार असल्या कारणानें मी श्री विठ्ठलाचे दर्शनास गेलों असतां त्या ठिकाणीं कांहीं विशेष चमत्कार दृष्टोत्पत्तिस आला ता पुढील अंकीं सविस्तर देऊं कळावें.

आपला एक
( क्ष )

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि. पुढील चार ओळीस येत्या सुंदर अंकीं स्थळ मिळेल अशी आशा आहे.

चिखलदरा तारीख ८–९–८९

पुर्वानक्षत्र लागल्या पासून मेघराजानें डोळे उघडले आहेत. धुवारी व वारा एकसारखा सुरूच आहे. एथें एका नवीन तलावाचें काम सुरू आहे व आणखी एका तलावाचें काम थोडे दिवसांत सुरू होणार असें समजतें. माजी डेप्युटी कमिशनर कर्नल मेंकंझी साहेब यांनीं एथें पक्षकार लोकांकरितां एक टोलेजंग मुशाफरखाना बांधला आहे. एथील आफिशिएटिंग चीफकानस्टेबल मिस्तर नागोराव हे आपले कामांत दक्ष, मेहनती व हुशार आहेत. यांनीं एकदोन ठिकाणीं अॅक्टिंग चीफकानस्टेबलचें काम केलें आहे असें ऐकतों. हे गृहस्थ पोलिसांत फार दिवसाचे नोंकर असून यांना अद्याप बढती मिळत नाहीं हें त्यांचे दुर्दैवच समजलें पाहिजे. तारीख २६ चे वऱ्हाडसमाचाराचे अंकांत पोलिसाची वर्गीवर्गी पाहून आनंद झाला. याच प्रमाणें सरकार हकाकडे लक्ष्य देऊन ज्याचे हक त्यास देतील तर गरीब लोक वरिष्ट अधिकाऱ्यांचें आभीष्टचिंतन करतील व त्यांस काम करण्यास हुशारी व उत्तेजन येईल. कोणत्याही खात्यांत नवीन एखादा गुळाचा गणपती आणून त्यास जागा दिली म्हणजे गरिबांचे हक मारले जाऊन त्यांस निमूटपणें चुरमुऱ्याचे लाडू खात बसावें लागतें. एथील शाळा मास्तर बरेंच दिवसापासून पोटशुळाचे व्यथेनें आजारी आहेत. बदली विषयीं दोन तीन रिपोर्ट केले तरी आमचे दयाळू डे. इ. साहेबांस गरिबाची कींव आली नाहीं. असो नशीब बिचाऱ्याचें. अखेरीस मास्तरास बदली न झाल्या मुळें व प्रकृती जास्त बिघडल्यामुळें राजीनामा देण्याचा प्रसंग न येवो म्हणजे झालें. पत्र विस्तार फार झाला म्हणून पुरें करितो. कळावें लोभ असावा ही विनंती.

आपला एक
"एक्स वाय"

---

मुकाम वाशीम ता. ११-९-८९

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः—

कृतानेक सा० न० वि० वि० पाऊस चांगला पडत आहे. पिकें उत्तम आहेत. परंतु आतां आठ चार दिवस उघडला तर बरें, नाहीं तर शेतीचा नास होण्याचा संभव आहे. कोठें कोठें शेते पिवळीं पडत चाललीं आहेत. हा ज्यास्त पावसाचा परिणाम होय. शेतांतील गवत निघत नाहीं. कारण पाऊस सवड देत नाहीं. आतां महामारीनें समूळ ठाणें उठविलें असें दिसतें. ईश्वर करो व याचे पुनरागमन न होवो.

मे० तहशिलदार सा० यांची स्वारि रजेवरून परत येऊन आपलें कामीं दाखल झालीं मि० पुरुषोत्तमराव डाक्टर यांची स्वारि कांहीं सरकारी कामासाठीं मंगरूळपिराहून येथें आली आहे. मोहरमचा महमदांचा सण पार पडला कत्तलच्या रात्रीं जो मोठा दंगा होईल असें वाटत होते. परंतु दंगा वगैरे कांहीं होईल असें वाटत होते ते होत नाहीं असें वाटत होतें. कारण त्या दिवशीं पावसाची झडच होती परंतु ईश्वरकरणी विचित्र. रात्र झाल्यावर पाऊस उघडला व नेहमी प्रमाणें जलशा सर्व रात्रभर झाला. बाहेर गांवाहून महमदोत्सव पाहाण्या करितां लोकांची जितकी गर्दी जमत असते तितकी पावसामुळें जमली नाहीं. कित्येक लोकांनीं जमलेल्या समाजामध्यें आपल्या सभ्यपणाची कमाल करून सोडली व व आपल्या हाताचा वेडु भरऊन घेतला मोहोरमांत हिंदु आणि मुसलमान यांचा तंटा होत असतो परंतु साल मजकुरीं हिंदुंचा फार मोठा महत्वाचा सण ह्याचवेळीं नसल्या मुळें व पोलिसाचा बंदोबस्त उत्तम प्रकारचा असल्या कारणानें तसा कांहीं प्रकार घडला नाहीं. शिवाय ह्या जिल्ह्यांत असा एक सरक्युलररूपी हुकूम झाला आहे कीं मोहोरम सुरूझाल्या पासून त्यांचा शेवट होईपर्यंत हिंदु अगर मुसलमान यांणीं हातांत काठी घेऊनये. कोणी काठी हातांत घेऊन फिरत आहे असें नजरेस आल्यास पोलिस ती काठी एकदम काढून घतात लोकांनीं काठी एवजीं छत्र्या वापरण्यास केल्या होत्या. छत्रीला जरी काठी असली तरी तिला दोष नाहीं. व त्या काठीचा कोणी काठी प्रमाणें उपयोग केल्यास सरक्युलरच्या विरुद्ध वागण्याचा त्यजवर दोष येईल कीं नाहीं कोणजाणें. हिंदुंनीं जरी नाहीं तरी मुसलमानांनीच आपसांत मारामारी केली असें म्हणतात.

आज येथें वेदशास्त्र संपन्न गुरूमुर्ती रा. रा.प्रल्हाद अण्णा साहेब यांचे येथें संतरपणाचा बेत उत्तम प्रकारचा होता. ह्या गांवीं हें नामांकित घराणें आहे. धार्मिक आहे. यांचे शिष्य सर्व वऱ्हाड प्रांतांत फार आहेत त्यांचे औदार्यावर गुरू महाराजाचा योगक्षेम चालतो. प्रल्हाद अण्णा हे मोठे विद्वान् भागवत तर यांनींच सांग वे. यांची वाणी इतकी रसीक वक्तृत्वशक्ति इतकी उत्तम आहे कीं श्रोते केवळ टकटक मूर्तीप्रमाणें होऊन जातात. त्यांची श्रवणेच्छा अधिकाअधीक होत जाते. त्यांची विद्वत्त इतकी चांगली आहे कीं लेंचेपेंचे पुराणीक व शास्त्री त्यांचे पुढें हातच टेंकतात. सर्वत्रांचें गुरू असें नांव त्यांना शोभते. त्यांचे विषयीं सर्व जातीच्या लोकांत प्रेमभाव पूज्यबुद्धि ओतप्रोत भरली आहे.

या जिल्ह्यांतील नेटीव सुपरिनटेंडेंट ऑफ व्हॉक्सीनेशनची जागा खालीं होऊन बरेच दिवस झाले. पूर्वीं त्या जागेवर कोणी मुसलमान गृहस्थ होते. परंतु दुर्दैवानें त्यांच्यावर महामारीनें झडप घालून त्यांची यमसदनीं रवानगी झाल्यावर वर लिहिलेली जागा खालीं झाली. ती तेव्हांच भरली जाऊन त्यावर कोणी तरी फर्डा इंग्रजी जाणतां येईल असें लोकांना वाटलें होतें परंतु ती सर्व भ्रांति झाली. ज्या वेळीं ही गोष्ट घडली तेव्हां सॅनेटरी कमिशनर रजेवर होते असें ह्मणतात. त्यामुळें बदली काम करीत असलेल्या गृहस्थांनीं ती भरली नव्हती असें समजतें. कारण त्यांना खात्यांतील लोकांची चांगली माहिती नव्हती ह्मणा अगर कोणत्या दुसऱ्या कारणांनीं ह्मणा ती ह्या काळापर्यंत भरणें राहिली होती. ती आतां भरली जाऊन त्या जागेवर मि. गंगाधर रामकृष्ण सुरंगळीकर यांची नेमणूक झाली त्याप्रमाणें त्यांची स्वारि येऊन आपले जागीं दाखल झाली हे गृहस्थ सतरा आठरा वर्षांपासून ह्या खात्यांत काम करीत आहेत. ह्यांना ह्या खात्यांतील चांगला अनुभव असून उत्तम कामामुळेंच वरिष्टांची मर्जी त्यांच्यावर सुप्रसन्न राहून त्यांची इतक्या मोठ्या जागेवर नेमणूक झाली. ही केवळ चांगल्या कामा मुळेंच झाली. असेंच ह्मटलें पाहिजे. इमानानें काम केल्यामुळेंच इतकी बढती मिळाल्याचें हे एक उदाहरण लक्ष्यांत ठेवून इतरांनीं त्याच प्रमाणें करण्यास झटावें. कधींकधीं चांगल्या कामाचा लोप होऊन जातो. तेव्हां मग नशीब समजावें. हल्लींच्या काळीं इंग्रजींत मी ह्मणणार गृहस्थ पाहिजे तितक्या पगारावर व पाहिजे तितके मिळण्याची वेळ आली आहे. परंत वरिष्ठ गुणग्राही असलेले ह्मणजे केवळ विद्येला व पदव्यांना न भुलता चांगल्या इमानी कामालाच मान देतात त्यांचे हें एक उदाहरण आपल्या ध्यानांत ठेवण्या सारखें आहे. आतां हे गृहस्थ नवीन ठिकाणीं आले आहेत. कामाच्या मोठेपणा सारखें त्यांच्या हाता खालीं लोक आले आहेत तर त्यांनीं सर्वांना वागऊन घेऊन इतर लोकांची प्रिती संपादन करून लोकप्रीय होऊन लोकांत आपली कामाच्या संबंधें व माणुसकीच्या संबंधें कीर्ति गाजवावी ह्यांच्या उदाहरणाचा इतर हलक्या पगारदार लोकांनीं कित्ता घेऊन उत्तम काम करावें. कधींना कधीं त्यांचें नशीब उदयास येईल ह्यांत संशय नाहीं. कळावें लोभ कीजे हा विनंती.

आपला
'x'

---

## जाहिरात

खालीं सही करणार यांजकडून सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं स. नं. ९३ चें खातें लक्ष्मण वल्लद पेंदाजी यांचें नांवें असून तो नंबर आज ४० वर्षां पासून माझे कबज्यांत आहे खुद्द मी वाहत आहे. व साराही मीच भरीत आहे. असें असून हा इसम माझेशीं बेगानी करून लोकांस फुकट खरेदीखत खोटे करून देतो आहे. ह्मणून माझे सर्वत्र लोकांस ह्या जाहिरातीनें हीच विनंती आहे कीं, बेपारीनें लोकांचा हंस हिसकून घेण्याची नियत ठेवूं नये कळावें तारीख ११।९।८९ इ०

(सही.)
लटुसा वल्लद रुसाजी अंभोरे नि० खु०हातची असें.

About 200 sorts of beautifully

and two portraits ... the Viceroy and Lady Lansdowne.

उमेद आहे.

नेश २,००० इटा· छापली

रुपयांचे मास्तर होते. त्यांना एकदम तीस

नोटीस.

रा० लक्ष्मण वल्लद पैकाजी अंभोरे वस्ती मौजे निपाण प्रगणें पिंपळगांव राजा यांस.

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, मौजे मजकूर येथील सरवई नंबर ९३ चे खातें तुझें नांवें असून तूं तो नंबर आज अजमास ४० वर्षां पासून माझें कबज्यांत असून मी स्वतः वाहून त्या नंबरचा सरकारी सारा ही मीच देत आहे.असें असून व विनाकारण आपली नियत बदलून फुकट खरेदी करून देतों असें माझें ऐकण्यांत आलें आहे. करितां तुजला या नोटीशीनें कळविलें जातें कीं, तू तो नंबर कोणास खरेदी देऊं नये आणि तूं जर देतच असलास तर कोणत्या आधारानें तूं लोकांस देतो याचा खुलासा उलट जबाबानें तावडतोब ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत खुलासा करावा. कळावें. तारीख ११—९—८९ इसवी. ( सही. )

लटुसा वल्लद रुसाजी अंभोरे नि० खु० हातची असे.

नोटीस.

नोटीस बेशमी रामचंद्र वल्लद गणोजा कासार राहाणार कजबे वाशीम यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुमचे कडेस आमची तामशी दुकानची बाकी आहे ती तुह्मी आजपर्यंत दिली नाहीं. व वाशीम दुकानचे ही बाकीचा हाशा भरत आला आहे. त्यास या नोटीशीनें असें कळविण्यांत येतें कीं पूर्वीं आह्मी तुमचेवर दिवाणींत फिर्याद केली होती. त्यांत तुह्मी आपलें सल्लाकार यांचे मतांनीं सोने दिलें अशी खोटी तकरार केली तेव्हां आतांही तुह्मी अशीच तकरार कराल करितां ह्या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, जर तुह्मी आमचे देण्या बद्दल वसूल द्याल तर आमचे दुकानचा मुनीम व मुखत्यार यांस देऊन पावती घ्यावी. पावती शिवाय रकम देऊं नये जर करितां पावती खेरीज रकम दिल्याय मी तुह्मास बिलकुल मजरा देणार नाहीं. व वसुला बदल तुमची तकरार ऐकली जाणार नाहीं. करितां ह्या नोटीशीनें कळविण्यांत आलें आहे कळावें ता० ११–९–८९ इसवी.

( सही. )

आनंदाबाइ जवजे पुरणमल तर्फे मुखत्यार सखाराम राघव राहणार कजबे वाशीम.

नोटीस.

रा० सीभाराम बहादरमल दुकान बावनबीर यांस रघु वल्लद जानजी आखेरे वस्ती बावनबीर ता० जळगांव याजकडून देण्यांत येतें जो तुह्मास ता० १३ माहे जुलई सन १८८९ इ० रोजीं तुम्ही भुलथाप दिल्या मुळें खरेदीखत स्थावर मालाचे व जंगम मालाचे २९१ रुपयांचें लिहून दिलें ते रुपये मी तुम्हापसून आगाऊ न घेण्याचें कारण तुम्हास ठाऊक असून तुम्ही चार पंच लोकां समक्ष सदाशिव विठ्ठल बढे यांचे दुकानचे जे देणें माझी भावजई मंजाबाई मर्द भगवान आखेरे इजकडे जे निघेल ते तुम्ही देण्याचे कबूल केल्यामुळें मी न घेतां रकम तुह्माकडे राहिली आहे मी जळगांव कोर्टांत अपाक्रिया केल्याचो फिर्याद सदाशिव विठ्ठल बढे दुकान बावनबीर याचा गुमास्ता रामु वल्लद सदाशिव कानडा याजवर करून तिचे चौकशीची तारीख १७ जुलई नेमिली होती. त्या दिवशीं मी त्या दुकानचे कागद सर्व तहशिलदार साहेब ता० जळगांव यांनीं मला वांचून दाखविलें ते पाहून माझ्या भावजईनें नवीन कागद सर्व करून दिलेले खरे आहेत अशी माझी खात्री झाल्यावरून मी सदाशिव विठ्ठल यांचे दुकानीं गहाण असलेली जिनगी रुपये फिटे पर्यंत दुसरे कोणास देत नाहीं. रुपये फिटल्यावर माझ्या जिनगीचा मी मालक आहे सदाशिव विठ्ठल यांचें गहाण खताचे नंतर तुमचे खरेदीखत आहे तेव्हां ते व्यर्थ आहे यासाठीं मी तुम्हा पासून आतां पैसा घेत नाहीं. यामुळें तुम्हास मी दिलेले खरेदीखत हो नोटीस पावल्या पासून रद्द समजावें. खरेदी खताप्रमाणें जिनगी ताब्यांत मिळण्याबद्दल तुम्ही दात्रा करण्याचे भानगडींत पडूं नये ह्मणोन तुम्हास हो नोटीस दिली आहे खरेदीखता साठीं जो पैसा माझ्या नांवें लिहिला असेल तो मी देण्यास तयार आहे त्या प्रमाणें घेऊन माझें खरेदीखत परत करावें तसें न केल्यास तुमचे खरेदीखत रद्द होण्यासाठीं कोर्टमार्फत इलाज करून या नोटीशीचे खर्चासह पैसा भरून घेईन ता० १—९—८९ इ०

( सही ) रघु व० जानजी आखेर याचे हातची नि० खुद्द.


**AKOLA MEDICAL & SUCICAL HALL.**

Hari Vaman Bhat.
L. M. & S.

## अकोला मेडिकल आणि सर्जिकल हॉल

आह्मीं येथे पेठेंत लोकांच्या सोई करितां दवाखाना काढिला आहे. येथें सर्व रोगांची परिक्षा करून योग्य औषधाची योजना करण्याविषयीं काळजी घेतली जाईल शिवाय, मोती बिंदु काढणें, अडकलेल्या बाळंतीणी सोडविणें वगैरे शस्त्रांनीं होणारे उपचार मोठ्या काळजीनें करूं. येथें ठोकळ व किरकोळ विलायती ताजीं औषधें माफक दरानें मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौंडर ठेविला आहे.

हरी वामन भट. एल.एम. एस.

वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्त शुद्ध करणारा सार्सापरेला, पौष्टिक फास्फरसच्या गोळ्या व केंस काळे होण्याचा कल्प आणि दांतास मजबुती व मुख सुगंधी कारक. दंतशाण. हीं औषधें मिळतील.

## गरमीचे रोगावर औषध.

शरिरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मुत्र समई पतन होतेपरम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आवीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस आहे त्याणी अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

## अन्न पचन होण्याचे औषध

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमुत्र साफ होत नाहीं. पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन जळजळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेम पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्याणी पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डाक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.

## गृहीणी

( कुळवधूंच्या ज्ञानवर्धनार्थ व मनोरंजनार्थ मासिक पुस्तक. )

ह्या मासिक पुस्तकाचें आजपर्यंत पंचवीस अंक निघाले व एप्रिल महिन्यापासून तिसऱ्या वर्षास आरंभ झाला. यांत स्त्रियांचीं चरित्रें, नीति, आरोग्य, पाकशास्त्र, शिवण काम व स्त्रियांस इतर अवश्य वाचण्यालायक अहिषयांचा समावेश केला जातो. याची सालिना वर्गणी मुंबईंत १॥ व बाहेरगांवचे वर्गणीदारांस टपाल हं. निराळे २ आणे पडतील.

विशेष सूचना गरीब शिक्षक लोकांस हें मासिक पुस्तक ट. ह. सह एकरुपयास दिलें जाईल.

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं पैसे व नांवें खालील पत्यावर पाठवावींत.

वर्गणीदार मिळवून देणारांस योग्य कमिशन दिलें जाईल.

पांच प्रती एकदम घेणारांस एक अंक फुकट दिला जाईल.

म्यानेजर गृहिणी,


कि. क्लास नंबर १९ मी० ८/२ ८९.
नंबर नमुना १४३.

कीणीस्यानापन्न होतो तेव्हां त्याचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८६० चा अक्ट २७ कलम २ प्रमाणें.

स्पे. अ. क. सा. जिल्हा यांचे कोर्टांत.

नांव........बाबुजी.
बापाचें नांव........दावलजी
राहणार........उगव. ता० व जिल्हा........आकोलें यांसः—

मयत.

भगु बापाचें नांव रामाजी राहणार उगव तालुके व जिल्हा आकोलें यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्याणी तारीख ११ माहे आक्टोबर सन १८८९ इ० रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्काविशी लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ११ माहे सप्तंबर सन १८८९ इसवी.

C. A. W. Davies.
स्पे. अ. क. ज्यड्ज्य
आकोलें.


## श्रीदत्तपद बोधिनी.

अलिकडे श्री गुरुमहाराजांनीं रा. रा. गोविंद रघुनाथ रनवडे स्कुल मास्तर हुबळी यांच्या हृदय मंदिरीं वास करून त्यांचे कडून ६४ पदें करविलीं तितक्याच पदांचा हा प्रथम भाग करून छापिला आहे. जर हा ग्रंथ प्रसिद्धीस येऊन सकल जनांस प्राप्त होईल तर ते हा भक्तिपुरःसर अवलोकन करून किती आल्हाद पावतील हे सांगावयास नकोच. हीं ६४ पदें छापून झाल्यावर श्रीगुरुचरित्रांतील अध्याय १३-१४ यांतील सांप देवस्थान व दुष्टपवनशा सनास्थान अशीं आख्यानें कविता बद्ध लिहिलीं आहेत किंमत टपाल खर्चा सुद्धां ०७ आणे

वरलिहिलेलीं पुतकें ज्यास पाहिजे असतील त्यानीं किंमतीबद्दल मनिऑर्डर किंवा रोख पैसा पाठविला असतां तावडतोब रवाना करूं. व्हाल्युपेबलनेंही पाठवूं.

विठ्ठल गोविंद बाणा वकीकर वेंगुर्ले वृत्त कर्ते मु० वेंगुर्ले जि० रत्नांगिरी

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

मुक्काम जळगांव ता० १४-९-८९

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

सा० न० वि० वि० आपला व माझा परिचय पुष्कळ दिवसांचा असून माझेवर आपलें पूर्णप्रेम असल्यामुळें मोठ्या उत्सुकतेनें आपणांस भेटण्याची इच्छा उत्पन्न झाली आणि पत्रद्वारां प्रथमींचच भेट असल्यामुळें चार ओळी आपणाकडे प्रसिद्ध करण्या करितां नजर केल्या आहेत त्याचा स्वीकार करून आपण आपल्या सुंदरपत्रीं जागा द्याल ही आशा आहे.

जळगांव हा गांव तालुक्याचा असून आकोला जिल्ह्यांत आहे या गांवीं मुसलमान लोकांची संख्या बरीच असून आठ महल्लें (पुरें) आहेत येथें प्रत्येक सालास गणपतीची शब्गस्त निघत असते. मोहरम आणि गणपती यांची एकच वेळ आल्यामुळें प्रत्येक ठिकाणीं हिंदु व मुसलमान यांच्यांत तंटे होणें सहाजिक आहे. कारण प्रत्येक ज्ञातीस आपापले ज्ञाती धर्माचा अभिमान असतोच व तो असणें सहाजिकच आहे परंतु या गांवीं सभ्य व प्रसिद्ध साहुकार श्रीमंत महाराज रा० रा० दिनानाथ गोपळ उर्फ बाबा साहेब हे असल्यामुळें उभयपक्षांचे लोकांस समान समजून जाती अभिमान मनांत न आणितां हिंदु व मुसलमान यांच्यांत तंटा न व्हावा असें विषयीं फारच दक्षता ठेवितात त्यामुळें या गांवीं आजवर वरील लोकांत कधींच तंटा उत्पन्न होत नाहीं. दुसरें साल मजकुरीं मुसलमान लोकांत मोहरमांत तंटा होण्याचें घाटत होतें. परंतु आमचे येथील वर सांगितलेले प्रसिद्ध साहुकार यांनीं तो प्रकार न घडण्याविषयीं बरीच खटपट केली. अलीकडे तंटे वगैरे न होतां आमचे येथील मोहरम, ताबूत व गणपती यांचे जलसे मोठ्या थाटामाटानें होऊन निर्विघ्नपणें शेवटास गेले हें पाहून ईश्वराचे आभार मानून साहु मजकुराची फार तारीफ करितों.

वरील संबंधांत आमचे येथील तहशिलदार रा० व पोलिस यांनींही बरीच मेहनत घेतली या विषयीं त्यांचीही तारीफ करणें जरूर आहे. कारण त्यांनीं आपलें काम बरोबर बजाविलें. तारीख १४ मोहरम रोजीं वरील प्रसिद्ध साहु साहेबांनीं आमचे येथील एकंदर ग्रामस्थ व परग्रामस्थ (मोहरमचे तमासगीर) मुसलमान लोकांस आपले स्वतःचे बागेचपांत फार मोठी जाफत दिली. एकंदर दोन हजार लोकांवर हा खाना झाला. याबद्दल साहु साहेबांस तीनशें रुपयांवर खर्च लागला असावा असें आम्हांस वाटतें. हा खाना देण्याचा समारंभ पाहण्यास मी स्वतः गेलों होतों. आमचे येथील महंमद कुलीन लोक फारच फार कृतार्थ होऊन साहु साहेबांची फारच वाखाणणी करीत. खेरीज यांचेंच नांव सदाचरण व देश सेवा याचा किंवा सभेंत संभाषण करून त्या सारखी कृती न करणारे लोकांनीं घेणें अवश्य आहे. रा. बाबा साहेब यांचा असें करण्यांत आमचे नेटिवबांधवांत प्रेम राहावें या शिवाय दुसरा हेतु नसणें हें उघड आहे. वरील गृहस्थांनीं केलेला खर्च व परिश्रम या संबंधानें सूज्ञ, विद्वान व देशहितेच्छु लोक आमचे साहूसाहेबांचे स्तुत्य कृत्या बद्दल तारीफ करितील हे निर्विवाद आहे. शेवटीं साहु साहेबांचे औदार्याचें आम्ही अभिनंदन करून लेख पुरा करितों व आमचे पत्रकर्ते महाराजांची रजा घेतों.

आपला देशमित्र,
"क्ष"

---

पिंपळगांवराजा तारीख १९।९८९

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांसः—

वि० वि० आपल्या जगमान्य पत्रीं ह्या चार ओळीस जागा मिळेल अशी आशा आहे.

शंकाः—आमचे देशसुधारक पत्रकर्ते ह्या शंका निवारण करतील काय? उपोषण उपवास कां करावें? व त्या पासून काय हित व अनहित आहे? उपोषण करणें सशास्त्र आहे काय? असेल तर कोणत्या पुराणाच्या आधारें आहे? पुराणे वेदसंमत आहेत काय? वेदांत उपोषणें आहेत काय? उपोषणें करणारांचा काय उद्देश होता? उपोषणें कोणी करावीं? उपोषणापासून ईश्वर प्राप्ती होते काय? आजादिनपर्यंत उपोषणें करणारांस काय फळें मिळालीं?

मागील बातमीची पुरवणी—

आज बुधवार असल्या कारणानें माझा नेम आहे कीं, त्या दिवशीं विठ्ठल महाराजाचें दर्शन घ्यावें ह्मणून मी एका देवळांत गेलों त्या ठिकाणीं कीर्तन चाललें होतें. तेथें गांवची बरीच मंडळी मिळाली होती सबब मीही तेथें कांहीं वेळ थांबलों. सदरील गृहस्थ हिंदु किंवा कोणत्या ज्ञातीचा आहे अशी मनांत शंका येऊन मी त्या विषयीं तपास करूं लागलों तेव्हां असें कळून आलें कीं, हे गृहस्थ इमामजयंतीस अनुसरणारे आहेत यांचे वास्तव्य येथीलच आहे. सदरहू गृहस्थ कीर्तन बरें करितात. व यांची वाणी ही फार उत्तम आहे. परंतु त्यांच्या अंगीं असा एक गुण अलीकडे वाढला आहे कीं, तो प्रसंगानुसार त्यांनाच बाधणारा आहे. तो असा कीं, हे गृहस्थ एकाच ठिकाणीं राहत नाहींत. नेहमीं गांवोगांव फिरत असतात, ज्या ज्या ठिकाणीं हे जातात त्या त्या ठिकाणीं लोकांनीं ज्ञातीसंबंधीं प्रश्न केला असतां आपली ज्ञाती न प्रदर्शितां लोकांस सांगतात कीं, मी ब्रह्मचारी आहे असें लोकांच्या सांगण्यावरून समजतें. त्यावरून लोक समजतात कीं, असेल बिचारा ब्रह्मचारी. हे कशावरून फसतात ह्याचें कारण असें कीं, हे गृहस्थ बरेंच दिवसां पासून हिंदूंत वावरले असून कालक्रमणही त्या लोकांतच होतें. त्यामुळें मराठी भाषा इतकी उत्तम प्रकारें जाणतात कीं त्यांचें बोलणें ऐकून ही दुसरे ज्ञातीचाच आहे अशी शंका मनांत आणण्यास नको हा गृहस्थ गोरा, बांधा सडपातळ असून थोडासा उंच आहे डोळ्यांनीं चांगलें दिसत नाहीं. झावळें झावळें दिसतें कारण डोळे मिचमिचे आहेत. पोषाख हिंदु सारखाच आहे अशी एकंदर त्यांच्या कृतीवरून लोक सहजच फसतात. हल्लीं यांचा इतका क्रम चालूं आहे कीं सदरहु इमाम जयंतीस भजणारास सर्व ज्ञातीचे लोक प्रत्यक्ष पाया पडतात कांहीं दिवसांनीं असें न होवो कीं, ब्रह्मचारी ह्मणता ह्मणतां पुरा ब्रह्मचारी बनून गांवोगावीं मोहनास्त्र टाकून व्यभिचार न होवो लोकांत अशी एक ह्मण आहे कीं, दुनिया झुकती हय झुकानेवाला होना या ह्मणी प्रमाणें ह्या गृहस्थाचे वर्तन आहे करितां हिंदु लोकांनीं बरेंच खबरदारीनें सदरील गृहस्थांशीं वर्तन ठेवावें.

आपला एक 'क्ष'

---

मुक्काम सातेफळ ता० १५।२।८९ इ.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

विनंती विशेष आपले भेटीचालाभ मिळावा म्हणून भेटीस आलों एडिटर साहेब भेटल्याल आशी फार उमेद करून आलों आहे तुमचा आमचा नवीनच परिचय होणार तरी कृपालोभ ठेवितजावा व लेंकराचा सांभाळ करीत जावा हा भरंवसा धरून आपली किर्ती दुरून ऐकून आलों अहे तरी खालील मजकूर छापण्याची मेहेरबानी करावी सुज्ञांना ज्यास्त लिहीणें नको

मी फिरत फिरत या गांवीं आलों तों गांव चांगला रमणिय असून घरें ही २०० चे वर आहेत.व लोकही बरेच श्रीमान् आहे म्हणून कांहीं दिवस मुक्काम केला या गांवीं धर्मशाळा असून लोकांस उतरण्याची फारच तखलीफ होते १ एक चावडी पंढ्राच बांधलेली आहे. व शाळेंत उतरावे तर ती ही उघडी आहे ती अझून तयार झाली नाहीं म्हणून मुलें शाळेंत न बसतां चावडींत बसतात व मास्तरही फार गरीब असून स्वभावांनीं चांगलें मन मिळाऊ आहेत व सदरील शाळा गांवचे अधिकारी बालाजी देशमुख यांनीं आपले पदरचा पैसा खर्च करून खानगी शाळा एक वर्ष झालें स्थापन केली परंतु शाळेंत मुलें फारच थोडकीं असून १०।१५ आहे तर इकडेस गांवचे अधिकारी लक्ष्य देतील तर बरें नाहींतर कांहीं दिवसांनीं शाळा बंद होईल. तरी त्यांनीं या कामीं लक्ष्य पुरवून लोकांस चांगली समज देऊन मुले जमण्या विषयीं खटपट करावी म्हणजे शाळाही सुधारेल व लोकांचा फायदा होऊन कांहीं दिवसांनीं सरकारी शाळा होईल.

आणखी या गांवीं कापलेश्वर माहादेवाचें देवालय आहे ते हेमाडपंती असून फार उत्तम आहे व तेथें माघमासीं शिवरात्रीस गांवचे अधिकारी पदरचा पैसा खर्च करून उत्साह करितात. व त्यांत अन्नदान ही पुष्कळ होतो शिवाय गांवांत आठ दिंड्यांचा मेळ आसून दरसोमवारीं देवालयांत सदर दिंड्या येऊन भजनाचा बराच थाट होतो शिरण्या वगैरे वाटून वाण्याचा खप होतो आणखी येथें मारुती आहे परंतु उघडा आहे मात्र सभोंवती मातीचा पार आहे नित्य मारुतीचें आंगावर कावळे वगैरे हागून हागून पांढरा करितात तर माझी गांवचे अधिकारी यांस विंनती हीच आहे कीं, कसेंही करून या गांवीं एक धर्मशाळा व मारुतीचें देवालय आणि शाळेंतील मुलांची संख्या वाढीवण्या कडेस लक्ष्य पुरावितील आणखी या गांवीं बजार भराविण्या विषयीं खटपट करतील तर त्या पासून लोकांचा व्यापार वाढून गांवची सुधारणा होईल व येथील देशमुख बाळाजी उर्फ बापुसाहेब फार सुसील व दयावंत आसून परोपकारी आहेत आल्या गेल्याचा सत्कार करून शक्ति प्रमाणें नित्य धर्मादाव व आन्नदान करितात याचे मन ईश्वर भजना कडेस असून यांनीं लोकांस उपदेश देऊन त्यांचें मन ईश्वर भजनाकडेस लाविलें हें पाहून आम्हास फार आनंद झाला तर आमची ईश्वरास प्रार्थना हीच आहे कीं अशा दयाळु पुरषास सुखरूप ठेवून त्याची दिवसानुदिवस बढती होऊन त्यांचे बाल व गांस परमेश्वर चिरकाल यश देवो हेंच मागणें आमचें अहे.

एक फिरस्ता
"क्ष"

---

मु० सस्ती तारीख १९-९-८९ इ.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

वि० वि० आपले सुंदर पत्रांत खालील चार ओळीं छापण्याची कृपा करावी.

आज मिती पर्यंत पाऊस पाणी उत्तम स्थितींत असून, पिकेंही बरीं आहेत. रोगराई कांहीं नाहीं.

ह्या गांवांत मुख्य प्रमुख गृहस्थ— श्रीमंत रा० रा० रामराव भगवंतराव देशमुख हे होत हे गृहस्थ वयानें वृद्ध नसून फार चाणाक्ष, शांत स्वभावाचे मिलाफी व परोपकारी आहेत. यांनीं लोकांचीं मनें वळवून, गांवास बरीच शोभा आणली आहे. ह्मणजे गांव लहान असून, सडका, बाजार, शाळागृह, कोंडवाडा वगैरे कामें यांचे योगानेंच घडून आलीं व त्याबद्दल सर्व ग्रामस्थ त्यांचे फार आभारी आहेत. अलिकडे सडकेनें खांब कंदील हीं लावण्याची कांहीं योजना चालविली आहे, फार स्तुत्य गोष्ट आहे. परंतु गांवांतून अजून सर्वत्र, सडकेचे रस्ते नसल्यानें चिखलांतल्या रस्त्यांत कंदील लावल्यानें विशेष शोभा दिसणार नाहीं असें आम्हास वाटतें. तरी श्रीमंतांनीं आधीं सर्व गांवांतून सडका होण्या विषयीं तजवीज केल्या वांचून वरील उद्योगाचें चांगलें फळ होणार नाहीं. यांचे शाळेकडे बरेंच लक्ष्य आहे. हे स्कूल कमेटीचे प्रेसिडेंट आहेत. हे नेहमीं शाळेंत जातात व मास्तर लोकांच्या बऱ्याच

अडचणी दुर करितात व मुलांस शाळेंत येण्याची गोडी लागावी ह्मणून त्यांना वारंवार सदुपदेश करून व कांहीं खाऊ देऊन त्यांची मनें खूष करितात. ही केवढी औदार्याची गोष्ट आहे हे वाचकांचे ध्यांनीं आल्या वांचून राहणार नाहीं. या प्रमाणें श्रीमंत साहेबांचें शाळेकडे लक्ष्य राहिल्यास मास्तर लोक किती दुवा देतील बरें!

गांवचें काम करीत असणारे कुळकर्णी रा० रा० पुरुषोत्तम आण्णा साहेब हेही सद्गृहस्थ असून फार परोपकारी आहेत, क्षमाशील व विचारवंत आहेत. यांचेंही शाळेच्या सुधारणुकीचें कामीं बरेंच पाऊल पुढें आहे. व त्या बद्दल त्यांची आह्मी फार शिफारस करितों. अशा बड्याबड्या गृहस्थांनीं असें शाळेच्या सुधारणुकीचे कामीं चिरकाल समान लक्ष्य ठेविल्यास, सरकारही फार खुष होईल ह्यांत संशय नाहीं.

या गांवापासून तिन कोसांवर दक्षिणेस अलेगांव व उत्तरेस तिन कोसांवर वाडेगांव आहे. ह्या दोन्ही गांवांस व्यापार वगैरे बरा चालत असून सावकारी देणें घेणेंही बरेंच चालते. या संबंधानें वरील गांवचे रस्ते हा हमेष चाललेच आहेत. परंतु दोन्ही गावांस जाण्या करितां जे रस्ते आहेत. ते फार खराब आहेत म्हणजे पावसाळ्यांत सर्व रस्ताभर फार चिखल होऊन, उन्हाळा हिवाळ्यांत ही गाडी नेणारांस फार तकलिफ होते कारण रस्ते उंच सखल फार आहेत. ह्या रस्त्यानें कपाशीचे दिवसांत रात्रं दिवस कपाशीच्या गाड्या चालतात. कारण खामगांवास जाण्याचा मुख्यमार्ग आहे. तरी अशा प्रवासी लोकांस जो त्रास होतो तो सांगता येत नाहीं तर या कामीं सरकारांनीं लक्ष्य घालून सडकेचा रस्ता केल्यास प्रवाशी लोकांची मोठी अडचण दूर होईल.

आपला

एक ( ग्रामस्थ )

नोटीस.

रा. रावजी वल्लद परशराम राखाडे जात माळी वस्ती मौजे दहीगांव प्रगण नांदुरा तालुके मलकापूर जिल्हे बुलडाणें यास खाली सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येतें कीं तूं माझा लग्नाचा नवरा आहेस लग्न झाल्या पासून अदमासें पंधरावर्षें झालीं तू मजला वागविलेस परंतु आतां ३॥ साडेतिन वर्षां पासून तूं मजला मारहाण करून आपले घरातून हाणून दिले तेव्हां पासून तू मजला नेण्यासही आला नाहींस व मजला व माझी मुलगी नामे सोनी हिजलाही ने खाण्यास अन्नखर्च दिले नाहीं व वस्त्र प्रावर्ण ही दिलें नाहीं म्हणून मी ऐथें लाच्यार होऊन मानाजी सातव याज पासून आज पर्यंत एकंदर कर्ज १५० दिडसे रुपये काढले आहेत त्यानें मजकडे रुपयांचा तगादा लाविला आहे तर तुजला या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्या पासून एक महिन्याचे आंत १५० रुपये घेऊन येऊन त्या सावकारास देऊन आणि मजला घेऊनजा जर मी दिलेल्या नोटिसीचे मुदतींत तूं असें केलें नाहींसि तर मी नोटिसितील करार संपल्याचे दुसरें दिवशीं दुसरा घरठाव हिच फारकती समजून करीन आणि मी काढलेल्या कर्जाबद्दल तुजवर दिवाणीत नालिश करून तुजपासून रुपये घेईन याशिवाय आणखी पूर्वी मी तुजला पोष्ट मार्फत दोन नोटिसा दिल्या होत्या ही नोटीस दिली आहे सही तारीख १९।९।८९

( सही )

सयनी मर्द रावजी राखडे निशाणी

खुद्द हातची बांगडी.

नोटीस.

जाणू वल्लद मोती रजपूत गवळी राहणार अकोला व जाणू वल्लद कचरू महार राहणार पारस हल्लीं मुक्काम अकोला या दोघां उभततांस नोटीस देण्यांत येतें कीं, मी खालीं सही करणार कळवितों कीं, म्युनिसिपाल कमेटीचे हद्दींतिल नेमलेल्या जाग्यांतील गवत तारीख १ ली माहे जून सन १८८९ इ० हरासांत घेतलें त्यावेळेस तुह्मी आम्हांस भागीन ठेवण्यास तोंडीं कबूल केलें व त्याच वेळेस या रुपयांची चौथाई आह्मांस देण्याचें कबूल केलें परंतु अझून दिली नाहींत आह्मी हरासाचे सर्व रुपये आपले पदरचे कमेटींत भरले या करितां तुमच्यावर सदरहु महिन्या पासून तारीख १९ माहे सप्तेंबर पावेतों भागीनचे रुपये १५० व त्याचे व्याज दर रुपयास दरमहा एक आण्या प्रमाणें देऊन तुमची भागीन कायम ठेविली जाईल ता० १९ पासुन तुमचा हिशेब बंद आहे आज तारखेपासून आठ दिवसांचे आंत येऊन टिकमदास ताराचंद यांचे दुकानीं आमचे नांवें सदरहू रुपये व्याजासुद्धां जमा करावें नंतर येऊन हिशेब पहावा व जे तुमचे कांहीं भागिनीचे निघेल ते आपले घेऊन जावें जर न याल तर तुमचा भागीन बद्दल हक्क राहणार नाहीं. व कांहीं हक्क चालणार नाहीं कळावें तारीख १८ माहे सप्तेंबर सन १८८९ इसवी.

( सही. )

नानाभाई जीवनजी

कंट्राक्टर.

## जाहिरात

सर्व लोकांस जाहीर करण्यांत येतें कीं, ज्या लोकांची भंगीपट्टीचें लायसेन्स घेण्याची मुदत सप्तेंबर अखेर संपत आली असेल, त्यांनीं ता० ३०।९।८९ चें आंत पुढील मुदतीचें लायसेन्स घेऊन जावें. न घेतल्यास त्यांचे पायखाने साफ करण्याचें बंद केलें जाईल. व त्यांनीं पुढें लायसेन्स घेतल्या वांचून पायखाना सुरूं ठेविल्यास त्याजवर मैला केल्याबद्दल कोर्ट मारफत मुकदमे करण्याची तजवीज केली जाईल. करितां ज्यांच्या लायसेन्साच्या मुदती संपल्या असतील त्यांनीं मुदत संपण्याचे आंत लायसेन्सें घ्यावींत. नाहींपेक्षां यापुढें कमेटी पायखाना साफ करण्याचें संबंधानें जबाबदार राहणार नाहीं. लायसेन्सें कमेटीचे आफिसांत ( टाऊन हालांत ) ११ वाजेपासून ५ वाजे पावेतों मिळतील. कळावें ता० १५।९।८९

Shankar Goviud
Conservancy
Superintendent
A. M. C.

## जाहिरात
## अकोला म्यानुफ्याकचरिंग कंपनी लिमिटेड.

या जाहिराती वरून प्रसिद्ध करण्यांत येतें कीं रोज शुक्रवार तारीख २७ माहे सप्तेंबर सन १८८९ रोजीं दोन प्रहरीं २ वाजतां खालीं लिहिलेलीं कामें करण्या करितां शेअर होल्डरांची दुसरी जनरल सभा मुंबई येथील चर्चगेटस्ट्रीट वरील घर नंबर १९ चे रजिष्टर झालेले आफिसांत भरणार आहे.—

( १ ) तारीख ३० जून १८८९ इ. अखेर दहा महिन्याचा नफा तोट्याचा हिशेब व डायरेक्टरांचा रिपोर्ट तयार केलेली शिलक पट्टी तपासणें.

( २ ) नफा जाहिर करणें.

( ३ ) जे फेर पाळीनें निघतात परंतु ज्यांना पुन्हा पसंत करतां येतें अशा डायरेक्टरांचे जागीं दुसरें नेमणें.

( ४ ) आडिटरची नेमणूक करणें व त्याचा पगार ठरविणें. व या लेखावरून जाहीर करण्यांत येतें कीं, सदरहु कंपनीचीं ट्रान्सफर बुकें तारीख १७ सप्टेंबर पासून तारीख २७ सप्टेंबर पर्यंत बंद राहतील.

आर्डर वरून

एस्. बी. कात्रक आणि कंपनी

सेक्रेटरी, म्यानेजर, आणि एजंट.

## गृहीणी

( कुलवधूंच्या ज्ञानवर्धनार्थ व मनोरंजनार्थ मासिक पुस्तक. )

ह्या मासिक पुस्तकाचें आजपर्यंत पंचवीस अंक निघाले व एप्रिल महिन्यापासून तिसऱ्या वर्षास आरंभ झाला. यांत स्त्रियांचीं चरित्रें, नीति, आरोग्य, पाकशास्त्र, शिवण काम व स्त्रियांस इतर अवश्य वाचण्यालायक आहे विषयांचा समावेश केला जातो. याची सालिना वर्गणी मुंबईत १॥ रु. व बाहेरगांवच्या वर्गणीदारांस टपाल हं. निराळे ३ आणे पडतील.

विशेष सूचना गरीब शिक्षक लोकांस हें मासिक पुस्तक ट. ह. सह एकरुपयास दिलें जाईल.

वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं पैसे व नांवें खालील पत्यावर पाठवावींत.

वर्गणीदार मिळवून देणारांस योग्य कमिशन दिलें जाईल.

पांच प्रती एकदम घेणारांस एक अंक फुकट दिला जाईल.

म्यानेजर गृहिणी,

## श्रीदत्तपद बोधिनी.

अलिकडे श्री गुरुमहाराजांनीं रा. रा. गोविंद रघुनाथ रनवडे स्कूल मास्तर हुबळी यांच्या हृदय मंदिरीं वास करून त्यांचे कडून ६४ पदें करविलीं तितक्याच पदांचा हा प्रथम भाग करून छापिला आहे. जर हा ग्रंथ प्रसिद्धीस येऊन सकल जनांस प्राप्त होईल तर ते हा भक्तिपुरःसर अवलोकन करून किती आल्हाद पावतील हे सांगावयास नकोच. हीं ६४ पदें छापून त्याच्यावर श्रीगुरुचरित्रांतील अध्याय १३-१३ यांतील सायं देवाख्यान व दुष्टपवनशा आख्यान अशीं आख्यानें कविता बद्ध लिहिलीं आहेत किंमत टपाल खर्चा सुद्धां ०७ आणे

वरलिहिलेलीं पुस्तकें ज्यास पाहिजे असतील त्यांनीं किंमतीबद्दल मनिऑर्डर किंवा रोख पैसा पाठविला असतां तावडतोब रवाना करूं. व्हाल्युपेबलनेंही पाठवूं.

विठ्ठल गोविंद बाणा वालीकर वेंगुर्लें

वृत्त कर्ते मु० वेंगुर्लें जि० रत्नांगिरी

द्र येड़ा ल्यावर आंत, माळ्याच्या शनार ना दुसऱ्या दिवाणखाण्यांत माळ्याशीं होणार. त्याणें एकें येईल असें बसविलें आणि मी माळ्याच्या आंगास दाराच्या शेजारीं वरीलों व माळ्यास आपल्या जवळ घेऊन सांगितल्या प्रमाणें तूं साहेबांस सांगितलें कीं नाहीं व त्याप्रमाणें साहेबाची खात्री झाला कीं नाहीं असें त्यास विचारलें. तसें होणें शक्य नाहीं असें मीं साहेबांस सांगितलें व तो तसे कबूल करीत नसला तर आपणांस त्याची परवा नाहीं असे साहेब म्हणाले असें त्यानें सांगितलें मी १०।१२ वर्षे साहेबाच्या नोकरीस असून असा प्रकार रत्नागिरीस नेहमीं होत असतो असें त्यानें सांगितलें. संभावित गृहस्थांच्या मुली व बायका साहेबाकडे नेहमीं येत असत रत्नागिरीस कृष्णराव नांवाचा चिटणीस होता त्याची मुलगी साहेबाबरोबर राहात असे व त्यामुळें तिच्या भावाला सोलापुरास चाकरी दिली आहे. इतकें बोलणें झाल्या नंतर माळ्यास रवाना करून दिला. हा प्रकार झाल्यावर उइलसन तेथें असेपर्यंत व त्याच्या नंतरही मी कामाच्यासंबंधानें अगर खाजगीही मी त्यास भेटावयास गेलों नाहीं. नंतर या संबंधाचें मि. उइलसनचें पत्र मला आलें तें हें आहे व आज तारखेचें दुसरेंही एक पत्र मला आलें व आव रून नथुराम यास मी साहेबाकडे पाठविलेली सर्व ला. त्याच्या या पत्राचा ... औषधीं मी लक्ष ... रोजीं मीं पाठविला ... पाहिली. तीं फार पाठाव निर्वोक आहेत. जबाब ९ दिसेंबर (स ... आणि ता. ● रोजीं ... आणि सालिसीटर मि. ... सल्ला घेतला म्हणजे हा सल्ला घेतल्या नंतर तो जबाब पाठविला. नंतर मि. उइलसन यांच्या भेटास मी गेलों नाहीं याबद्दलचें उत्तर मीं ता. १२ रोजीं पाठविलें, नंतर या संबंधानें दुसऱ्याही कित्येक आणि माझें बोलणें झालें. माझ्या भावे नेंही या संबंधानें कांहीं खटपट केली नंतर ता. १८ दिसेंबर रोजीं मि. उइलसनाच्या ता. १९ दिसेंबरच्या पत्राचा जबाब पाठविला, नंतर मी खेड्यास गेलों, तेव्हां तेथें कमिशनर होता. ता. २० रोजीं मि उइलसनही तेथें होता व मि. शेपर्ड यानें चौकशी सुरू केली. याप्रमाणें फिर्यादीची फिर्याद असून मि. उइलसनचे बारिस्टर मि. इन्व्हेरारिटी यांनीं ता. ४ रोजीं फिर्यादी मि. लाई यांची फार कडक अशी उलट तपासणी केली आणि त्या दिवशीं दुसरेही एक दोन साक्षी झाले. निकाल अद्याप व्हावयाचा आहे. एकंदरीनें खटला फार निर्लज्जपणाचा आहे खरेपणा कितीही असला तरी असले प्रकार बाहेर येणें दोघांहीही पक्षास लांछन आहे. ठा० अ०

णकारी
तु जा-
ती ही
क बरा

— जुबिली समारंभाचे प्रसंगीं पुण्यवास मानमरातब मिळतीलच. प्रिन्स आफ वेल्स सारखा मोठा माणूस आपल्या इंपिरियल इंडियन आणि कालोनियल इंस्टिट्युटास लोकांजवळून मदत मागतो आहे तेव्हां जितकी रक्कम जास्ती तितक्या प्रमाणानें मोठा हुद्दा मिळावयाचा असें होईल व. पालमाल गॅझेटनें किताबांच्या किंमती दिल्या आहेत. नैटच्या किताबाचा किंमत १०,००० पौंड, बारोनेटची २५,०००,

Lady Lans... ०.०० ... Vic...

तयार. म्हणज किताबावर किताब येतील. अशी ही संधी दवडूं नका.

— धुळें आणि चाळीसगांव यांच्या दरम्यान होणाऱ्या रेलवेचे मोजणीचें काम चाळीसगाव पासून धुळ्या पावेतों आटोपत आलें असून स्टेशन वगैरे कोणत्या ठिकाणीं करावें याबद्दलची पाहणी रेल्वेचे इंजिनियर साहेब बहादूर करीत आहेत.

— मि० गोस्चेन यांनीं चांन्सलर आफ धि एक्स्चेकरचे जागेवर व कॅबिनेटमध्यें येण्याचें कबूल केलें. लार्डनार्थब्रुक व लार्ड लांडसडोन यांनीं काबिनेटमध्यें येण्याचें नाकारलें. डब्ल्यू एच स्मिथ हे फर्स्ट आफ ट्रेझरी व हाऊस आफ कामन्सचे प्रमुख होणार.

— इंडिया कौन्सिलमध्यें कर्नल सरओवन यांची नेमणूक झाली. ने. ओ.

प्रिन्स आफ वेल्स यांस जुबिली निमित्त प्रिन्स 'इम्पिरियल आफ इंडिया' असा नवीन किताब द्यावा व असाच क्रम पुढें चालू ठेवावा अशी कयापटन कुंडू नांवाच्या गृहस्थानें सूचना केली आहे.

एका फ्रेंच ज्योतिषानें असें भाकीत केलें आहे कीं चालू सालीं फ्रान्स व जर्मनीशीं लढाई होईल व प्राशियन लष्कराचा जय होईल ...

पत्रं ... [illegible]

... पदर

कलकत्ता येथें बाबू बिहारीलाल घोस हे धंदे शिकविण्याची एक शाळा स्थापन करणार आहेत असें इंडियन मिरर वरून समजतें.

जुबिली निमित्त २॥ रु. चें एक नवीन नाणें करण्याचा सरकारचा विचार चालू आहे असें म्हणतात.

गिल्झी लोकांनीं पुन: बंडावा सुरू केला व दुसऱ्या जातीचे लोक त्यास मिळतील अशीं चिन्हें दिसतात. काबुलचे अमिर तो बंडावा मोडण्यासाठीं जारीनें तयारी करीत आहेत असें समजतें.

भोपाळच्या बेगम साहेबांनीं आपल्या राजधानीच्या लोकांस पाण्याची सोय होण्यासाठीं जुबिली निमित्त सुमारें दोन लक्ष रुपये खर्च करण्याचा विचार केला आहे.

ब्रम्हदेश इंग्रज सरकारानें ताब्यांत घेतल्यामुळें चीनसरकार दचकून जागृत झाल्या प्रमाणें वर्तन करूं लागलें आहे. ब्रम्हदेशाप्रमाणेंच नेपाळ, भोतान व सिक्किम ह्या संस्थानांत चीनसरकारचें वर्चस्व आहे व इंग्रज सरकारचाही त्या संस्थानांशीं संबंध आहे. यास्तव थोड्या दिवसांपूर्वी भोतानांत जो बंडावा झाला होता त्याची चौकशी करण्यास्तव चीनसरकारानें आपले अमलदार पाठविले होते व त्यांच्या मध्यस्तीनें तिकडे शांतता झाली असें म्हणतात.

जगांत हल्लीं मासिक पुस्तकें व वर्तमानपत्रें मिळून ३६,००० चालू आहेत. त्यांपैकीं १९,००० युरोपांत, १२,००० युनायटेड स्टेटस मध्यें ३,००० एशियांत ७०० आस्ट्रेलियांत व २०० आफ्रिकेंत, या प्रमाणें निघतात. यांपैकीं १६,५०० इंग्रजी भाषेंत, ७,८०० जर्मन, ६,८०० ... भाषेंत २,००० इटा... उमेद आहे. ... छापली ...

श्री

मट
हे
काम क
रुपयांचे

( पुरवणी वऱ्हाडसमाचार. )

SUPPLEMENT.

## तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १८८७ इ०

## वर्तमानसार.

खेड्याचे कले मि. उइलसन यांच्या विरुद्ध क्यांबेचे दिवाण मि. लाड यांणीं त्यांवर आणलेल्यां आरोपाची चवकशी करण्याकरितां अमदाबादेस कमिशन पुढें चवकशी सुरू झाल्याची बरीच हकीकत बाहेर आली असून त्यांत मि. उइलसन यांच्यावर काय आरोप आणलेला आहे याचाही खुलासा झाला आहे. मे. उइलसन यांनीं आपली मुलगी वाईट कामाकरितां मागविली अशी मि. लार्ड यांची फिर्याद आहे गोषवारा असा आहे कीं, गेल्या नोवेंबरच्या २२ व्या तारखेस मि. उइलसनचा खासगी नोकर झाल्या हा मजकडे आला व त्यानें आपल्या यजमानाचें एक पत्र मला दिलें व मीं वाचून त्यास परत दिलें तें हल्लीं मजजवळ नाहीं, तें पत्र मि मूळक यांनीं मि. उइलसन यास लिहिलेलें होतें असें मि. उइलसन यांनीं माझ्या समक्ष मि. शेपर्ड यांस सांगितल्यावरून मला कळलें. त्या पत्राचा मतलब असा होता कीं, क्यांबेच्या दिवाणाची जागा रिकामी आहे काय? असेल त[...]ल्या भाचे डेपुटी कलेक्टर मि. उमेदराम ती जागा कबूल करीत आहे. त्याला ती मिळण्याकरिता तुम्ही खटपट कराल तर मला आनंद होईल. मी व मि. शेपर्ड या उभयतांची अशीच इच्छा आहे. या प्रमाणें पत्राचा मतलब सांगून नंतर दिवाण मि. शामराव हे सांगतात कीं, पत्र दिल्या नंतर झाल्या माळी यांस माझ्याशीं कांहीं एकांतात बोलावयाचें आहे असें वाटल्यावरून मीं त्यास एकीकडे घेतला, तेव्हां माळी म्हणाला तुमची मुलगी नबाबाकडे जात आहे तर साहेबाकडे जाण्यास काय हरकत आहे, शिवाय सोहबाकडे गेल्याने साहेब फार खुष होतील हें ऐकून मला फार राग आला आणि मीं माळ्याला परत लावून दिला. दुपारी चार वाजतां नजूमखानास बरोबर घेऊन मी मि. उइलसनाकडे गेलों, संध्याकाळीं उइलसनचा एक नोकर मजकडे येऊन उद्या सकाळीं तुम्ही बरोबर कोणास न घेतां साहेबाच्या भेटीस या असा साहेबाचा निरोप सांगितला. त्याप्रमाणें सकाळीं ८ वाजता लालबागेंत साहेबाकडे गेलों. साहेब म्हणाले माझा माळी काल तुम्हास भेटला काय? मीं विचारिलें काय संबंध? साहेब म्हणाला तुमच्या मुलीच्यासंबधानें, मीं विचारले ह्मणजे काय? तुमच्या या म्हणण्याचा अर्थ मला कळत नाहीं, साहेब म्हणाला ती नबाबाकडे जात असते, मी ह्मणालों तुम्हीं हें ऐकलें असलें तर तें खोटें आहे, साहेब ह्मणाला, ते मलाही खरें वाटलें नाहीं, मी विचारलें, असल्या गोष्टी करणारे आह्मी आहोंत काय! हिच ह्मणाला, रत्नागिरीचे प्रभूलोक असें करीत असतात. मी म्हणालों ते तसें करतात किंवा नाहीं याच्याबद्दल मी परवा करीत नाहीं, साहेब ह्मणाला मी [...] नारा मनुष्य नाहीं [...]

इच्या तितक्या बायका आहेत. साहेब म्हणाला त्यांतील एखादा लागल्यास ती आणूं शकेन मी पण मला तुझी मुलगीच पाहिजे आहे. नंतर तुम्ही हा भलत्याच प्रकारचा उपाय करीत आहांत असें मीं त्यांस सांगितलें आणि निघून गेलों घरीं आल्यावर मी चिंताक्रांत झालों व साहेब मजवर रागावला आहे, माझें ह्मणणें त्यास खरें वाटलें नाहीं असें वाटून माझ्या मनास दुःख झालें. इतक्यांत साहेबाचें समाधान करण्याकरतां त्या माळ्यासच मध्यस्त घालावा असें माझ्या मनांत येऊन मी तसाच गाडी फिरवून परत लाल बागेंत गेलों व एका मनुष्याकडून माळ्यास बोलावून आणला व त्यास आपल्या गाडीत घेऊन घरीं आलों, नंतर तुझा पाहिला निरोप मला खरा वाटला नव्हता, पण मि. उइलसनची भेट झाल्यावर तुझ्या निरोपाच्या खरेपणाविषयीं माझी खात्री झाली, याकरितां आम्हीं लोक असल्या गोष्टी करणारे नाहींत असें तूं साहेबास सांगून त्याचें समाधान कर आणि त्यास त्या इच्छेपासून पराङ्मुख कर ह्मणजे तुझे मजवर मोठे उपकार होतील असें मीं त्यांस सांगितलें, त्यानें तसें करण्याचें कबूल करून तो निघून गेला. तो गेल्यावर लागलीच माझे मुंबईचे सालिसीटर मि. वाक यांस एक [...] होतें व तें नंमू मिरझा यांच्या बरोबर मुद्दाम मुंबईस पाठविलें, त्याचा नवाब ता २९ रोजीं आला तें पत्र पाठविल्यावर मीया फकरुद्दीन, नजमुद्दीन व बदरुद्दीन हे एके दिवशीं माझ्या घरीं आले असतां त्या पैकीं एकानें, तुमचें मन असें उद्विग्न कां दिसतें असें मला विचारलें. मीं उत्तरे कडील दिवाण खान्यांत गेलों व तेही माझ्या मागून आले, नंतर मी व मि॰ उइलसन यांच्या दरम्यान झालेला प्रकार मीं त्यास सांगितला, नंतर घाईघाईनें थोडें अन्न खाल्लें. आणि बद्रुद्दीन यास बरोबर घेऊन मी नबाब साहेब यांजकडे गेलों आणि झालेली सर्व गोष्ट त्यास सांगितली. ती ऐकून मि. उइल्सन यांच्या सन्मानाकरितां जो कांहीं प्रकार करावयाचा होता तो न करण्या विषयीं नबाब साहेबांनीं हुकूम केला. मोठा मंडप घालून बक्षिसें वाटण्याचा समारंभ करून दारू वगैरेही सोडावयाचा होती, पण तो सर्व प्रकार रहित झाला. पोलिटिकल एजंट साहेब क्यांबेस येतात तेव्हां त्यास एक वडा खाना देण्याची नेहमीची रीत आहे, पण तीही या वेळेस दिला नाहीं. नबाबास भेटून आल्यावर क्यांबेचे जज्ज मि॰ खंडाळेवाला यांस बोलावून आणून त्यास झालेला सर्व गोष्ट सांगितली व नंतर बद्रुद्दीन व फकरुद्दीन हे मला भेटले. बदरुद्दीन हा नबाबाची मुनसी आहे व फकरुद्दीन हा रेविन्यु खात्यांतील नोकर आहे. ते कामाच्या संबंधानें मजकडे येत असतात. माळी याच्या तोंडची [...] व साहेबांस ऐ[...]

कृतानिक सा• नम

उमेद आहे.

CA

About ... of beautifully Lady Lansdowne.

किरकोळ अंकास................... ०४

नोटीशीबद्दल.

१० ओळींचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ०।०१

दुसरे खेपेस .........०१

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

Advertisements
Below 10 lines... 1Rs
per line over10... 4a.
Repetition per line 3as

VOL XXIII | AKOLA MONDAY 17 JUNE 1889 | NO. 23

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख १७ माहे जून सन १८८९ इ० | अंक २३

*K. B. Rele and co.s' most efficacious.*
*PREPARATIONS.*

१ धातु पौष्टिक शक्तिवर्धक गोळ्या.

शरीर निरोगी सदृढ करणाऱ्या गोळ्या ह्याच आहेत अति श्रमानें व हरएक दुसऱ्या कारणांनीं झालेली क्षीणता, मुखावरची निस्तेजता, पांडुरता, मनाची उदासीनता, जीर्णज्वरानें, हगवणीनें खोकल्यानें झालेली क्षीणता, स्वमावस्था, मस्तकशूळ, कटीशूळ, निद्राभंग, गंडमाळा, क्षयरोग, रजस्वलास्थीतींध्यें पोटांत दुखणें, धातु जाणें, वाईट स्वप्नें पडणें, हीं ह्यांच्या शेवनानें, नाहींशीं होऊन तोंडावर टवटवी येतें मज्जातंतूंस तीव्रता येऊन स्मरण शक्ति वाढते काम व अभ्यास करण्यास उल्हास येतो. तोंडास रुचि येऊन भूक लागते. पाचनशक्ति वाढते ते प्रत्येकानें ह्याचा अवश्य अनुभव घ्यावा. किं० १२ आणे.

२ परम्यावर खात्रीचें बस्ताद औषध.

हें बिनधोक अत्युत्तम त्वरित गुणकारी आहे. लघवीची जळजळ, तिडिक, धातु जाणें ही तात्काळ बंद होतात परमा कितीही जुना व हट्टी असला तरी निश्चयात्मक बरा होतो. किं० १ रु०

३ परम्यावर पिचकारीचें औषध.

हे ही परम्यावर रामबाण आहे. किं० ०८ आणे.

४ धुपणी ( प्रदर ) वर अमोलिक औषध.

सर्व प्रकारच्या नव्या व जुन्या धुपण्या ह्यानें हटकून जलद बऱ्या होतात. भूक फार लागते. रक्तवृद्धि होऊन शक्ति येते. किंमत १ रुपया.

५ धुपणीवर पिचकारीचें औषध

वरील औषधा बरोबर हे वापरल्यानें रोगी रोगमुक्त झाला नाहीं हें क्वचितच. किंमत ०८ आणे.

६ सर्व प्रकारच्या जखमांवर मलम.

घट्टा, चांदी, सर्व नव्या व जुन्या जखमा घाय इ० मिटविणारे मलम कायतें हेंच किं० ८ आणें.

७ खोकल्यावर अचुक औषध.

ह्यानें कफ सुटा पडतों, पडसे, दमा जातो, क्षयाचा,, डांग्या धशांत गुदगुली होऊन येणारे इ० खोकले अचुक बरें होतात. किं. १२ आणे.

८ तापावर रामबाण औषध.

हिवताप, पाळीचाताप, अंतरताप, जीर्णज्वर, ह्यांवर तर हे रामबाण आहे जंगल किंवा म्यालेरियस नांवाच्या तापावर हें बस्ताद आहे. ह्यानें भूक लागते अन्न पचतें. किंमत १२ आणे.

९ अजीर्ण, अतिसार, ह्यांवर औषध.

अजीर्ण, अतिसार. संग्रणी, अग्निमांद्य, आमरक्ताची व साधी हगवण इ० बंद करण्यांत हें कधींच मागें हटलें नाहीं. किंमत १२ आणे.

ह्या औषधांच्या गुणाविषयीं ज्या अनेक सर्टिफिकीटा मिळाल्या आहेत त्यांपैकीं एकाचा सारांश:—

"के. बी. रेळे यांस लिहावयास अत्यानंद वाटतो कीं, मजकडे पाठविलेलीं सर्व (वरील) * औषधीं मी लक्ष पुर्वक तपासून पाहिली. तीं फार गुणकारीं असून निर्धोक आहेत.

( सही ) डाक्टर वि. वि. गोखले,
"एम. ए. एल. डी."

सूचना--अनुपानाचा कागद औषधा बरोबर असतो घाऊक घेणारास चांगलें कमिशन मिळेल. प्याकिंग व पोस्टेज शिवाय पडेल.

विशेष सूचना—आमच्या वरील औषधां शिवाय सर्व प्रकारची दुसरी इंग्रजी औषधें जसे, पेनकिलर, क्लोरोडाईन, पेपरमिंट, काडलिव्हर आईल, वाऱ्याचीं तेलें मलम, साबु, पोंन्याश, टिंकचर्स, सलाईन्स, इनोज, फुरुट साल्ट, वैद्यांस दवाखान्या करितां लागणारीं औषधें व शस्त्रें, वगैरे व तरुण व वृद्ध ह्यांस लागणारे उत्तम गारेचे चष्मे, मुंबईंत आल्या शिवाय, लागण्या योग्य नंबरांचे पाठविण्यांत येतील त्याच प्रमाणें औषधांचीं व इतर पुस्तकें ही पाठविण्यांत येतील.

पैसे आल्यास किंवा व्ह्याल्युपेएबल पार्सलनें औषधें व इतर सामान पाठवूं नाटपेड पत्रें पाठवूं नयेत. पत्रव्यवहार खालील पत्यावर करावा.

पत्ता. के. बी. रेळे कंपनी,
जुबिली मेडिकल हॉल
कावसजी- पटेल व्यांकरोड मुंबई

हीं औषधें सर्व इंग्रजी औषध विकणाराकडे व मालकाकडे मिळतील.

CALCUTTA ART STUDIO

185 *BOWBAZAR STREET.*

**PICTURES PICTURES PICTURES**

PUBLISHED FROM THE FAMOUS
CALCUTTA ART STUDIO.

About 200 sorts of beautifully colored Hindu mytho pictures are for sale at half price till 30 th Vadra 1296 the next Dusserah Festival.

Particular advantages are held for purchasers of Rs. 5 worth pictures who will receive in addition gratis three pictures of Hindu gods and goddesses and two portraits of the Viceroy and Lady Lansdowne.

Every facility would be afforded to mofussil purchasers in sending to them the pictures free of packing and postage charges. Price lists sent free on application. This is the cheapest chance ever afforded to the Hindu public in securing admirable Hindu sacred pictures at a mere nominal charges.

As it is expected that there will be a general rush for these pictures, purchasers are requested to apply soon in order to avoid disappointment by an early disposal of the stock.

All orders by V. P. Post should advance the cost of the V. P.

Pictures worth less than a rupee cannot be sent in V. P.

CALCUTTA ART STUDIO
185 Bowbazar Street.
CALCUTTA.

N. BISWAS.
Manager

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजू नये.

मु० वाशीम ता.५-६-८९ इ.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

कृतानेक सा० नमस्कार वि० वि० पर्जन्याकडे सर्वांचे डोळे चातका प्रमाणें लागले आहेत. दिवस रात्र अंगांतून घामाच्या धारा एकसारख्या चालतात. मध्यें एक दोन दिवस आसपास पाऊस पडल्याची वार्ता ऐकूं येत होती. परंतु येथें ह्मणण्या सारखा मुळींच पडला नाहीं. दिवसानुदिवस हवा अतिशय उष्ण होत चालली आहे. पारा १०७ पर्यंत चढला आहे. काल रोजीं एका शिपायाला महामारीनें गांठिलें. अर्थात बयाची गांठ पडल्यावर तिच्या कचाट्यांतून ईश्वरी कृपे शिवाय सुटणें कठीण. बिचाऱ्याला यमसदनाची वाट एकदम धरावी लागली. हल्लीं उमरखेडाकडे होनयानें बराच आपला अंमल बसविला आहे. तिकडे मे० सिव्हील सरजन साहेब यांची स्वारी गेली आहे असें म्हणतात. उपाय करण्याचें काम मनुष्यांचें आहे यश दाता प्रभु समर्थ आहे.

गेल्या आठवड्यांत नवीन मे. डेप्युटी कमिशनर साहेब यांची स्वारी येऊन काम पाहूं लागली. साहेब बाहादूर फार शांत व विद्वान असून न्यायाचे कामीं चांगलें लक्ष देतात असें लोकांचे अनुभवाला येत चाललें आहे. एकुण यांचे कारकिर्दीत लोकांना सौख्य होण्याची आशा वाटत आहे. मात्र लोकांनीं यांचे संभावित पणाचा फायदा करून घेऊं नये. असो. आमचे जिल्ह्याला यांचे न्याई कारकीर्दीत अनेक प्रकारें उत्तेजन मिळेल अशी उमेद आहे.

नवीन पुसद येथें नेमिलेले तहसिलदार मि० गणेश गोविंद यांची स्वारी दोन दिवसां पूर्वीं या मार्गानें पुसदास गेली. हे गृहस्थ आठ वर्षां पूर्वीं येथें तहशीलदारीचे कामावर होते. ते आपले कामांत हुशार असून मन मिळाऊ आहेत. तेव्हां आतां पुसद तालुक्यांतील लोकांना हुशार व दयाळू तहशिलदार मिळाले असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पोटासाठीं सर्वच काम करतात. परंतु तें करून लोकांना चांगल्या रीतीनें वागवून जो मागें आपली सुकीर्ति ठेवील तोच धन्य. नाहींतर एखादा असा असतो कीं तो केव्हां जाईल, असें सर्वांना वाटत असंत. अशा एखाद्याशीं गांठ पडल्यास मग काय!

आमचे जिल्ह्याचे डे. ए. इन्स्पेक्टरचे क्लार्क मि. भाऊराव यादव हे आपले कामीं ता, ३ भिनहू रोजीं येऊन दाखल झाले. हे गृहस्थ दोन वर्षें रजेवर होते. तेव्हां त्यांच्या वियोगानें जिल्ह्यांतील बहूतेक मास्तरांना दुःख झालें होतें अर्थात चांगल्याच्या वियोगा बद्दलच कोणाला झालें तरी वाईट वाटावयाचेंच व ज्या अर्थीं सर्व मास्तरांनां वाईट वाटत होतें त्या अर्थीं ते सर्वांना चांगल्या रीतीने वागवीत असत हें उघड आहे. हे आपले हीत कर्ते पुनः कामावर आल्याची वार्ता ऐकून सर्वांना महदानंद होईल यांत संशय नाहीं. क्लार्क यांचे हातांत जरी प्रत्यक्ष रीतीनें मास्तर लोकाचें हीत करण्याचें नाहीं तरी कामाचे बाबतींत त्यांना संभाळून घेणें म्हणजे जर एकाद्या मास्तरा कडून वेळेवर कागद आले नाहींत अगर त्यांत कांहीं चुकी झाली असली तर ममतेंने त्यांनां लिहून त्यांचे कडून ती दुरस्त करून घेऊन त्यांना संभाळून घेणें हे तरी लाहान आहे काय? हे आतां लवकरच पेनशन घेणार आहेत असें लोकांचें ह्मणणें आहे. हें खरेंच झाल्यास या जिल्ह्यांतील मास्तरांना फार वाईट वाटेल. हे सुमारें ७।८ वर्षें क्लार्कीचे कामावर होते. ह्या अवधींत त्यांनीं कोणाला दुःख दिलें नाहीं. यांचा स्वभाव मन मिळाऊ असा असून आपले कामांत हुशार. यांना सर्व लोक व मास्तर खुष असत. हे मित्रत्वाला चांगले. व यांची वर्तणूक चोख अशी असे. एकूण हे कदाचित पेनशनवर गेल्यास शाळा खात्यांतील एक चांगला लायक मनुष्य गेला असेंच ह्मटलें पाहिजे.

हे गृहस्थ रजेवर असतां यांचे बदली काम करीत असलेले गृहस्थ हे मुळचे बारा रुपयांचे मास्तर होते. त्यांना एकदम तीस

झाल्या मुळें त्यांची वागणूक त्यांचे इतर बंधु वर्ग मास्तर यांना आवडत नाहींशीं झाली. यांचे बद्दल आपले पत्रांतून दोन तीन वेळां यांचें वर्तन चरित्र आलें आहेच. ज्याची एकाएकी बढती होते (upstart) त्याची अशी स्थिती होतेच. जो क्रमानें वाढत जातो त्याचे वर्तनांत अशा प्रकारें फरक पडत नसून लोकांनां तो तुच्छ मानीत नाहीं व लोकही त्याला तुच्छ मानीत नाहींत. तारीख १ रोजीं चार्ज दिल्या पासून त्यांना पुनः बारावें रूप आलें हें पाहून फार वाईट वाटतें. लोकांची मर्जी संपादन करून त्यांचे कडून चांगलें ह्मणवुन घेणें हें तरी एक प्रकारें शिफारशी सारखेंच आहे. आतां पुनः त्यांना बारा रुपयांचे मास्तर-होण्याची पाळी आली तेव्हां त्यांना आपले इतर बंधु वर्ग मास्तर यांचे मध्ये मिळण्याचे धैर्य कसें होईल. या साठींच मनुष्यानें पूर्व स्थितीला-विसरतां कामा नये, परंतु ईश्वरी खेळ विचित्र आहे. त्या खेळाचे तडाक्यांत सांपडला कीं त्याला अशा प्रकारें भान रहात नाहीं. असो. दोन वर्षे क्लार्कीचे बदली काम केल्यावर बारा रुपयांवर जाणें हें फार वाईट आहे. तर मे. डायरेक्टर साहेब बहादूर यांचे कामा कडे लक्ष्य देऊन यांना कोठें तरी बढतीची जागा देतील. कारकुनाची निदान पंधराची तरी मिळाल्यास आपल्या योग्यते प्रमाणें त्यांना ती मोठी वाटून त्यांत ते खुष रहातील. क्लार्कची नसेल तर निदान मास्तराची तरी बढतीची १५।२० विसाची देण्याची कृपा झाल्यास बिचाऱ्याचें नुकसान होणार नाहीं.

मि० कृष्णाजी अनंत ऊर्फ अप्पा साहेब तहशिलदार पुसद यांची बदली ता० चांदूर जिल्हा उमरावती येथें झाली आहे. परंतु त्यांची प्रकृति नीट नसल्यामुळें ते हल्लीं सिक रजेवर येथेंच आहेत असें कळतें. ईश्वर करो व त्यांना लवकर गुण येवो. हे पूर्वी येथेंच पन्नास रुपयावर होते. बिचाऱ्याचे आपल्या स्वपराक्रमानें व कामाचे हुशारीनें वाढले आहेत. ईश्वरा, त्यांना लवकर आराम दे व त्यांची प्रकृति चांगली होऊं द्या. कळावें हे विनंती.

आपला

"क्ष"

---

चिखलदरा ता. ७।६।८९ इ.

कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळीस येत्या सुंदर अंकीं स्थळ मिळेल अशी आशा आहे.

या आठवड्यांत थोडीशी पर्जन्यवृष्टी झाली साहेब लोकांच्या स्वाऱ्या येथेंच आहेत. थोडे दिवसां पूर्वी मि. लालकाका अक्टिंग डेप्युटी पोस्टमास्तर जनरल व जनर्स सुपरिंटेंडेंट ऑफ पोष्ट आफिसिस हे पोष्टाची तपासणी करून गेले. येथील सरकारी शाळा स्थापन होऊन सुमारें बारा वर्षे झालीं. जों पर्यंत कर्नल मेकंझी साहेब इलिचपूर जिल्ह्याचे डेप्युटी कमिशनर होते व सदाशिव भास्कार मेळवाट तालुक्याचे तहशिलदार होते तों पर्यंत ह्या शाळेची स्थिती कांहीं बरी होती. आतां ही शाळा अगदीं निराश्रित आहे. येथें आलेले मास्तर शरीरानें अगदीं कृश आहेत. येथें आल्या पासून त्यांना अन्न बिलकूल पचत नाहीं. पोट नेहमीं दुखतें व कळा होतात. डाक्टराचें औषवही केव्हां केव्हां घेतात. येथील डाक्टर मि. महंमद अबदुल रझाक हे जातीचे मुसलमान असून फार दयाळू, लोकप्रिय व सरळ स्वभावाचे आहेत. बरेच दिवसां पूर्वी आमचे शिक्षक मित्रानें शाळा सुधारण्या विषयीं एक आर्टिकल वर्तमानपत्रांत छापिलें होतें. त्यांनीं अशा ठिकाणची शाळा सुधारण्या विषयीं जर कांहीं उपाय सांगितला तर येथील मास्तर त्यांचे फार आभारी होतील. एलिचपूर जिल्ह्याचे डे० ए० इन्स्पेक्टर मि० केशव ब्रह्मगिरी पाळेकर हे फार विचारी दयाळू व निःपक्षपाती असल्यामुळें या जिल्ह्यांत सर्व ठिकाणीं योग्य न्याय मिळतो. पत्रकर्तेराव, हे वेडेवांकडे चार शब्द लिहून पाठविले आहेत तरी कृपा करून छापाल अशी आशा आहे कळावें ही विनंती.

आपला,

एक 'ड.'

---

वऱ्हाडसमाचार.

---

मिती ज्येष्ठ वद्य ५ शके १८११

---

# सुधारणा.

'सुधारणा' शब्दाची गर्भित व्याप्ति फार मोठी आहे. तेव्हां सुधारणा ह्मणजे काय ह्या प्रश्नाची फोड करणें अत्यंत महत्वाचें काम आहे परंतु ती फोड अमुक एका रीतीनें होईल असें सांगतां येत नाहीं. कारण भूमीतींतील वर्तुळाच्या किंवा त्रिज्जेच्या व्याख्ये प्रमाणें संक्षिप्त किंवा त्रोटक शब्दांनीं सुधारणेचा अर्थ स्पष्ट होण्या सारखा नाहीं. सुधारणेचा खुलासा होणें फार अवघड आहे तरी सुधारणा सुधारणा ती काय आहे हें प्रत्येकांस माहीत असते. लोकांची समजूत घालणें कठींण आहे तरी ज्याची त्याला सुधारणेबद्दल मनांत खूण पटली असते. निदान असा ठोकताळा हरएक समजुतदार मनुष्यास पडलासा दिसतो. व्यवहारांत जसा मनुष्याचा चांगुलपणा किंवा वस्तुमात्राचा बरें वाईटपणा हा कांहीं नियमीत गुणांवर अवलंबून नसतो ह्मणजे कांहीं मेजके विचार त्या चांगले वाईटपणा संबंधानें लोकांनीं ठाम ह्मणून केलेले नसतात त्याप्रमाणें घर सोडीचा व अनिमस्तपणाचा प्रकार सुधारणे संबंधानें आहे. सुधारणेचा शिक्कामोर्तब कोणत्या वस्तुस्थितीवर उठवावा ह्याचा निवाडा करणें पुष्कळ प्रसंगीं मोठ्या पंचायतीचें काम आहे. ज्याला आपण सुधारणा ह्मणतो ती सुधारणाच आहे आणि दुर्धारणा नाहीं ही गोष्ट निश्चित करण्या साठीं गुरुकिल्ली मिळण्या सारखी आहे किंवा नाहीं; ही गुरुकिल्ली सांपडल्यास ती सुधारणा होण्या साठीं सुधारकांनीं कोणत्या मार्गानें गेलें पाहिजे ह्मणजे विवक्षित दिशा लागेल आणि मनोरथ सफळ होऊं लागतील इत्यादि गोष्टींचा पुरता विचार करण्याचा आमचा हेतु आहे. हा विषय हातीं घेण्यास कारण अलीकडील सुधारणा आणि त्याचे प्रवर्तक हे होत. आज काल सुधारलेला ह्मणवून घेणें फार सोपें झालें आहे. जो उठला तो सुधारणेवर व्याख्यानें झाडतो. हल्लीं सुधारणेचे वेडे चार इतके फैलावले आहेत कीं थोडी बहुत शिक्षणाची जिल्हई फिरली असली ह्मणजे त्या मनुष्याला बिनचूक सुधारणेचें वळण लागतें. हा प्रकार शेवटील एक दोन पिढ्या पासून अनिष्ट थरावर जात आहे आणि सुधारणा व दुर्धारणा या उभयतांचें संमेलन होऊन सुधारणेचा ह्मणून एकच मार्ग लोकांस वाटत आहे. ही चूक दुरुस्त होणें जरूर आहे व त्या साठीं गेल्या चार पांच वर्षांत मोठमोठे वादविवाद होत आहेत त्यांचें प्रसंगोपात दिग्दर्शन करून आमच्या पैकीं सूज्ञ व विद्वान लोकांचे बाळबोध विचार सर्वांपुढें मांडण्यास आम्ही स्वतांस प्रवृत्त करीत आहों.

जसें बेळ कळण्यास पडबाळ हें उत्तम साधन आहे त्याप्रमाणें सुधारणेचें खत्रीचें पडबाळ ह्मटलें ह्मणजे इंग्रजी शिक्षण होय. अलीकडे सर्वत्र असा सर्व साधारण लोकांचा ग्रह झाला आहे कीं, सुधारणेचा भक्कम आणि मजबुत इमारत उभारण्यास इंग्रजी विद्येचा पाया घातला पाहिजे नाहींतर मराठी-इंजिनियरिंग लढविले ह्मणजे सुधारणेचा बिन इंग्रजी पाया असल्यामुळें सर्व इमारत केव्हां ढासळेल याचा नेम नाहीं. चालूं पिढी मोठी भाग्यशाली दिसते कारण घरोघर सभ्यां थोडी बहुत सुधारणा मुलाबाळांनीं आरंभिलेली दृष्टीस पडते. मुख्यत्वें करून ह्या नवीन सुधारणेचा नोक झोंक प्रापंचिक फार आहे. साहेबी थाट स्वतां उडवितात इतकेंच नव्हे तर वृद्ध वृद्ध वाडवडील माणसांसहा मरणप्राय सुधारणा गृहस्थितींत करून मुलाचे लळे पुरवावे लागतात. जुने लोक मूर्खशिरोमणी, जुन्या चाली वेडगळ, जुना धर्म ह्मणजे एरंडाचें गुऱ्हाळ सारांश जुनें नको व नवें पाहिजे. आणि हें नवें ह्मणजे साहेबी बाणा असा सरसकट शेरा ठोकण्यास पुढें पहाणार नाहींत. पुराणांत हें सत्य युग संपल्या नंतर हिंदुस्थानचा ऱ्हास होत होत पेशवाई बरोबर सर्व प्रकारें हा देश लयास गेला. परंतु सुदैवानें इंग्रजी सुरू झाली आणि हें सुधारणेचें सुदर्शन चक्र आमच्या मागें चीरस्थायी लागलें तेव्हां इंग्रजी शिक्षण ह्मणजे आह्मास संजीवनी विद्या प्राप्त झाल्या सारखें झालें आहे.

अलिकडील इंग्रजी शिकलेले लोक स्वतांस पक्के सुधारक मानतात. हें कांहीं नवल नाहीं. कारण ते इंग्रजी तालमींत आरंभा पासून बालस्वार असतात. अर्थात नवीन पद्धतीच्या सुधारणेंत पुराव्यासंग होत गेल्या मुळें काल क्रमानें हा देश सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचण्याचा काल समीप येत चालला आहे असे त्यांना वाटतें.

(पुढें चालेल)

---

## नोटीस

नारायण रामचंद्र अज्ञान पालन करणार मातुश्री भिमाबाई जवजे शामराव देशपांडे प्रगणें बाळापूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं:--

मला पैसा देण्या बद्दल तुम्हांस कोणत्याही प्रकारची अडचण असूनये. तुम्ही जे पैसे द्याल त्या बद्दल माझी तशीच ती. गं. भा. मनकर्णिकाबाई जवजे शामराव देशपांडे यांची दोघांची पावती देण्यास मी मेहुणी तयार आहे. व अशा बद्दल मागें मी तुंम्हास नोटीशीनें कळविलें ही होते असें असून तुम्हीं मला ही पैसा देत नाहीं व ती. गं. भा. मनकर्णिका बाईस ही पैसा देत नाहीं यांत केवळ तुमचे हातांतून पैसा जाऊं नये इतकाच तुमचा उद्देश दिसतो

(सही) हरिकृष्ण शामराव देशपांडे
अज्ञान पा० करणार मनकर्णीकाबाई
जवजे शामराव देशपांडे तर्फे मुखत्यार सखाराम जयकृष्ण देशपांडे राहणार बाळापूर

---

## The Berar Samachar

MONDAY JUNE, 17, 1889.

It has been the familiar topic to assert that civilization in India commenced with the British rule in India. But we do not know a standard test of this civilization and often come to think that the English administration is not at least the sure and certain resource of the prosperity of the nation. The rapid means of communication which we have secured in the opening of new railways, telegrphs &c have facilitated the trade, but they fill in the end the coffers of the rulers and not those of the Rayots. To clear up the mistake we may find a help in the advice from a sincere friend of India. Mr. Laly the Administrator at the Porbunder Show. In the course of his speech he thus alludes to Indian industries and the ways in which they should be improved:—

"The key-note of the whole business I take to be this:- that any real improvement must be the handi-work of the people themselves: We may cover your country with roads and bridges, we may give you better laws and an efficient police; we may even send the school-master abroad to every house. But unless you draw all these things into your blood- into the blood of your national life they will only be a badly fitting garment which the first wind of change will blow away leaving you as bare as before. So this year we have begun at the very beginning of things. An English divine once said that he would not give much for the religion of a man if his very cat and dog were not the better for it. And so I would say, that the civilization of a people is worth very little unless their

झाल्या मुळें त्यांची वागणूक त्यांचे इतर बंधु वर्ग मास्तर यांना आवडत नाहींशीं झाली. यांचे बद्दल आपले पत्रांतून दोन तीन वेळां यांचें वर्तन चरित्र आलें आहेच. ज्याची एकाएकी बढती होते (upstart) त्याची अशी स्थिती होतेच. जो क्रमानें वाढत जातो त्याचे वर्तनांत अशा प्रकारें फरक पडत नसून लोकांना तो तुच्छ मानीत नाहीं व लोकही त्याला तुच्छ मानीत नाहींत. तारीख १ रोजीं चार्ज दिल्या पासून त्यांना पुनः बाराचे रूप आलें हें पाहून फार वाईट वाटतें. लोकाची मर्जी संपादन करून त्यांचे कडून चांगलें ह्मणवून घेणें हें तरी एक प्रकारें शिफारशी सारखेंच आहे. आतां पुनः त्यांना बारा रुपयांचे मास्तर होण्याची पाळी आली तेव्हां त्यांना आपले इतर बंधु वर्ग मास्तर यांचे मध्ये मिळण्याचे धैर्य कसें होईल. या साठींच मनुष्यानें पूर्व स्थितीला विसरतां कामा नये, परंतु ईश्वरी खेळ विचित्र आहे. त्या खेळाचे तडाक्यांत सांपडला कीं त्याला अशा प्रकारें भान रहात नाहीं. असो. दोन वर्षे शाळेचे बदली काम केल्यावर बारा रुपयांवर जाणें हें फार वाईट आहे. तर मे. डायरेक्टर साहेब बहादूर यांचे कामा कडे लक्ष्य देऊन यांना कोठें तरी बढतीची जागा देतील. कारकुनाची निदान पंधराची तरी मिळाल्यास आपल्या योग्यते प्रमाणें त्यांना ती मोठी वाटून त्यांत ते खुष रहातील. क्लार्कची नसेल तर निदान मास्तराची तरी बढतीची १५।२० विसाची देण्याची कृपा झाल्यास बिचाऱ्याचें नुकसान होणार नाहीं.

मि० कृष्णाजी अनंत ऊर्फ अप्पा साहेब तहशिलदार पुसद यांची बदली ता० चांदूर जिल्हा उमरावती येथें झाली आहे. परंतु त्यांची प्रकृति नीट नसल्यामुळें ते हल्लीं सिक रजेवर येथेंच आहेत असें कळतें. ईश्वर करो व त्यांना लवकर गुण येवो. हे पूर्वी येथेंच पन्नास रुपयावर होते. बिचाऱ्याचे आपल्या स्वपराक्रमानें व कामाचे हुशारीनें वाढले आहेत. ईश्वरा, त्यांना लवकर आराम दे व त्यांची प्रकृति चांगली होऊं द्या. कळावें हें विनंती.

आपला

"क्ष"

---

चिखलदरा ता. ७।६।८९ इ.

कृतानेक साष्टांग नमस्कार वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळीस येत्या सुंदर अंकीं स्थळ मिळेल अशी आशा आहे.

या आठवड्यांत थोडीशी पर्जन्यवृष्टी झाली साहेब लोकांच्या स्वाऱ्या येथेंच आहेत. थोडे दिवसां पूर्वीं मि. लालकाका अक्टिंग डेप्युटी पोस्टमास्तर जनरल व जन्र्स सुपरिंटेंडेंट ऑफ पोष्ट आफिसिस हे पोष्टाची तपासणी करून गेले. येथील सरकारी शाळा स्थापन होऊन सुमारें बारा वर्षे झालीं. जोंपर्यंत कर्नल मेकंझी साहेब एलिचपूर जिल्ह्याचे डेप्युटी कमिशनर होते व सदाशिव भास्कार मेळघाट तालुक्याचे तहशिलदार होते तों पर्यंत ह्या शाळेची स्थिती कांहीं बरी होती. आतां ही शाळा अगदीं निराश्रित आहे. येथें आलेले मास्तर शरीरानें अगदीं कृश आहेत. येथें आल्या पासून त्यांना अन्न बिलकूल पचत नाहीं. पोट नेहमीं दुखतें व कळा होतात. डाक्टराचें औषधही केव्हां केव्हां घेतात. येथील डाक्टर मि. महंमद अबदुल रझाक हे जातीचे मुसलमान असून फार दयाळू, लोकप्रिय व सरळ स्वभावाचे आहेत. बरेंच दिवसां पूर्वी आमचे शिक्षक मित्रानें शाळा सुधारण्या विषयीं एक आर्टिकल वर्तमानपत्रांत छापिलें होतें. त्यांनीं अशा ठिकाणची शाळा सुधारण्या विषयीं जर कांहीं उपाय सांगितला तर येथील मास्तर त्यांचे फार आभारी होतील. एलिचपूर जिल्ह्याचे डे० ए० इन्स्पेक्टर मि० केशव ब्रह्मगिरी पाळेकर हे फार विचारी दयाळू व निःपक्षपाती असल्यामुळें ह्या जिल्ह्यांत सर्व ठिकाणीं योग्य न्याय मिळतो. पत्रकर्तेराव, हे वेडेवांकडे चार शब्द लिहून पाठविलें आहेत तरी कृपा करून छापाल अशी आशा आहे कळावें ही विनंती.

आपला,

एक 'ड.'

---

वऱ्हाडसमाचार.

---

मिती ज्येष्ठ वद्य ५ शके १८११

---

## सुधारणा.

'सुधारणा' शब्दाची गर्भित व्याप्ति फार मोठी आहे. तेव्हां सुधारणा ह्मणजे काय ह्या प्रश्नाची फोड करणें अत्यंत महत्त्वाचें काम आहे परंतु ती फोड अमुक एका रीतीनें होईल असें सांगतां येत नाहीं. कारण भूमीतींतील वर्तुळाच्या किंवा त्रिज्जेच्या व्याख्ये प्रमाणें संक्षिप्त किंवा त्रोटक शब्दांनीं सुधारणेचा अर्थ स्पष्ट होण्या सारखा नाहीं. सुधारणेचा खुलासा होणें फार अवघड आहे तरी सुधारणा सुधारणा ती काय आहे हें प्रत्येकांस माहित असते. लोकांची समजूत घालणें कठीण आहे तरी ज्याची त्याला सुधारणेबद्दल मनांत खुण पटली असते. निदान असा ठोकताळा हरएक समजुतदार मनुष्यास पडलासा दिसतो. व्यवहारांत जसा मनुष्याचा चांगुलपणा किंवा वस्तुमात्राचा बरें वाईटपणा हा कांहीं नियमीत गुणांवर अवलंबून नसतो ह्मणजे कांहीं मेजके विचार त्या चांगले वाईटपणा संबंधानें लोकांनीं ठाम ह्मणून केलेले नसतात त्याप्रमाणें धरसोडीचा व अनेमस्तपणाचा प्रकार सुधारणे संबंधानें आहे. सुधारणेचा शिक्कामोर्तब कोणत्या वस्तुस्थितीवर उठवावा ह्याचा निवाडा करणें पुष्कळ प्रसंगीं मोठ्या पंचायतीचें काम आहे. ज्याला आपण सुधारणा ह्मणता ती सुधारणाच आहे आणि दुर्धारणा नाहीं ही गोष्ट निश्चित करण्या साठीं गुरुकिल्ली मिळण्या सारखी आहे किंवा नाहीं; ही गुरुकिल्ली सांपडल्यास ती सुधारणा होण्या साठीं सुधारकांनीं कोणत्या मार्गानें गेलें पाहिजे ह्मणजे विवक्षित दिशा लागेल आणि मनोरथ सफळ होऊं लागतील इत्यादि गोष्टींचा पुरता विचार करण्याचा आमचा हेतु आहे. हा विषय हातीं घेण्यास कारण अलीकडील सुधारणा आणि त्याचे प्रवर्तक हे होत. आज काल सुधारलेला ह्मणवून घेणें फार सोपें झालें आहे. जो उठला तो सुधारणेवर व्याख्यानें झाडतो. हल्लीं सुधारणेचे वेड चार इतके फैलावले आहेत कीं थोडी बहुत शिक्षणाची जिल्हई फिरली असली ह्मणजे त्या मनुष्याला बिनचूक सुधारणेचें वळण लागतें. हा प्रकार शेवटील एक दोन पिढ्या पासून अनिष्ट थरावर जात आहे आणि सुधरणा व दुर्धारणा या उभयतांचें समेलन होऊन सुधारणेचा ह्मणून एकच मार्ग लोकांस वाटत आहे. ही चूक दुरुस्त होणें जरूर आहे व त्या साठीं गेल्या चार पांच वर्षांत मोठमोठे वादविवाद होत आहेत त्यांचें प्रसंगोपात दिग्दर्शन करून आमच्या पैकीं सुज्ञ व विद्वान लोकांचे बाळबोध विचार सर्वांपुढें मांडण्यास आम्ही स्वतांस प्रवृत्त करीत आहों.

जसें वेळ कळण्यास घड्याळ हें उत्तम साधन आहे त्याप्रमाणें सुधारणेचें थर्मामीटर घड्याळ म्हटलें ह्मणजे इंग्रजी शिक्षण होय. अलीकडे सर्वत्र असा सर्व साधारण लोकांचा ग्रह झाला आहे कीं, सुधारणेचा भक्कम आणि मजबुत इमारत उभारण्यास इंग्रजी विद्येचा पाया घातला पाहिजे नाहींतर मराठी इंजिनियरींग लढविलें ह्मणजे सुधारणेचा बिन इंग्रजी पाया असल्यामुळें सर्व इमारत केव्हां ढासळेल याचा नेम नाहीं. चालूं पिढी मोठी भाग्यशाली दिसते कारण घरोघर सध्यां थोडी बहुत सुधारणा मुलाबाळांनीं आरंभिलेली दृष्टीस पडते. मुख्यत्वें करून ह्या नवीन सुधारणेचा नोक झोंक प्रापंचिक फार आहे. साहेबी थाट स्वतां उडवितात इतकेंच नव्हे तर वृद्ध वृद्ध वाडवडील माणसांसहा मरणप्राय सुधारणा गृहस्थितींत करून मुलाचे लळे पुरवावे लागतात. जुने लोक मूर्खशिरोमणी, जुन्या चाली वेडगळ, जुना धर्म ह्मणजे एरंडाचें गुऱ्हाळ; सारांश जुनें नको व नवें पाहिजे. आणि हें नवें ह्मणजे साहेबी बाणा असा सरसकट शेरा ठोकण्यास पुढें पहाणार नाहींत. पुराणांत हें सत्य युग संपल्या नंतर हिंदुस्थानचा ऱ्हास होत होत पेशवाई बरोबर सर्व प्रकारें हा देश लयास गेला. परंतु सुदैवानें इंग्रजी सुरू झाली आणि हें सुधारणेचें सुदर्शन चक्र आमच्या मागें चीरस्थायी लागलें तेव्हां इंग्रजी शिक्षण ह्मणजे आह्मास संजीवनी विद्या प्राप्त झाल्या सारखें झालें आहे.

अलिकडील इंग्रजी शिकलेले लोक स्वतांस पक्के सुधारक मानतात. हें कांहीं नवल नाहीं. कारण ते इंग्रजी तालमींत आरंभा पासून वावरत असतात. अर्थात नवीन पद्धतीच्या सुधारणेंत पुराव्यासंग होत गेल्या मुळें काल क्रमानें हा देश सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचण्याचा काल समीप येत चालला आहे असे त्यांना वाटतें.

(पुढें चालेल)

---

## नोटीस

नारायण रामचंद्र अज्ञान पालन करणार मातुश्री भिमाबाई जवजे शामराव देशपांडे प्रगणें बाळापूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं:--

मला पैसा देण्या बद्दल तुम्हांस कोणत्याही प्रकारची अडचण असूनये. तुम्ही जे पैसे द्याल त्या बद्दल माझी तशीच ती. गं. भा. मनकर्णिकाबाई जवजे शामराव देशपांडे यांची दोघांची पावती देण्यास मी मेहपी तयार आहे. व अशा बद्दल मागें मी तुम्हास नोटीशीनें कळविलें ही होती असें असून तुम्ही मला ही पैसा देत नाहीं व ती. गं. भा. मनकर्णिका बाईस ही पैसा देत नाहीं यांत केवळ तुमचे हातांतून पैसा जाऊं नये इतकाच तुमचा उद्देश दिसतो

(सही) हरिकृष्ण शामराव देशपांडे

अज्ञान पा० करणार मनकर्णिकाबाई

जवजे शामराव देशपांडे तर्फे मुखत्यार सखाराम जयकृष्ण देशपांडे राहणार बाळापूर

---

## The Berar Samachar

MONDAY JUNE, 17, 1889.

It has been the familiar topic to assert that civilization in India commenced with the British rule in India. But we do not know a standard test of this civilization and often come to think that the English administration is not at least the sure and certain resource of the prosperity of the nation. The rapid means of communication which we have secured in the opening of new railways, telegrphs &c have facilitated the trade, but they fill in the end the coffers of the rulers and not those of the Rayots.

To clear up the mistake we may find a help in the advice from a sincere friend of India. Mr. Laly the Administrator at the Porbunder Show. In the course of his speech he thus alludes to Indian industries and the ways in which they should be improved:—

"The key-note of the whole business I take to be this:- that any real improvement must be the handi-work of the people themselves: We may cover your country with roads and bridges, we may give you better laws and an efficient police; we may even send the school-master abroad to every house. But unless you draw all these things into your blood- into the blood of your national life they will only be a badly fitting garment which the first wind of change will blow away leaving you as bare as before. So this year we have begun at the very beginning of things. An English divine once said that he would not give much for the religion of a man if his very cat and dog were not the better for it. And so I would say, that the civilization of a people is worth very little unless their

tables and chairs are the better or it, sounder and truer in workmanship more graceful in form more fitted for use. It is often said that India has long been Conservative and stationary. Believe me, nothing in this world is stationary, not even the ever- lasting hills. Every people is on the march and if it is not going forwards, it is sinking deeper in the mud. In many parts of India men are putting their shoulders to the wheels to get themselves out of the mud, and 'progress' has become a catch-word. No doubt much of it is real, but what we have to ask ourselves is this- is the free and healthy evolution of men's faculties, is it a mere nuddling on of Western-clothes? Take the Railway for example. A man may now-a-days sit in the train at Porbunder and be carried to Dhoraji in two or three hours, but be of precious little use when he goes there. Neither the world nor himself would have been a bit worse off if he had stayed where he was. We may go further still than that. If he uses the railway as an easy means of smuggling into the market and thrusting on the buyer sanded or salted cotton, then the railway, so far, is a curse to him and to the community of which he is a member. If he uses it to turn his back on his own country, if he gains nothing by it but a distaste for home-pleasures and home-duties, then again I say it is a curse to him and to his country. We want to see you use it as a means if you can afford it, of seeing men and cities, of going abroad and learning that (to adopt the words of Geraint), 'the rustic cackle of your gain is not the murmur of the world,' use it too, if you can as a means of honestly making money, and then bring back the knowledge and wealth you have gained to your own people. If you want to build a house for yourself and your children, don't build it of stucco and trumpery Cast-iron so-called ornaments but of the beautiful stone of your own hills, fashioned into beautiful form by your own craftsmen. However small and modest, let it be a genuine expression of your own wants and feelings and when you have made it ready don't fill it with musical boxes and looking glasses and gaudy prints the cast off frippery of another land---but with the loving and graceful work of your own countrymen. 'To your own selves be true' This then is the underdrift of your show.

## CORRESPONDENCE.

Amraoti 7th June 1889.

My dear Editor,

The hot season is now coming to its close. During the whole month the place was a burning furnace. The heat was quite abnormal, thermometers reading 117 the maximum temperature that was ever recorded. In the month we had two showers; otherwise we would have still higher temperature. Owing to the excessive heat of the days the nights for the greater part are oppressive and from my own experience I write that many of us have passed several sleepless nights. After twelve in the night we enjoy somewhat cool breezes and then we are relieved a little. This state of things continues up to eight in the morning. After eight burning commences a-new again. On account of the oppressive heat the town is full of lethargy. All persons are deprived of their energy; but here I must state that two things have kept up the depressing spirits a little, marriages and a water supply.

These and these only two things have greatly alleviated the sufferings of the inhabitants keeping them lively all along. Poor people who have no power to keep up a Wala-tatte and engage a cooly to work at the Pankha during the day have at least the satisfaction of having a good supply of water with which they try to keep their yards and gachies properly cool and thus mitigate, though slightly the oppressive character of the hot breezes during the night. Good Editor I have no words to express the innumerable miseries of the poor inhabitants of the town during the present season. I call the inhabitants poor because the nobility of the place left it a month ago to enjoy the benefits of a cooler climate leaving the less gifted to the mercy of the trying season. Now clouds are appearing in the sky showing that the present season is coming to a close soon The chatakas of Amraoti have raised their heads to the sky expecting a down-pour accompanied by a thunder-storm at every moment.

Now and then a grandee may be seen in a carriage coming in to the town to his residence which he left a month ago from the railway station all sweated, exhausted and full of hush hush partly on account of the excessive heat to which he is now and partly on account of the troubles in the long journey.

To add to our miseries that fell disease, Cholera, has been here from the very commencement of the season. In the beginning it was of a very severe type but later on it assumed a milder form and still it is so; it finds every day two or three victims. The general prevailing opinion is that the cases are not cholera cases but they are cases of sun-stroke. The opinion may be correct since the cases reported are from the working classes who are exposed to the burning heat of the sun for the whole day. By our good luck we have found a skillful and clever Doctor in Mr. Punambalam. He is very energetic, hard working and intelligent and ever ready to assist the needy. A few days back some mischievous persons tried to entrap our good and beloved Doctor but I am very happy to inform your readers that they failed in their base attempts. The Police and the Municipality have determined to try him very hard. Your readrs will no doubt be greatly astonished if they hear from me that one whole Police Constable is appointed on the cholera duty i. e. to give information of the fresh attacks. And what is his information? Often times I have heard him giving information of the following nature "Salam Sahib, Paitko do bimar ho gaye" (two persons were attacked in the morning). The Doctor says "Keysahai" (how are they). The constable answers "Sabi margaye" (they died). What can be the use of such information to the Doctor? How can he work when he is provided with such information.

Nor do I blame the poor police constable for giving information so late. For he is but an ordinary being and not a supernatural one as his superiors seem to think. What can he do when he has to walk over the whole town while performing his legitimate duties? Again, at a little distance from the charitable dispensary stands a small building called "the cholera house." By the term "cholera house" is generally meant a house for the patients suffering from cholera but here the term means some thing different; it means a house which is a nursery bed of cholera. The following facts will bear me out in my interpretation. The above mentioned house is ten or fifteen feet high with broken doors and shattered windows allowing sun, winds, and rain free ingress and egress. During the day it is exposed to the hot sun and during the night to winds and dust raised by them. To increase the miseries of the suffering patient he is left alone there. Poor creature if he but lives he is fortunate but how miserable it is to die forlorn without any one by to communicate the last dying thought. Mr. Editor urgent reforms are required in this respect and therefore with me raise your hoarse and powerful voice in the case of the suffering poor.

Dear Editor, if you have a sharp chaparasee with a clear memory, send him at once for the coming Berar Pleader's examination. To be serious now; in the list of candidates for the coming pleader's examination there are names of persons who not-with-standing that they do not know a single word of English are ready to be examined in that language merely on the strength of their memory. The Bar is a noble profession and wants men of some culture. Pleader-ship is not an hereditament and therefore a son cannot claim pleader-ship simply because his reverend old father was a pleader. Is it not miserable for a man of some culture to compete with and sometimes get himself defeated by, though very rarely, such speaking trumpets who depend only on the strength of their memory. Will not the authorities make the bar available to those only who have some culture by introducing some restrictions and thus scare away those speaking parrots. Now-a-days Berar matriculates a good round number every year; why then not introduce the same restriction as in Bombay. If we have followed Bombay in every respect why should we not follow her in this respect also?

Yours
'X, Y, Z,'

## वऱ्हाड.

हवामानः—पाऊस अद्याप झणण्या सारखा पडला नाहीं. हवेंत उष्णता अतिशय होती ती किंचित् कमी झाली.

येथील मुनिसिपाल कमिटीचे चेअरमनचे जागीं, जिल्ह्याचे डे० क० व्हाईसप्रेसिडेंटचे जागीं व रा० रा० कृष्णाजी हरी तहसिल्दार रा० रा० दत्तात्रय विष्णु भागवत बी. ए. एल् एल्. बी. वकील, व सेक्रेटरीचे जागीं रा. रा. हरी रामचंद्र रोणखेडकर बी. ए. हायस्कूलचे फ. अ. मास्तर व रा० रा० कृष्णाजी मल्हार पैठणकर हायस्कूलचे थर्ड अ० मास्तर यांची नेमणूक व्हावी असें म्युनिसिपाल कमेटीनें बहुमतानें ठरविलें आहे.

रा० रा० हरी रामचंद्र रोहणखेडकर बी. ए. हे येथील हायस्कूलचे हेडमास्तरचें काम पाहूं लागले.

मि० महमद मुबारक अली तहशिल्दार आकोट हे १ महिना १० दिवसाच्या रजेवर गेले व त्यांचे काम पहाण्या करितां रा० रा० बाळकृष्ण बळवंत सुळे यांस तेथें अ० तहशिल्दार नेमले आहे.

रा. रा. निळकंट नारायण भट प्रिंसिपाल ट्रेनिंग कालेज हे रजेवरून परत आले व रा. रा. जनार्दन नारायण नातू हे आपल्या येथील अ. व्ह. स्कुलचे हेडमास्तरचे जागीं परत आले.

मे. कर्नल ग्रांट साहेब डे० क० गेल्या आठवड्यांत नरनाळ्याहून परत आले.

नवीन झालेल्या हायकोर्ट जज्जाचे जागीं मे. कर्नल मेंकझी सा० यांची नेमणूक होणार असें म्हणतात

मि. स्टान्ले मरे, प. अ. रेसिडेंट यांस वऱ्हाडांत अ० क० ची जागा मिळणार व त्या मुळें या प्रांतांतील. ए. अ. क., कमिशनर व हे. क. यांच्या आफिसचे सुपरिंटेंडंट व हेडक्लार्क यांच्यांत नरीच बर्गाबर्गी होणार असें कळतें.

### मागाहून आलेली नोटीस

नोटीस मारुती बल्लद दिवटाणी पाटील राहणार मौजे आंबीकापूर ता. व जिल्हा आकोला यांस कावसजी डोसाभाई कलालीमक्तेदार ता. अकोला याजकडून नोटीस देण्यांत येत आहे कीं तुम्ही मौजे वापूर ता० आकोले येथील सन १८८९-९० सालाबद्दल पोट मक्ता घेतला त्याबद्दल रीती प्रमाणें आह्मांस कबुलायत लिहून दिली नाहीं. व लायसन्स घेऊन गेला नाहीं व माहेवारीचा पैसा अदा केला नाहीं. बिन लायसेन्सानें मक्त्याची वहिवाट बिनधास्तपणें करीत जाला ह्यामुळें आम्हांकडून तुह्मांस केली सुचना झाल्या त्याप्रमाणें तुमचे कडून कांहींच अमलबारी झाली नाहीं करितां ह्या नोटिसीनें कळवितो कीं नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत मक्त्याबद्दल कबुलायत दाखल करून लायसन्स घेऊन जावें. व महिवारीचा पैसा दाखल करून रसीद घेऊन जावी. याप्रमाणें करण्यास चुकाल तर तुमचा मक्ता बंद करून दुसऱ्यास दिला जाईल. व तुमचे हयगयीमुळें आमचा झालेला खर्च नोटिसीसह व नुकसान हें सर्व तुह्मास द्यावें लागेल शिवाय बिनलायसन्सानें वहिवाट करीत आहा याकरितां तुम्ही अबकारी रुला अन्वये गुन्ह्यास पात्र व्हाल कळावें तारीख १६-६-८९ इ०

(सही)
कावसजी डोसाभाई कलालीमक्तेदार
ता० आकोला

## वर्तमानसार.

मि. ग्लाडस्टन हे हल्लीं विलायतेंत ठिकठिकाणीं राजकीय गोष्ठी बद्दल व्याख्यानें देत फिरत आहेत.

काबूलचा अमीर आपल्या बापका मुलां सह तुर्कस्थानांत उन्हाळ्या प्रीत्यर्थ रहावयास गेला आहे, या वरून तिकडे कांहीं गडबड नाहीं.

लंडन शहरांत सर्व रस्त्यांवर इंडिया रबर पसरावयाचा असा बेत घाटत आहे.

गंजम प्रांतांत बराच दुष्काळ पडला आहे. फक्त एकच आठवड्यांत १४०० मनुष्यें पटकीनें मरण पावलीं. गव्हरनर तेथें गेले होते.

समुद्र किनाऱ्याचें संरक्षण करण्या करितां आरमार वाढविण्या संबंधी जें एक बिल नुकतेंच कामन्स सभेंत पास झालें तें लार्ड सभेंतही पसार झालें.

समरकंदच्या गव्हरनरच्या हुकमावरून इषाकखान समरकंद येथून ताराखंद येथें गेला.

जर्मनच्या बादशहाचें व प्रिन्स ऑफ वेल्स याचें सूत नाहीं असें ह्मणतात.

काळ्या समुद्रांत ठेवण्या करतां कित्येक टारपेडो नांवाच्या आगबोटीं रशियांत तयार होत आहेत.

नाक नीट करण्याचें यंत्रः—विलायतेस या यंत्रानें वाकडें दुरमडलेलें वगैरे नाक नीट होतें! नकटें नाक नीट होत नाहीं हो.

पोर्तुगीज वसाहतीचे गव्हरनर जनरल गेल्या शुक्रवारीं मुंबईस आले.

हांगकांग बेटांत ता. ४ मिनहू रोजीं अतिशय जंगीवादळ झालें यामुळें १०००० लोक ठार मेले मग संपत्तीचा नाश- किती झाला याचा पत्ताच नाहीं!

राष्ट्रीय सभे प्रीत्यर्थ भागलपूर येथें ता. ४ मिनहू रोजीं सभा भरली होती.

अजयगडच्या महाराजांनीं एक सभा भरवून बालविवाह बंद करण्याचें ठरविलें आहे. ठा. अ.

इलाख्याचे जे सेनाधिपति निरनिराळे आहेत त्या जागा कमी करण्याचे घाटत आहे.

अमेरिकेंत नुकतांच महापूर येऊन त्यांत १०००० माणसें बुडून मेल्याचे समजतें.

होळकर सरकारनें आपल्या राज्यांत चौकीदारी एक कर होता तो माफ केल्याचें समजतें. याच्या योगानें सुमारें १,९०,००० रुपये नुकसान झालें.

काबूलच्या अमिरानें आपल्यास जास्त पैसे पाहिजेत ह्मणून मोठें नेट लाविलें आहे. "न द्याल तर मी तिकडे जाईन" हा द्वादशाक्षरी मंत्र यास फलद्रुप होईल यांत शंका नाहीं.

कर्नल आलकाट साहेबांची स्वारी हल्लीं स्पेन देशांत असल्याचें कळतें.

मद्रास इलाख्यांत जनावरांस शिंगें उगवूं देत नाहींत. वासरूं चार सहा महिन्याचें झाले ह्मणजे ते लोक त्याच्या शिंगटांच्या जागीं डागण्या लावतात.

आकबारपूर येथें एका रजपुताचे घरीं लग्न समारंभ चालला असतां एकाएकी घराला आग लागून एकंदर १९० मनुष्यें जळून मेलीं! शिव, शिव! कोण भयंकर प्रसंग हा! पु० वै०

एरवडा तुरुंगाला जोडून एक मुलांचे साठीं गैरवर्तन सुधारणुकीचा तुरुंग काढणार आहेत.

नीति शिक्षण—हिंदुस्थानांत येत्या आगस्ट महिन्या नंतर नीति संबंधानें एक पुस्तक सरकारांतून प्रसिद्ध केलें जाईल असें समण्यांत आलें आहे. योग्य विचार आहे. न्या. सिं.

कलकत्यास एक बाई नदीवरून स्नान करून येत असतां कावळ्यानें तिजवर झडप घालून अचूक तिचा डोळा फोडला!

धुळ्यास ह्या महिन्यापासून ट्रेनिंग कालेज होणार. ते० मि०

दुष्काळः—चीन देशांतील कित्येक जिल्ह्यांत भयंकर दुष्काळ पडला असून, माणसें उदर निर्वार्थ एकमेकांस भक्षण करूं लागलीं आहेत. असें एका चिनी पत्रावरून समजतें. दि० बं०

हिंदुस्थान सरकारचा ठराव.—नेटिव कमिशन्ड आफीसर्स चाकरीवर असोत किंवा पेनशन घेवोत, त्यांच्या लष्करी पदवी मुळें त्यांस हिंदुस्थान सरकारच्या दरबारांत बसण्याचा ही हक्क आहे असा हिंदुस्थान सरकारानें नुकतांच एक ठराव केला आहे.

धान्याची बंदी पर्शियन गल्फ मधून बाह्य देशीं धान्य पाठविण्याची इराण सरकारानें बंदी केली आहे.

पुढील खनिसुमारी १८९१ मध्यें होणार. सु० सु०

यंदा रशियांत गव्हाचें चांगलें उत्पन्न होणार नाहीं असें म्हणतात.

सरदार अयुबखान यांची स्वारी शिकारी करितां काश्मीरांत गेली आहे.

सुएझ कनाल कंपनीला गेल्यासालीं सुमारे ४ कोटी फ्रांकचा नफा झाला.

लंडनमध्यें एकदर ६१ नाटकगृहें व ९०० गायन सभा आहेत व यांमध्यें रोज १॥ लक्ष लोकांस बसावयास जागा असते.

पार्नेल कमिशनचे काम ता. १८ पर्यंत तहकूब ठेविलें आहे.

ड्यूक आफ कनाट व निझाम साहेब हें सिमल्यास जाणार आहेत. असें समजतें

क्राफर्ड प्रकरणांतील नऊ मामलेदारांचे फौजदारी काम चालविण्याचे अधिकार सरकारनें काढून घेतले.

चंद्रावरील डोंगर व ज्वालामुखी पर्वत पृथ्वीवरील पर्वतांपेक्षां व ज्वालामुखी पर्वता पेक्षां फार मोठे आहेत असें म्हणतात.

कोळयाला आठ डोळे असतात असें म्हणतात.

घसा बसला ह्मणजे कढत लेमोनेड रात्रीं निजतांना प्यावें म्हणजे घसा बरा होतो असें पुष्कळांचें म्हणणें आहे. सु० प०

क्राफर्ड साहेब विलायतेस जाऊन पोंचले. त्यांनीं मुंबई गव्हर्मेंटांतील मेंबरलोक अन्यायाचा काकडा घेऊन तुळजापूरच्या देवी पुढील भुतें नाचून भक्ताच्या मनावर आपल्या अधिकाराचा जसा ठसा उठवितात त्याचा देखावा हुबेहूब करून दाखविला. महाराणी साहेबांनीं क्राफर्डाची भेट घेऊन त्यांना दिलभरवसा दिला. त्या वरून स्टेट सेक्रेटरी व मुंबई गव्हरनर यांच्या मध्यें वितुष्ट येऊन लॉर्ड "रे" आपल्या शद्वास मान मिळत नाहीं. व. हिंदुस्थानांतील कौन्सल आपल्या यशाचें कामीं मदत करणार नाहीं समजून चाकरी सोडण्याच्या विचारांत आहेत. थोड्या दिवसां पूर्वीं काफर्डानीं पार्लमेंटांतील प्रमुख लोकांच्या भेटी घेऊन सांगितलें कीं, "या वेळीं मला आपण आपला ताबेदार न समजतां ज्या गोष्टी मी कळविणार आहे त्या केवळ पार्लमेंटाच्या भरवंसेशीर गृहस्थानें पहिल्या प्रमाणें मानून भरवसा ठेवणार असाल तर सर्व अंतरंग व्यवहार प्रघट करून हिंदुस्थानांतील राजकीय घडामोडींत कोठें कसा दगा आहे त्याचा देखावा प्रत्यक्ष दाखविण्यास मी तयार आहे. येथें ही पण गोष्ट कळवितों कीं, गव्हरनर अगर गव्हरनर जनरल यांच्या मनांत कोणत्या ही प्रकारची पापवासना नसते; पण जवळ असणारे सेक्रेटरी लोक केव्हां कसा दगा करतील याचा नेम नाहीं त्यांनीं आणखी असेंही कळविलें आहे कीं हिंदुस्थानांतील लोक राजद्रोही बनण्यास कारण आलीकडील पोलिटिकल खात्यांमधील सेक्रेटरी जितके कारणीभूत आहेत तितके दुसरे कोणी नाहीं. त्यांना छातीला हात लाऊन कळविलें कीं, माझ्या कामांत मुंबई गवरनरचे सेक्रेटरी मि० लिवानर यांनीं जे भयंकर प्रकार केले आहेत ते छपणकारस्थान बाहेर येईल तर सरकारच्या अधिकाऱ्यांत कवडीची किंमत नाहीं असें समजून लोक या राज्याचा तिरस्कार करतील. यासाठीं घाईनें मुंबई गव्हरमेंटास तार करून मजवर बेतल्याचें दुःख न दर्शविता मनसारखा परिणाम दुसरा कोणावर न योजण्या विषयीची ताकीद द्यावी. व माझ्या कामांत अन्यायानें गरीब मामलेदार धुळीचे दिवे खाण्यास लागणार, त्याची कींव आणून दाद घ्यावी. म० मि०

रशियाचे बादशहा हे 'पोलंडचा राजा' असा एक किताब घेणार.

पारिस प्रदर्शनींची तीन कोटी तिकिटें काढिलीं आहेत.

लंडनच्या जुबिली इन्स्टिटयूटची वर्गणी ४० लाख रुपये झाले.

अमेरिकेंत एक रब्बराचे गुणांचा दगड सांपडला आहे.

कलकत्याचे प्रवेश परिक्षेंत वीस मुली पास झाल्या.

लाहोर येथें युरेशियन लोक 'आंग्लो-इंडियन आडव्होकेट ह्मणून एक पत्र काढीत आहेत.

लेडी ल्यान्सडौन या उर्दू शिकत आहेत.

रुपयाची किंमत १ शि० ९ पे० ( सुमारें १४ आणे ) एकदां कायमची ठरवून टाकावी असा विचार सुरूं आहे.

मुंबईंत विजेचे दिवे लावण्यास १९ लाख रुपये खर्च येईल.

रा० ब० किर्तीनें व श्री० होळकर सरकार यांचे पुनः सूत जमलें.

निजाम सरकार पैशाच्या पोष्टकार्ड काढणार आहेत. निजामी पैसा आमच्या सुमारें दोन पै बरोबर आहे.

इंग्लंडांत अति श्रीमंत ड्यूक आफ वेस्टमिन्स्टर हे आहेत. यांची दौलत ९० कोटींची आहे.

कागद तयार होत असतांना त्यांत क्लाराईड आफ झिंक हा पदार्थ घातला असतां तो इतका चिवट बनतो, कीं त्याचा देवदार लांकडाप्रमाणें उपयोग होईल. के०

नोटीस.

माधो वल्लद आकोसा पाटील वस्ती टाकळी तालुके जळगांव यांस लट्टु वल्लद रावजी बोरडे पाटील वस्ती राजापूर ( निराट वैराट ) तालुके आकोलें यांजकडून नोटीसीचें उत्तर. हल्लीं बायकी वागविण्याची शक्ति आमचे अंगीं आहे किंवा नाहीं याबद्दल डाक्टरचें सर्टिफिकीट आम्ही आणिलें आहे. पण खावटी रु० २१० बद्दल जबाबदार नाहीं व आह्मी देणार नाहीं. कारण आह्मी बायको पोसण्यास नाजर नव्हतों. दोन वर्षें झालीं तुह्मी घेऊन गेले. नंतर आम्ही चार पांच वेळां नेण्यास आलों पण तुह्मी पाठविले नाहीं. तर आतां नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत बायकोस आमचे घरीं पावते करावें. येणें होत नसल्यास तसें कळवावें ह्मणजे आह्मी मूळ येऊं मूळ परतवूं नये. या प्रमाणें वर्तन न झाल्यास कोर्टांत फिर्याद करूं. कळावें तारीख ८ माहे जून सन १८८९ इ०

( सही. )

लट्टु वल्लद रावजी बोरडे पाटील निशाणी हातची खुद्द असे.


## गरमीचे रोगावर औषध,

शरिरांत गरमी होऊन धातु बिघडते व ती स्त्री संग समयीं पांच दोन मिनिटांतच पतन होते. झोंपेंत व मुत्र समई पतन होते. परम्याचा रोग उत्पन्न होतो शरिराचा दाह आदीकरून अनेक पीडा होतात. हा रोग ज्यांस आहे त्याणी अवलेह घ्यावा. गोड व अनुभविक आहे. एक डब्यांत तोळे २८ किंमत रुपये २ डाक खर्च १० आणे.

## अन्न पचन होण्याच औषध

अन्न पचन होत नाहीं त्यांस मळमुत्र साफ होत नाहीं. पोट दुखतें. पोटांत वायु धरतो, छातींत कफ पित्त होऊन मळमळतें, खोकला होतो, मळमार्गानें शेम पांढरे रंगाची पडते. शरिरांत वात शिरतो, अशक्तता येते हा रोग ज्यांस आहे त्याणी पाकवडी औषध घ्यावें. एक डब्यांत तोळे १६ किंमत रुपये २ डाक खर्च ९ आणे.

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन वैद्य पेठ सदाशिव पुणें सिटी.


☞ हें पत्र अकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

लालअ० ... ७ ॥ ८८
किरकोळ अंकास........................८४
नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दूसरे खेपेस ........०१

Six monthly............3 ॥ 9 as
Single copy..................................4 as

Advertisements'
Below 10 lines...2Rs
per line over10... 4a.
Repetition per line 8as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXIII AKOLA MONDAY 24 JUNE 1889 NO. 24

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख २४ माहे जून सन १८८९ इ० अंक २४

## पत्रव्यवहार.

ह्या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजू नये.

मुक्काम खामगांव तारीख १९।६।८९

रा. रा. वऱ्हाड समा० कर्ते यांसः—

वि० वि० बरेच दिवस झाले आपले कडून कांहींच वर्तमानपत्रांत विशेष मजकूर येत नाहीं हल्लीं खामगांव येथें बरेच दिवसांपासून सख्याचे सवद्याचा भाव तुटनेचा तड पडून येथील सख्याचे सवदे होणें बंद होते. काल रोजीं मि० शामलाल बोंकारदास सेट साहेब यांनीं त्याचा भाव तोडून देण्याचे कामांत लोक कल्याणार्थ पुढारी होऊन सख्याचे भाव तुटले गेले ते. जवारी ९३। रुईओझे १७, गहूं ७३, आळशी ९१ या प्रमाणें ठरवून देऊन निकाल झाला व भावाचा निकाल झाल्यानें पुढें पेठेंतील व्यापार बंद होता तो आज पासून जारी झाला हा मजकूर आपले पत्रीं येत्या अंकीं छापून प्रसिद्ध केला जाईल अशी उमेद आहे कळावें हे विनंती.

आपला

एक मित्र K. B.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

मुक्काम वऱ्हाड ता० १७-६-८९ इ०

कृतानेक सा० न० वि० वि० मि० बेंरेट् यांस सरकारानें वऱ्हाड प्रांतांत ऑफिसिएटिंग डायरेक्टर नेमिलें हें सरकारचें वर्तन बरोबर नाहीं असें लोकांना वाटत असून त्या बद्दल लोक सरकारचे न्याईपणाला किंचित दोष देत आहेत. सरकारचे हातांत असलेली गोष्ट सरकार करून सोडतेच परंतु या कामीं लोकमताकडे ही सरकाराला पाहिलें पाहिजे. परंतु ही नेमणुक करण्याचे कामीं सरकारानें कांहीं लोक मताचा विचार केला नाहीं असें वाटतें. हल्लीं बेंरेट डायरेक्टर हुशार आहेत. इंग्रजी त्यांना अगदीं करतलामलक आहे. ते मुंबई इलाख्यांत इंग्रेजीचे गुरु आहेत तेव्हां अशा विद्वान मनुष्या बद्दल व्यक्ती प्रमाणानें आमचे कांहीं म्हणणें नाहीं. व इतर कोणाचे ही म्हणणें असेल, असें वाटत नाहीं. पहिल्या प्रथम ही जागा युरोपियनांच्या हातांतच होती. पहिले डायरेक्टर डाक्टर सिंक्लेर साहेब होते. कांहीं दिवस उड हौस झाले होते. मध्यंतरी छिवानिरीचा बहाका उडाला. नंतर मि० क्यांडी नंतर इलियट असे युरोपियन डायरेक्टर होऊन गेले. तशीच जर ही जागा युरोपियनाचे हातांत असती तर मग कोणीच कुरकुर केली नसती. परंतु १८७९ सालांत हिंदुस्थानचे प्रतिनिधी लॉर्ड नॉर्थब्रुक असतां त्यांनीं मोठ्या मनानें ही जागा नेटिवांच्या गळ्यांत घातली, व तेव्हां पासून सुमारें १४ वर्षें ही जागा नेटिवांच्या अधिकारा खालीं आहे) या नेटिवांच्या कारकिर्दींत इतकी सुधारणा झाली कीं हल्लींची खात्याची स्थिती त्या बद्दल साक्ष देत आहे. नेटिवांना नेमण्याचा प्रघात पडल्या पासून डायरेक्टराला पगार कमी पुरला. खात्यांत अवाढव्य खर्च होता तो कमी झाला. नियमीतपणा विशेष वाढून लोकांना विद्येची अभिरुची फार लागली. Inspectionचें काम चांगल्या रीतीनें होऊन खात्यांत कांहीं अव्यवस्था राहिली नाहीं. जे दोन नेटिव डायरेक्टर झाले त्यांना खात्याची चांगली माहिती असल्यामुळें खात्यांत अनीतीचें बीज अगदीं नाहींसें झालें. महत्वाकांक्षी लोकांना आपली बेकी वर उचलण्यास संधी अगदीं सांपडली नाहीं. सहा रुपयांच्या मास्तरा पासून तों ४०० रुपयांच्या मास्तरां पर्यंतची त्यांना चांगली माहिती. नेटिवांच्या रिती भातींची त्यांना चांगली माहिती. त्यांच्या कारकीर्दींत स्त्री शिक्षणाला बरेंच उत्तेजन आलें. हलक्या जातीच्या लोकांमध्यें शिक्षणाचा प्रसार झाला. एकूण नेटिवांची कारकीर्द युरोपियन डायरेक्टरांच्या कारकीर्दीपेक्षां कमी सुखकारक झाली असें कोणी म्हणणार नाहीं. व आज पर्यंत खातें स्थापन झाल्या पासून जे रिपोर्ट युरोपियनांनीं व नेटिव डायरेक्टरांनीं लिहिलेले आहेत ते वाचून पाहिले असतां नेटिवांचेच कित्येक रिपोर्टांत अधिक वाहवा केलेली आढळेल. असें आहे म्हणूनच वऱ्हाड अगर कोणत्याही प्रांतांतील शाळाखात्याच्या मुख्याचे Director काम करण्यास नेटिव कमी लायक असें कोणत्या ही गोष्टी वरून सिद्ध करितां येत नाहीं. असें असतां नेटिव डायरेक्टर रजेवर जातांच बदलीचें काम करण्यास सुद्धां युरोपियनाला आणावें हें मोठें नवल नव्हे काय! या वरून पुढें ही जागा युरोपियनाचे हातीं जाणार असें चिन्ह दिसूं लागलें असें लोक समजतात.

(वास्तविक पहातां खात्यांत काम करीत असलेले लोकांचे हक्क डिवकारून देऊन बाहेरून मनुष्य आणून लावणें हें पुष्कळ प्रकारें अहितकारक आहे. एकतर पुष्कळ वर्षांपासून खात्यांत काम करीत असलेल्यांचे हक्क बुडविल्या मुळें त्यांना दुःख होणें व दुसरे प्रकारें अपरिचित मनुष्याला खात्यांत आणून सुयंत्र चाललेल्या व्यवस्थेंत घोटाळा करणें. वऱ्हाड शाळा खात्यांस नेटिव डायरेक्टर असल्या पासून परिणाम काय व त्यांचे फळ कोणतें व युरोपियन डायरेक्टर असल्या पासून फळ कोणतें हें ज्यानें नेटिवांची कारकीर्द लक्ष पूर्वक पाहिली आहे त्यांस सांगावयास पाहिजे आहे असें नाहीं. वऱ्हाड शाळा खात्यांत ज्या अनेक सुधारणा झाल्या आहेत. त्या नेटिवांच्या अंमला खालीं खातें असल्या मुळेंच झाल्या आहेत व त्यांचा मोठेपणा नेटिवांनाच दिला पाहिजे. खऱ्या रीतीनें व निःपक्षपात बुद्धीनें जर या विषयाचें कोणी मनन केलें तर तो खास असें म्हणेल कीं ही बदली डायरेक्टरची जागा रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम्. ए. ऐजुकेशनल इनस्पेक्टर यांसच योग्य आहे. व जेव्हां कायमचीच भरती जाईल तेव्हां ही त्यांसच मिळणें योग्य होईल. हे मि. महाजनी शाळा खात्यांतच काय परंतु सर्व वऱ्हाडांत नेटिवांमध्यें विद्वान रत्न आहेत. इंग्रजीकडे जी मोठी मोठीं प्रस्थें आहेत त्या विद्वानांच्या पंक्ती मध्यें बसण्याची यांचे अंगी विद्वता व पहिल्या प्रतीची बुद्धी आहे असें ज्यांना ज्यांना हे माहित आहेत ते मोठ्या आनंदानें कबुल करतील. वऱ्हाडांत आल्या पासून त्यांनीं आज १८ वर्षें आपलें बुद्धी भांडार खर्च करून व विद्येचें तेज पाडून या खात्यास चांगल्या दशेस आणिलें. आज जे वऱ्हाडांत नावाजलेले विद्वान लोक दृष्टीस पडतात ते मिस्तर महाजनी यांचे परिश्रमांचे व विद्वतेचें फळ होय. पुढील आशा करितां ज्यांस धरून हे राहिले व या प्रांतावर त्यांनीं उपकार केले तसेच मराठी भाषेंत अनेक पुस्तकें करून मासिक यांनीं स्वरूप आणिलें. हरएक तऱ्हेची सुधारणा करण्यांत हे अग्रगण्य आहेत. असा विद्वान, नीतिमान्, अनुभवीक, मेहेनत करण्याच्या कामांत पटाईत, सुधारणेच्या ज्यांच्या मनांत निरंतर वास करीत असते व ज्यांनीं आपलें मन सर्व काळ शाळा खात्याच्या हिता साठीं मांगलपणें लाविलें असा महात्म्यानें हुद्दा मनात न आणतां भलत्याच मनुष्याला बाहेरून आणून त्यांचे घेणें खचविणें हें बरोबर नाहीं. मि. महाजनी यांनाच ही जागा मिळणें योग्य आहे याबद्दल आम्ही तारीख २०।४।८९ इसवी रोजीं अंकांत प्रतिपादन केलें आहे) हल्लीं आमच्या सुदैवानें हिंदुस्थानचे प्रतिनिधी मोठ्या मनाचे आहेत. त्यांना विद्वान् लोकांची पारख आहे. ते नेटिवांचे हितचिंतक आहे असें त्यांचे जे कित्येक ठिकाणीं भाषणें झालीं त्यावरून नदिसून येतें असें असतांही जागा यांचे अमला खालीच नेटीवां कडून पुनः पुर्वस्थितिवर जाणें बरोबर नाहीं. या एका नेमणुकीनें या वऱ्हाड प्रांतांतील सर्वांना आनंद झाला होता. आतां ही जागा नेटीव अमला खालून जाणार असें सर्वांनां समजून त्यांना मोठें साश्चर्य दुःख वाटत आहे. आतां ही जागा युरोपीयनालाच देण्याचा सरकारचा आग्रह असे लतर ती मिस्तर एटकीन यांनाच वऱ्हाडांत मिळती तरी बरें झालें असतें असो. आमचे रयत याना त्यानें विचार पुढें ठेविले आहेत जर विचार कोणी केल्यास ते वावगे आहेत असें वाटणार नाहीं कळावें हे विनंती.

आपला

"क्ष"

रा० रा० व्हाडसमाचार कर्ते यांसः—

मु० वाशीम ता० १८–६–८९ इ०

कृतानेक सा० न० वि० वि० मृग नक्षत्राचा प्रवेश झाल्यावर मधून मधून पाऊस पडण्यास आरंभ होतां होतां आज दोन प्रहरीं फार पाऊस पडला. हवेंत गारठा आला. रोगराई सध्यां फारशी नाहीं. शेतीवाल्यांची सरकी पेरण्याची धांदल उडाली आहे. बिचाऱ्यांच्या श्रमाची अखेर नीटपणीं चीज होवो. धारण महाग होत चालली आहे. धान्याचे तुटपुंजे व्यापारी लोकांनां सहजासहजीं फसवितात. बाहेरून लोकांपासून धान्य घेण्याचें माप एक व बाजारांत लोकांना तें विकण्याचें एक अशी मापें असतात. घरीं जाऊन मोजून पाहावें तों घेतलेले धान्य कमी भरतें. याचा बंदोबस्त पोलिसाकडून होईल अशी उमेद आहे. खऱ्याचा न्याय व खोट्याला शासन झालेंच पाहिजे. हल्लीं आमचे वाशिमस्त लोकांचे नशीबानें आम्हास सिटी (city) फौजदार फार हुशार मिळाले आहेत. ते शहराचा बंदोबस्त ठेवण्या करितां फार झटतात. त्यांचे सफाइच्या कामीं फार लक्ष आहे असें दिसतें. अशा हुशार कामगारानें (weights and Measure) यांत लक्ष घालून सुगावा लागूं न देतां अकस्मात बाजारच्या दिवशीं वजनें व मापें तपासलीं असतां जें खोटीं सांपडतील त्यांचे मालकास जबर शासन झाल्यास पुनः मापांच्या व वजनांच्या द्वारें जी गिऱ्हाईकांना बूड लागते ती नाहींशी होईल. तेली लोक शेर बाळगतात. ते बाहेरून मोठे दिसतात. परंतु कृत्रिम करून लोकांना फसविण्याच्या इरादानें शेराच्या आंत किटण घालतात. तेणेंकरून तेल कमी येतें. तर या कामींही फौजदार साहेबांनीं लक्ष दिल्यास या बाबतींत असलेली सर्व अव्यवस्था मोडून जाईल व लोक त्यांची फार स्तुती करतील.

रा० रा० भाउराव यादव डे० ए० इन्स्पेक्टर साहेब नि० वाशीम यांचे कार्कीर्द

पेनशन घेऊन आपल्या देशीं गेल्यामुळें मास्तरांनां व इतर स्नेही मंडळीला वाईट वाटत आहे. यांच्या रजेच्या मुदतींत काम करीत असलेले गृहस्थ मि॰ रामचंद्र गोविंद कोपरगांवकर वरोलीच्या कोंपऱ्यांत जाऊन पडले. वरोली हे मंगरूळपीर तालुक्यांत खेडें आहे. तेथें हे कोपरगांवकर बदली क्लार्क येण्यापूर्वी मास्तर होते. ते बदलीची मुदत संपतांच तिसांवरून बारांवर कोंपऱ्यांत जाऊन पडले परंतु अशी बातमी समजते कीं त्यांच्या दोन वर्षांच्या कामा कडे लक्ष देऊन त्यांची पुर्वीच्या पगाराची सवाई झाली ( म्हणजे वरोलीचा पगार बारा होता तो बारा सवे पंधरा होऊन ) त्यांना बुलढाण्यास डे. एजुकेशनल इस्पेकटरचे दुय्यम क्लार्कचे जागीं पंधरावर नेमिलें. असो. पगाराची सवाई होऊन हवा चांगली मिळाली हें लाहान नशीब समजावयाचें काय? आतां हे नवीन जागीं जातील तेथें तरी यांनीं गरीब मास्तर लोकांना चांगल्या रीतीनें वागवावें, परंतु ही शंका कशाला? आतां त्यांना तीस निमे पंधरा मिळावयाचे तेव्हां पगारांत जसा फारक पडला तसा वागणुकींत ही फरक पडेल. म्हणजे निम्मे प्रमाणानें अधीक चांगली वर्तणूक होईल. या शिवाय ते तेथें स्वतंत्र नसून सासू व सून या नात्यानेंच तेथें वागावें लागेल म्हणजे हेडक्लार्क दुसरे आहेत तेव्हां यांचा वरचष्मा चालणार नाहीं.

येथें कायमचे क्लार्क रा. रा. केशव नारायण शेकदार या नावाचे गृहस्थ आकोल्याहून येत आहेत. यांचीं म्याट्रिक्युलेशनची परिक्षा पास झाली असून हे इंग्रजींत त्या परीक्षेच्या मानानें चांगले आहेत असें समजते. व यांचा स्वभाव फार उत्तम आहे. अशी लोक वार्ता आहे. असो. येथें हुशार व सुस्वभावी क्लार्क येत आहेत असें ऐकून सर्व मास्तर लोकांना आनंद होईल यांत संशय नाहीं.

मेची सुटी संपुन दिवाणी कोर्ट सुरू झाली. (Judicial Scheme) अमलांत येऊन आपल्यास बढतीच्या जागा मिळतील असें पुष्कळांना वाटत आहे. ती बिच्याऱ्यांची आशा सफळ होवो. बढती मिळणें अलिकडे फार कठीण झाले आहे. तर अशा वेळीं तरी योग्या योग्य विच्यार होऊन पुष्कळांना बढती मिळावी हे उत्तम व उमेद आणण्या सारखे आहे. कळावें लोभ कीजे हे विनंती.

आपला
"क्ष"

वऱ्हाडसमाचार.

मित्ती जेष्ठ वद्य ११ शके १८११

## सुधारणा.

( मागील अंकावरून पुढें चालूं )

आमची मनापासून इच्छा आहे कीं, हा रोंखलेला काळ या हतभाग्या देशावर ईश्वरकृपेनें न येवो म्हणजे आम्ही मिळविलें. वरतुतच्या प्रगमनचक्रास चांगली उलट गति मिळाली पाहिजे. कांहीं ही व्युत्क्रम रहाटी लागली म्हणजे कांहीं कालमर्यादेनें आम्ही जुन्या गोष्टांशीं समतोल खऱ्या सुधारणेचा क्रम चालूं ठेवूं. खऱ्या सुधारकांचें अभिप्राय इंग्रजी शिक्षणास काडीमात्र प्रतिकूळ नाहींत आणि सुधारणा होणें ती अनंत कालावर विश्वास ठेवून होते असें ही त्याचें म्हणणें नाहीं.

अधुनिकसुधारणेचा पाया चुकला आहे असें आह्मी वर दाखविलें आहे; परंतु तो कसा चुकला आहे हें दाखविण्यास इंग्रजी विद्येचा उपयोग आणि दुरुपयोग होत आहे तो लोकांच्या नजरे समोर आणण्याचा प्रथम प्रयत्न केला पाहिजे. नव्या सुधारणे संबंधानें आमचे वाईट ग्रह आहेत असें सहजी कोणास वाटेल ते केवळ प्रस्तुतच्या अनीष्ट स्थिती संबंधानें लागूं पडतें हें निराळें सांगणें नको.

चक्रवर्तिनी व्हिक्टोरिया सरकारच्या राज्यांत सूर्य मावळत नाहीं असें ह्मणतात ही ह्मण जशी राज्यविस्तारास लागूं पडते त्याप्रमाणें पूर्वपश्चिम दोन्ही गोलार्धांत इंग्रजी भाषा लोक बोलत नाहींत किंवा लिहीत नाहींत असा देश विरळा. एका शोधक विद्वान इंग्रजी कोशकर्त्याचें ह्मणणें आहे कीं इंग्रजी भाषेचा प्रसार बोलण्यांत व लिहिण्यांत निम्यापेक्षां अधीक जगांत आढळून येईल. या वरून इंग्रजी भाषा ही जगाची भाषा आहे ह्मणजे इंग्रजी येत असेल तर कोणाही मनुष्यास कोणत्याही राष्ट्रामध्यें निर्वाहा पुरतें आपले मनोगत व विचार लोकांस कळविणें व दुसऱ्याच्या ह्मणण्याचा बोध आपणास करून घेणें हें फारसें अवघड वाटणार नाहीं. या मताच्या समर्थनासाठीं हिंदुस्थानीं भाषेचे छोटे खानी उदाहरण पुरें होईल. हिंदुस्थानी भाषा अवगत असली ह्मणजे थोड्या बहुत सहायानें कन्याकुमारीपासून उत्तरेस हरिद्वारापर्यंत प्रवाशी फिरस्त्यास आपला कार्य भाग सहजीक साधतां येईल. सारांश इंग्रजी भाषेची मातबरी फार मोठी आहे. तशांत ही भाषा आमच्या राज्यकर्त्यांची आहे तेव्हां आम्हास इंग्रजी भाषेशिवाय अन्यथारा नाहीं असें प्रतिपादण्यास प्रत्यवाय तो काय? हिंदुस्थानच्या सर्व राज्यकारभाराचें दप्तर मुख्यत्वें करून इंग्रजींत चालतें. सर्व जगाचा अथपासून इतिपर्यंत वृत्तांत कळण्यास प्रस्तुतची साधनें बहुतेक इंग्रजी पुस्तकें होत. पृथ्वीवरील राज्यक्रांत्यांची कथानकें व बातम्या कळण्याचें रहाटगाडगें इंग्रजी वर्तमानपत्रें होत. शास्त्रीय विषयांत पारंगता होण्यास इंग्रजी पुस्तकांच्या आधाराशिवाय आह्मास अन्य आधार फार अल्प स्वल्प आहेत.

एकंदरीनें आह्मी प्रांजलपणानें कबूल केलें पाहिजे कीं प्रस्तुत काळाला इंग्रजी भाषेशिवाय आह्मां नेटिवांना अन्य ज्ञानमार्ग नाहीं ह्मटलें तरी चालेल. वरील लेखावरून अशी खोटी समज होऊं नये कीं आपल्या स्वभाषा या ज्ञानप्राप्तीस साधनें नाहींत. इंग्रजी भाषेच्या अनुपम प्रसारामुळें आमच्या देशी भाषा ज्ञानाचे संबंधानें आडवाटा झाल्या आहेत किंबहुना त्या बुजाल्या प्रमाणें होण्याचा रंग दिसत आहे. आह्मी देशी भाषा साठीं हा नाशानी वेदना दूर व्हावी आणि तिची उत्तरोत्तर अभिवृद्धी व्हावी ह्मणून विद्वान विद्वान लोकांनीं दिलेले अभिप्राय व सूचना सवडी प्रमाणें प्रदर्शित करणार आहों तेव्हां देशी भाषांचा विषय बाजूला ठेवून मुख्य सुधारणेच्या विषयां कडे वळूं.

पुढें चालूं.

मनुष्य विरश्रीस चढला म्हणजे जसें त्याच्या अंगचें पाणी दिसून येतें त्या प्रमाणें राष्ट्राचें आहे. रशीयानें आपल्या सारख्या बलाढ्य राष्ट्राशीं म्हणजे इंग्लंडशीं टक्कर मारण्याचा दृढ निश्चय केला आणि रशीयन सरकार इंग्रजांच्या ताब्यांतील हिंदुस्थान देश जिंकण्याच्या उद्योगास लागलें तेव्हां पासून रशिया सारख्या अवघड दुस्तरलेल्या देशाच्या हातून लोकोत्तर अशीं कामें झालीं आहेत तीं पाहून मन अगदीं आश्चर्य भरीत होऊन जातें. रुस देश सोडल्या पासून हिंदुस्थानच्या सरहद्दीवर येणें पर्यंत जो जो मुलुख लागतो तो तो मुलुख रशियन सरकारनें पादाक्रांत केला इतकेंच नव्हे तर ठिक ठिकाणीं स्वतःच्या पराक्रमानें आणि करामतीनें ऐश्वर्य संपन्न राजधान्या वसविल्या आहेत असें म्हटलें तरी हरकत नाहीं. हिंदुस्थाना सारख्या कुबेर-नगराची आख्यायिका ऐकिली तेव्हां रशीयाच्या बादशहास हिंदुस्थानचा बादशहा बनण्याची हौस झाली हें साहजिक आहे. हा मनोरथ सिद्धीस नेण्याचा उद्योग सुरू झाला तेव्हां पासून इंग्लंडाचें आणि रशीयाचें वैमनस्य पडलें. युरोपांतील फ्रान्स पोर्तुगाल, इत्यादि राष्ट्रांचें इंग्लंडाशीं वांकडें येण्यास पुष्कळ प्रकारें हिंदुस्थान देश कारणीभूत झाला ही गोष्ट इतिहास प्रसिद्ध आहे. तोच मासला हल्लीं रशीयाच्या संबंधानें लागूं पडतो. हिंदुस्थानाकडे रशियाच्या ज्ञाराचा डोळा वळण्याची मूळ पीठिका अशी सांगतात कीं रुस देशचे प्रख्यात बादशहा पिटर धी ग्रेट वारले तेव्हा त्यांनीं आपल्या वंशजांस मरतेवेळीं आज्ञा केली कीं रशियन राष्ट्राची उन्नती होण्यास हिंदुस्थान देश हस्तगत केला पाहिजे तावत्काळ पावेतों रशियानें हा संकल्प मनोनिग्रहानें खरा करण्या साठीं अव्याहत प्रयत्न चालविले आहेत हें पाहून विस्मय वाटतो. हिंदुस्थानची मजल सफळ होण्यापूर्वीच रशीयाचें राज्य काळ्या समुद्रापासून पुर्वेकडे कितपत वाढलें आहे, आणि प्रशंसनीय काय काय गोष्टी अप्रकाशित आल्या आहेत त्याचा इतिहास कासटेधी कालेट नांवाच्या एका शोधक फेंच गृहस्थानें तयार केला आहे त्यांतील माहिती आम्हास लागली तितकी आज देण्याचा इरादा आहे. पुढील माहिती विश्वसनीय असण्यास कारण वरील गृहस्थानीं समक्ष पर्यटन करून खात्री करून घेतल्या नंतर आपले लेख प्रसिद्ध केले आहेत.

## जाहिरात.

सर्व लोकस जाहिर करण्यांत येतें कीं

सन १८८६ च्या वऱ्हाड मुनसिपल कायद्याप्रमाणें अकोल्यास नवीन मुनसिपल कमिटी तारीख २१ मे पासून स्थापित झाली. तिची स्पेशल सभा तारीख १९ जून रोजीं भरली होती. तींत मुनसिपाल कमिटीचे हद्दींतील भागांत व त्याबरील कामदारांत थोडा फेरफार झाला आहे. पूर्वीचे कमेटीनें शहरचे ३ व पेठेचे ३ मिळून ६ डिव्हिजन (भाग) केले होते. हल्लीं त्यांपैकीं शहरांतील ३ व पेठेंतील २ डिव्हिजन पूर्वींचेंच कायम ठेवले आहेत, मात्र ताजनापेठेंत एक सदरस्टेशनचें डिव्हिजन जास्त केला आहे; आणि ब डिव्हिजन मोठा होता त्याचे ब आणि ग असे दोन भाग करून दोन डिव्हिजन केले आहेत. असे शहर व पेठ मिळून ८ डिव्हिजन केले आहेत. त्यांजवर डिव्हिजनल मेंबर ज्या ज्या गृहस्थांस नेमिले आहे त्याजबद्दलची माहिती खालीं दिली आहे.

### पेठ.

| डिव्हिजनचें नांव | मेंबरांचें नांव |
| --- | --- |
| १ सदरस्टेशन | मि. आर. एटाकिन साहेब एजंट मुंबई ब्यांक |
| २ अ | मि॰ नामदेव राजन्ना |
| ३ ब | मि॰ सलिमखा दाउतखा साहू |
| ४ ग | मि॰ सोराबजी मंचरजी एजंट ब्रुएल कंपनी. |
| ५ क | मि॰ टिकमदास ताराचंद |

### शहर.

| | |
| --- | --- |
| ६ ड | मि॰ हरी रामचंद्र रोहणखेडकर |
| ७ इ | मि॰ मिरझा अबासबेग इनामदार |
| ८ क | मि॰ रामप्रताप रघुनाथदास |

पूर्वीच्या डिव्हिजनच्या हद्दी त्याच कायम ठेवल्या आहेत. ब डिव्हिजनचे २ भाग केले आहेत त्याच्या हद्दी येणेंप्रमाणें(ब)—पूर्वेस—रा. गोपाळ खुशाल यांचे घराचे ईशान्य कोपऱ्यापासून रामदीन पांडे यांचे घराचे कोपऱ्यापर्यंतची दक्षिणोत्तर सडक, पश्चिमेस—मे. सलिमखा साहेब यांचे घरा समोरील स्टेशनाकडे जाणारी सडक माहुमशाचे सडकेपर्यंत; दक्षिणेस— आठवडे बाजारचे दक्षणेकडील नाला, उत्तरेस—मासुमशावलीची पू॰ प॰ सडक.(ग)— पूर्वेस—ब डिव्हिजनची प॰ हद्दीची सडक; पश्चिमेस—मर्दी. दक्षिणेस—डिस्पेन्सरीचे द॰ बाजूनें जाणारा नाला; उत्तरेस—मासूमशावलीकडे जाणारी पू॰ प॰ सडक.

ज्या लोकांस मुनसिपल कमिटीच्या कामासंबधानें अर्ज वगैरे करणें असतील ते त्यानीं आपापल्या डिव्हिजन मेंबराकडेस करावे. या संबंधीं विशेष माहिती लागल्यास मुनसिपल कमिटीचे ऑफिसांत मिळेल.

तारीख २१ माहे जून सन १८८९

Krishnaji Malhar Paithanker.
सेक्रेटरी मुनसिपाल कमेटी
अकोले.

## जाहिरात

सर्व लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं नामदार सभेप्रमाणें कमेटीचे हद्दींतील गवत चार चराई हकांचा १८८९।९० सालाबद्दल लीलाव ता. १ माहे जुलई सन १८८९ इसवी रोजी सकाळीं ७ वाजतां टोनहालांत होणार आहे. ज्यांची घेण्याची इच्छा असेल

त्यांनीं सदरहू तारखेस हजर राहण्याची खबरदारी घ्यावी.

सदरहू जाहिरात लोकांस पुन्हां कळविण्याकरितां दिली आहे कळावें. तारीख २२ जून सन १८८९

Krishnaji Malhar
Secretary
Akola Municipality

# The Berar Samachar

**MONDAY JUNE, 24, 1889.**

## GOVERNMENT AND RYOTS.

Continued from our last but one issue.

Section 61 of the Draft revenue code is as follows:—

'The right of Government to mines and mineral products in all unalievated land is, and is hereby declared to be, expressly deserved, provided that an occupant who requires earth, stone, lime, sand or the like for his own use and not for sale or for conversion into articles intended for sale, may appropriate the same from any part of his survey number which at settlement may have been deducted as unculturable, or in small quantity from any other part of his number.'

As we said in our last this declartion of right to all mines and mineral property is one little corollary of the right of the State to all land. This most clearly leaves the ryot a lessee in occupation for 30 years of only the *surface*—land. This idea of the State *owning* all land is only a recent development of the revenue policy of the British Government. In the original Bombay legislation regarding the land revenue policy of government the ryot's position was not unmistakably pointed out and emphasized as in the land revenue code of 1879. This idea of State ownership, it was perhaps thought impolitic and unwise to start with, during the first years of British rule. But gradually the government's land revenue policy is becoming a grappling policy so to say. Perhaps the hands even of the government of India itself are tied down in this matter on account of instructions from the secretary of State; and we do not expect when the policy of government has been so deliberately adopted, that in the present Code any material change in principle will be made. The local authorities can possibly make no representation on the subject, and even if any are made they would be utterly useless whether they go from the press or local authorities. Our only object in commenting upon these two matters of ryot's occupancy and government property in mines is to make the agriculturists realize their position clearly as regaeds government. In justification of these two rules in the draft code prescription right might fairly be claimed by this time for this position of the ryot's holding has been so from the time of the first survey-being embodied in Berar Settlement Rule No 5. The rule about the mining rights although not so embodied, has a standing precedent in the Bombay land revenue Code which is the source from which any deficiencies in our present Code are tried to be made up. The proviso of grace allowing land-holders to use sand from of the fields for their *own* use, claims to sand for the past nine years at least—being embodied in Commissioner's Book Circular 23 of 1879. In discussing the liberal nature or otherwise however of the policy of the British government no inference can be drawn from the fact that certain rules have stood for a certain length of time. When the injustice of the rules is apparent, it would be a very lame excuse to say that they have now stood for more than 30 years and that they were accepted by the ryots at the first survey as part of the settlement rules. During the past 30 years Berar has undoubtedly made great progress, and whatever was ruled 30 years ago when the ryots were all so steeped in ignorance that they hardly knew what rights they had and how to assert or defend them, can not be now shielded against fair criticism. There *can* be no prescription to uphold an injustice; whenever it be. As soon as people and government know and realize it the sooner it is uprooted the better it is in the interests of all concerned. In this province especially, the British government have certainly not that kind of interest as in British India proper. Under native rule the ryot's position was much better regarding this matter of State ownership of lands; and there is no reason why the British government a mere trustee for the Nizam's government should be so over-zealous as to legislate for the Nizam's subjects in a manner which perhaps that government never intended to do. On this ground at least, the matter deserves to be seriously reconsidered, if not on the more comprehensive grounds of justice and equity.

(To be continued.)

The services of Surgeon-Major J. Moran, M. D., I. M. D., which by Notification No. 270, dated 22nd May 1888, were placed temporarily at the disposal of the Goverument of the North-Western Provinces and Oudth are hereby placed permanently at the disposal of that Goverument, with effect from the 30th April, 1889.

पोंच.

दवाखान्यांचा सन १८८८ इ. सालचा रिपोर्ट व कोष्टी व दीनमित्र या नांवाचीं मासिक पुस्तकें हीं पावलीं व त्याचा आम्हीं आभार पूर्वक स्वीकार करितों.

आपला देवराव विनायक या सद्दीचें पत्र व रिसोडकर आपला क्ष अशीं दोन्हीं पत्रें पावलीं स्थलसंकोचा बद्दल याचा विचार पुढें केला जाईल.

## वऱ्हाड.

हवामानः—गेल्या आठवड्यांत थोडा पाऊस पडला. अद्याप हवेंत उष्णता बरीच आहे. मधून मधून ढग येतात. प्रांतांत कोठें कोठें हीव ताप व हवेचा उपद्रव आहे.

अलिशान ऑफिशिएटिंग रेसिडेंट मि. हावेल साहेब यांस आपले कामाचा राजिनामा देण्याची परवानगी हिंदुस्थान सरकारा कडून मिळाल्या विषयीं सिमल्याहून गेल्या मंगळवारीं तार आली आहे. मि. हावेल सारख्या हुशार अधिकाऱ्यांस राजिनामा सादर करण्याची पाळी आली हें पाहून फार वाईट वाटतें.

रा० रा० गणपराव खापर्डे यांचा राजीनामा मंजूर करावा असें अखेरीस ठरलें. गणपतराव हे आतां लवकरच पूर्ववत् वकिलीची तयारी करूं लागतील. त्यांच्या योग्यतेनुरूप त्यांना सरकार बढती देऊं शकत नाहीं ही मोठी अपसोसाची गोष्ट आहे. मि. निजामुद्दीन साहेब या प्रांतातून गेल्या पासून येथील कमिशन मध्यें कायद्यांत प्रवीण असें काय ते येवढेच गृहस्थ राहिले होते. एकंदरींत पहातां वऱ्हाड प्रांतांत न्याय देवता देखील डोळे मिटूनच असणार असें दिसतें.

पब्लिक प्रासिक्युटरची जागा वऱ्हाड प्रांताला नको असें ठरल्याचें समजतें.

क्यापटन ग्यारेट साहेब हे आजारी असल्यामुळें एक वर्षाची फर्लो रजा घेऊन लवकरच विलायतेस जाणार असें समजतें. क्यापटन ग्यारेट साहेबांसारखे मेहनती हुशार, निःपक्षपाती न्यायाधिश या प्रांतांत थोडेच आढळतील. खामगांवास गेल्या पासून त्यांना दिवाणी, फौजदारी, मुलकी आणि दोन म्युनिसिपालिट्यांचें जें सर्व काम करावें लागलें त्या मुळेच ते आजारी पडले असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ग्यारेट साहेब हे निःपक्षपाती व मनाचे मोठे उदार असल्यामुळें एतद्देशीय लोकांचे मोठे हितचिंतक आहेत. हे बरे होऊन लवकरच परत येवोत असें आम्हीं इच्छितों.

पंडित सुरजनारायण, अ. क. यांनीं ता० २३ ते २७ मे १८८९ पर्यंत वाशीम जिल्ह्याचे डेपुटी कमिशनरचें चालूं काम पाहिलें.

ता० ४ आणि ९ जानेवारी सन १८८९ ह्या दोन दिवसांत प्रेन्डी यांनीं वऱ्हाडच्या कानसरव्हेटर ऑफ फॉरेस्टच्या ऑफिसचे चालूं काम पाहिलें.

मि. महंमद यासीनखा अ० क० यांस क्रि. प्रो कोड कलम २६० फिकरा २ प्रमाणें संक्षिप्त चौकशीचा अधिकार मिळाला.

रा. रा. केशवराव जयकृष्ण ए. अ. क. यांस यवतमाळास नेमिलें.

उमरावतीस पोलीसचे व लष्करचे शिपायांत मारामार होऊन दोन शिपाई फार जखमी झाले होते त्यांतील एक माहामरीनें मेला असें ह्मणतात.

कर्नल आर. बुलक डे. क. यांस सेशन जजची जागा पतकरतां ह्मणून सरकारे विचारलें असतां त्यांनी ती कबूल केली, त्या प्रमाणें ते आपली राहिलेली रजा रद्द करून वऱ्हाडांत परत येणार व ते येई पर्यंत मि. आर. आबर्ड हे सेशन जजाचें काम पाहणार अशी वार्ता आहे.

रा. रा. श्रीकृष्ण नरहर ए. अ. कमिशनर यांची येवतमाळास बदली झाली, व त्यांचे जागीं तेल्हाऱ्यास राव बहादूर पुरुषोत्तमराव ए. अ. क. किंवा रा. रा. अयोध्याप्रसाद ए. अ. क. हे जातील अशी वदंता आहे.

कर्नल सि. टी. लेन इनस्पेक्टर जनरल ऑफ पोलीस, वगैरे हे रजेवर जाणार व त्यांच्या जागीं दुसऱ्या प्रांतांतील कोणी येणार ह्मणून वार्ता होती. पण तसें न होतां त्यांच्या जागीं आतां मि. एफ राईट डि. सु. पोलीस यांचीच नेमणूक होणार ह्मणून ह्मणतात.

कर्नल ग्रांट साहेब येथील डे. क. हे लवकरच पुष्कळ दिवसांची रजा घेऊन विलायतेस जाणार व त्यांचे जागीं मि. आर. डी. हेअर हैदराबादेहून परत येणार असें ह्मणतात.

मि. ब्यारेट यांनीं वऱ्हाडच्या विद्याखात्याच्या डायरेक्टरची जागा कबूल केली. व त्या प्रमाणें ते आपल्या नवीन कामीं रुजू होण्या करितां लवकरच येणार असें कळतें.

येथें श्री कनकेश्वर प्रासादिक सातारकर स्त्री मिश्रित नाटककार मंडळी आली आहे. गेल्या आठवड्यांत त्यांनीं दौलतराव व कार्तवीर्य अवतार हे खेळ केले. खेळ साधारण बरे झाले. नाटककार मंडळी गुणांनीं विशेष नांवाजण्या सारखी नाहीं; तथापि टाकाऊही नाहीं. लोकांनीं आश्रय दिला असतां ती व्यर्थ जाणार नाहीं.

हैदराबाद अमानी मुलखांतील दिवाणी कोर्टाच्या कायद्याचे कलम ९ (१) ए, ९ (४), आणि २० अन्वयें अलिशान रेसिडेंट सा० यांनीं डेपुटी कमिशनरच्या कोर्टाचे अधिकार खालील अमलदारास त्यांच्या नांवासमोर दिलेल्या जिल्ह्यांत दिले आहेत, आणि असें फरमाविलें आहे कीं डे० क० व त्यांच्या हातां खालील जज यांच्या मध्यें चालणाऱ्या कामाची वाटणी डे० क० वेळोवेळीं हुकुम करितील त्या प्रमाणें होईल.

मि० सी. ए. डब्ल्यु डेव्हिस अ. क.—अकोला
पंडित सुरजनारायण अ. क.—वाशीम
कुमारश्री हरबानजी
रावजी, बी. ए. आणि एल् एम ब्यॅरिस्टर ॲट लॉ; अ. क.—बुलढाणें.
रा. रा. श्रीकृष्ण नरहर ए. अ. क.-वणी.
मि० अर्देसर दिनसाजी ए. अ. क.—एलिचपूर.

## वर्तमानसार.

## सृष्टि चमत्कार,

हें सृष्टिरूप विशाल प्रदर्शन परमेश्वरानें असंख्यात चित्रविचित्र वस्तूंनीं व जीवजंतूंनीं भरून ठेविलें आहे. त्यांतील एकेका पदार्थांत अथवा जीवजंतूंत किती मनोहर व आश्चर्यकारक अनवगुण भरून ठेविले आहेत, ह्याचा कांहींच पत्ता लागत नाहीं. चीनदेशांत असे कांहीं विलक्षण पक्षी व उद्भिजें आहेत कीं त्यांचें वर्णन ऐकल्या बरोबर सृष्टि रचना करणाऱ्याच्या चातुर्या बद्दल व कुशलते बद्दल मना मध्यें एकदम पूज्यभावच उत्पन्न होतो! चीनांत शानसी देशा मध्यें एक पक्षी आहे. या पक्षाचा पुरुष वर्गांतून स्त्री वर्गांत जातो. पेते टैनसिनच्यू प्रांतांत एक मत्स्य भक्षक पक्षी आहे तो ओरडूं लागला ह्मणजे त्याच्या तोंडांतून एक प्रकारच्या जिवांच्या झुंडीच्या झुंडी बाहेर पडत असतात! दुसरें एक पाखरूं आहे तें मारलें तर त्या पासून पुष्कळ तेल मिळतें आणि त्याचा भाता पाण्यांत बुडविला तर पुनः त्या पासून जिवंत पाखरूं उत्पन्न होतें! अशींच तिकडे चमत्कृत जनावरें आहेत. कानसू प्रांतांत मासाळ बैलासारखें एक जनावर आढळतें. हें जनावर वाढल्या कुरणा प्रमाणें मांसभक्षक लोकांचें एक प्रकारचें वाढतें कुरणच आहे! ह्मणजे त्याच्या आंगाचें मोठालें काताळे काढून घेतलें, तरी तें जनावर मरण्याची भीति नाहीं. एक दिवसाच्या आंतच त्याचें तें मांस पुनः भरून येतें! चिनांतील दक्षिण समुद्रांत एक मत्स्प जाती आहे, त्यापासून रेशमासारखे कांहीं तंतु सांपडतात ते घरांत कोठेंही टांगून ठेविलें, तरी भर उन्हाळ्यांत महाबळेश्वरा सारखा गारठा घरांत येतो, ह्या मत्स्याचे जे अश्रु पडतात, त्यांचीं मोत्यें होतात. एक जातीचा विशाल खेकडा आहे, त्याचे कोव्यांत एक लहान मत्स्य आहे. तो मत्स्य बाहेर पडतो आणि खाऊन पिऊन नेहमीं त्याचे कोव्यांत परत जातो. एवढ्यानेंच त्या खेकड्याचें पोषण होतें परंतु जर तो मासा त्याच्या कोव्यांत परत आला नाहीं तर तो खेकडा लागलाच मरून जातो; होलो जातीचा एक मत्स्य आहे, त्यास डोकें एकच असतें, परंतु तो दशदेहधारी असतो. चिनांत कांगसि येथें एक प्रकारचा चौरसाकृति सर्प असतो; त्याला जर कोणी धरण्यास गेले तर त्याच्या आंगावर तो फुसकाऱ्यानें वीष उडवितो आणि त्यानें मनुष्य तावडतोब मरतें. दुसरा एक चमत्कारिक सर्प आहे त्याला आपल्या आंगाचे १२ निरनिराळे तुकडे आपाप करतां येतात. ह्या तुकड्यांला जर मनुष्याचा स्पर्श झाला तर लागेच त्या तुकड्यांला तोंड वगैरे उत्पन्न होतें. काय चमत्कार आहे!!] अशा चमत्कारिक वस्तु ज्या प्रदर्शनांत मांडल्या आहेत त्या प्रदर्शनाचें सौंदर्य आणि तें करणाराची अद्भुत शक्ति याचें किती ह्मणून वर्णन करावें.

बाल सैन्य—चीनच्या बादशहानीं १२ वर्षांच्या आंतील मुलांची एक रेजिमेंट तयार केली आहे. गेल्या एप्रिलांत एकंदर चिनी सैन्याची जंगी कवाईत झाली त्यांत ही मुलांची रेजिमेंट आणिली होती. शु० सु०

ज० नानाभाई हरिदास यांच्या जाग्यावर तूर्त कोणाचीही नेमणूक होत नाहीं असें समजतें.

अमेरिकेंत मोठी आग लागून सुमारें पांच कोटींचें नुकसान झाल्याचें समजतें! यद्यां अमेरिकेवर संक्रांतच आहे.

पर्शियाच्या शहाकरितां विलायतेस सुमारें २५ हजार रुपये खर्ची पडावयाचे आहेत.

अमेरिकेंत मी ख्रिस्ताचा अवतार आहे असें ह्मणणारी एक बाई असून जर्मनींत असें ह्मणणारा एक बुवा निघाला आहे! दोघांनीं लग्न लावलें तर त्याच्यापासून रगड ख्रिस्त होतील नाहीं बरें!

पर्शियाचे शहा रशियांत गेले होते व तेथून ते आतां इंग्लंडांत जाणार आहेत. त्यांनीं इंग्लंडांत जाऊन रशियाच्या विरुद्ध जर एखादें कारस्थान केलें तर रशियाची जी फौज इराणच्या हद्दीवर ठेविलेली आहे तीच पुढें सरकून इराणास तुडवील हें ध्यानांत ठेवावें अशी रशियन सरकारानें शहास ताकीद दिलेली आहे. त्यावर शहानें मुळींच उत्तर दिलें नाहीं, पण रशियाच्या या ताकिदी वरून त्यासरकारचा झोंक कशा प्रकारचा आहे हें तेव्हांच समजतें. परदेशांत स्वराज्य असल्यामुळें एकमेकांस कसें चुरचुरीत निरोप पांठवितां येतात पहा! आह्मी हे निरोप एकूनच आनंद किंवा दुःख मानावयाचें! !

नेटिव राजांच्या फौजा सरहद्दीच्या रक्षणाकरितां घ्यावयाच्या हें हिंदुस्थान सरकारचें ह्मणणें नामदार स्टेट सेक्रेटरी साहेबांनीं ही पसंत केल्याचें समजतें. पसंत करण्यांत सर्व तो परी फायदाच असल्यावर स्टेट सेक्रेटरी आळस कशा करितां करतील! आमच्या राजेरजवाड्यांस तरी फौजांची जरूर कशास लागणार? इंग्रज सरकारनें बैस ह्मटल्यास बसावें व ऊठ ह्मटल्यास उठावें हें एक काम व दुसरें आपापलीं राज्यें सोडून देऊन गरीब रयतेच्या पैशाची उधळपट्टी करीत खुशाल चैनीनें हवा खात हिंडावें हीं दोनच कामें त्यांस असल्यामुळें त्यांत फौजांचा संबंध येतो कशाला? आमच्या राजेलोकांस फौजा ह्मणजे एक निरर्थक खर्च असेंच वाटूं लागलें असेलसें वाटतें. इश्वरेच्छा. दुसरें काय ह्मणावें?

मृत्यु—लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं मुंबई हायकोर्टाचे जज्ज मि० ज० नानाभाई यांस गेल्या ता. १३ रोजीं गुजराथेंत देवाज्ञा झाली! मरण समयीं यांचें वय सुमारें ५७ वर्षांचें होतें. हे १८७३ सालीं हायकोर्टाचे जज्ज झाले. यांची कारकीर्द ऐकल्या बरोबर हायकोर्ट एक दिवस बंद ठेविलें होतें. हे न्याय करण्याच्या कामांत मोठे हुषार व निःपक्षपाती होते. पु.वै.

हिंदुस्थानाबद्दल तिटकारा दाखविणाऱ्या लार्ड डफ्रीन साहेबांस पोटशुळाची नवी व्यथा झाली आहे असें ह्मणतात. पोटशूळ, संधिवायु वगैरे रोग लोकांचें वाईट इच्छिलें असतां. ईश्वर पाठीस लावतो असें आमच्या पूर्वात्य लोकांचें मत आहे असो. त्यांची ती पोटशूळाची व्यथा लवकरच बरी होवो असें इच्छितों ह्मणजे आणखी कांहीं मुक्ताफळें ऐकावयास सांपडतील.

निजामाला बुडविणाऱ्या डेकनमायनिंग कंपनीच्या प्रकरणाचा निकाल हिंदुस्थान सरकारच्या मर्जीविरुद्ध होणार असें ह्मणतात. या कंपनीशीं जो करार झाला होता तोच वाढवून पुन्हा त्या कंपनीस काम करून द्यावें असें जें हिंदुस्थान सरकारचें ह्मणणें त्या ह्मणण्यास इंडिया आफिस विरुद्ध आहे. ज्या मेहदी अलीनें कांहीं दिवसांपूर्वी त्याच प्रकरणावरून इंग्लिश लोकांस लबाड, खिसेकातरू वगैरे ठरविलें होतें त्याच मेहदी मता प्रमाणें इंडिया आफिस आपलें मत देणार असें बाहेर आलें आहे. मेहदी हसन याणीं ज्या सूचना केल्या होत्या त्य टाईम्स पत्रांत प्रसिद्ध झाल्या मुळें तें त्यांचें ह्मणणें इंडिया आफिसास आतां नाकबूल आहे. या संबंधानें पार्लमेंटाच्या मार्फत लवकरच चवकशी होणार आहे असें लंडनची ता० १३ मिनहूची तार सांगते. मेहेदी अलीचें ह्मणणें जर इंडिया सरकारास मान्य झालें तर त्यांनीं इंग्लिश लोकांस जी विशेषणें दिलीं तींही त्या आफिसास मान्य असावीत असें होतें. टा. अ

रशियाच्या झारानें इराणच्या शहास अशी धमकी दिली आहे कीं ' जर इंग्लंडांत असतां तेथील राणीशीं आपल्याला प्रतिकूळ असा तह कराल तर खूप समजून असा, आपल्या सरहद्दीवरील आमचे १० लाख शिपाई तावडतोब पुढें सरतील.

मध्य एशियांत रशियन लोक आले. बोखाऱ्याचे शहानीं असा हुकूम फर्माविला आहे कीं रशियन लोकांच्या सैन्याकरितां समरकंद पासून तो शेराबादपर्यंत रस्ता दुरुस्त करून ठेवावा. समरकंद आणि ताशकंद या प्रदेशांत किती जरी सैन्य जमा करून ठेवलें तरी कांहीं समजायचें नाहीं. आणि शेराबाद हें तर अफगाणच्या अगदीं सरहद्दीवर आहे ह्मु० बल्कच्या उत्तरेस.

रेल्वेच्या सडकांच्या दोन्ही बाजवा वाहून जाऊ नयेत ह्मणून फ्रेंच इंजिनियर अशुंची झाडें लावूं लागले आहेत; या झाडांच्या मुळांचें एक जाळें बनतें व तें कांहीं केल्यानें सुटत नाहीं.

अलेक्झांडर जफवे नावांचे एक फ्रेंच गृहस्थ एडिंबरो येथें उपवास करीत असतात. त्यांनीं एक विलक्षण चूर्ण तयार केलें आहे. त्याची एक चिमुट खाल्लीं असतां ते कित्येक दिवस अन्नावांचून राहूं शकतात, इतकेंच नाहीं तर त्यांची कोणत्याही प्रकारें शक्ती क्षीण होत नाहीं.

शंभर वर्षांपूर्वी अमेरिकेची जी स्थिती होती तीच हल्लीं आयरलंडची आहे. तेव्हां इंग्लंड व अमेरिका यांमध्यें जी तंट्यांचीं कारणें उपस्थित झालीं होतीं तीच किंबहुन त्यांहून ही ज्यास्ती आतां आयरलंडांत दृष्टोत्पत्तीस येतात. अमेरिकेकडे पाहून सुज्ञ व दूरदर्शी इंग्रजानें जागें होऊं नये हें मोठें आश्चर्य! असें मद्रास टाईम्सचें म्हणणें आहे. के०

पर्वता वरील रेल्वेः— अमेरिकेंत एका शोधकानें मोठमोठ्या पर्वतांवरून आगगाडी नेण्याची युक्ति काढली आहे. ह्याच्या गाडीला इतर रेल्वे प्रमाणें दोन रुळांची गरज लागत नाहीं. खांबांची रांग उभी करून त्यांवर एक रूळ असलेले जाळीदार पडे बसविलें म्हणजे-जमिनी पासून २० किंवा ३० फुट उंची वरून गाडी बिन धोक जाते असें त्याचें म्हणणें आहे. दी० बं०

कलकत्त्यापासून विलायतेस तार पोंचवयास एक तास व पांच मिनिटें लागतात.

काश्मीरच्या राजांनीं व्हैसराय साहेबांना एक स्वदस्तुरचें पत्र लिहिलें आहे "अशा असह्य व नीच स्थितींत ठेवण्यापेक्षां मला आपण स्वतःमारून टाकावें हें फार उत्तम" असें त्यांनीं त्यांत लिहिलें आहे! ! !

अमेरिकन सरकारानें कांहीं कल्मी आंब्यांचीं झाडें मागितलीं आहेत असें समजतें.

लंडनच्या मेयर साहेबांनीं दुष्काळ पीडित चिनी लोकांच्या मदतीकरितां १ लक्ष रु. पाठविलें असें समजतें. सु० पं०

विलायतेस एका पठ्ठ्यानें आपली बायको अधेलीला विकली!

व्हिएना एथील एका श्रीमानानें दहा हजार रुपये खर्चून एका सुंदरीचे चुंबन घेतलं!

सर्वोदय कर्ते म्हणतात कीं. युरोपियन कामदार पट्टेवाल्यांनां खासगी कामें फार लावीत असल्यामुळें त्यांची त्रेधा उडते. तर इकडे कामदार घव्हरनर साहेबांनीं लक्ष द्यावें.

इंग्लंडांत वेश्यांचा धंदा दिवसें दिवस फैलावत चाललेला पाहून सरकारास लोकांच्या नीती बद्दल काळजी पडली आहे व थोड्याच दिवसांपूर्वीं तेथें असा कायदा करण्यांत आला आहे कीं— जी कोणी स्त्री वेश्येचे दुकान रानरोस चालवेली आढळेल तिला पहिल्या खेपेस तीन तीन महिने कैद व वीसशें रुपये दंड पर्यंत शिक्षा होईल पुन्हा हा अपराध करताना ती सांपडली तर पहिल्याच्या दुप्पट शिक्षा होईल. धा० सु०

"TO THE DEAF."

A person cured of Deafness and Soises in the Head of 23 years, standing by a Simple Remedy, will send a description of it free to any Person who applies J. H. Nicholson, 5 Old Court House street, Calcutta.

बहिऱ्यांस.

बहिरेपणा आणि २३ चा कर्णनाद यांस गुण आणणारें सोपें औषध

जे. एच्. निकलसन, ५ वी ओल्ड कोर्ट हौस स्ट्रीट कलकत्ता, यांस पोस्टपेड पत्र पाठविलें असतां औषधाबद्दलची माहिती फुकट पाठविली जाईल.


राजमाचीकर व साठे न्यायाश्रयकर्ते पुणें यांनीं नवीन तयार केलेला.

हिंदुस्थानचा कराराचा आक्ट.

सन १८७२ चा २ वा

समजुतीच्या टिपा व मुंबई, कलकत्ता, मद्रास व अलाहाबाद हायकोर्टाचे निवाड्यांसुद्धां किंमत रु० २॥ व टपाल खर्च ०६ आ.


☞ हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.